सालभरोर „ ७ „१ ०८
फिरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०१
दुसरे खेपेस .... .... ०।

Six monthly ... ... ... 3 „ R.
Single copy ... ... ... ... 4 a.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 a

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY 1 JUNE 1896 — NO 21

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख १ जून माहे सन १८९६ इ० — अंक २१

## The Berar Samachar

MONDAY JUNE
1 1896

We are glad to note that the services of the Hon'ble Mr. Bulwant Rao Bhuskute in the Vice-regal Council have won the golden opinions of his countrymen. His speeches had in them a vein of modest criticism. The adverse party could often appreciate his strict logic of reasoning, his accurate marshalling of facts, and his hopeful and liberal foresight in politics. On his return to Burhanpur he was accorded a hearty public welcome on 17th ultimo. We give below the text of the address as an introduction to his reply thereon. It is the reply that we value most for his opinions on the relation of politics to social advancement. Towards the close of the reply we would also find a summary of questions to which the Hon'ble Mr Bhuskute solicits public attention.

We have always thought it strange that while the more important dailies of Madras, Bombay and Calcutta are eloquent in their appreciation of the work of the Hon'ble Raosahib Bhuskute in the Viceregal Council, the Central Provinces papers of the Nagpur Samachar and even the Nyaya Sudha should have treated him with a conspicuous golden silence. No doubt the Deshsevak has never spared himself Again Chamber's weekly—a journal under European management it must be borne in mind—has likewise expressed from time to time its opinion on the work of the C. P. representative. But the Nagpur Samachar has been conspicuously reticent and so also the Nyaya Sudha to a certain extent The expression of the opinion of the press is often an unerring guide and enables those who are anxious to serve their country to choose and decide when the rigid and stern mandates of duty fail to lend him their helping hand. We therefore naturally sympathise with the C. P. member when he says in his reply to an address, given him by an exceedingly large public meeting at Burhanpur attended by nearly fifteen thousand persons:

"I have already quoted "Those who lead must also follow." The question is whom I should follow? Who have come forward to help me and to suggest to me how I should proceed?

But though the two of our contemporaries in the C. P. find no space to give publicity to the utterances of their present representative and to convey their opinion on his career in general, it is a matter of great consolation that important and influential native organs in distant corners like the Marhatta, Hindu, Patrika, Standard &c. are watching vigilantly his work in the Council and often trying to supply him what he complains he sorely needs.

We are very anxious to publish the address and the reply in our columns today for more reasons than one. It gives a lucid exposition of the Hon'ble gentleman's views. The latter part of his address and particularly the concluding portion of it are peculiarly interesting in as much as he fearlessly declares that he will secure a favourable hearing by dinning into the ears of the Government on certain public matters if they were but rightly brought to his notice. His views on interpellations and on the whole the cautious spirit which pervades all his previous speeches is preeminent even in the reply before us. In fact there can be no doubt now left of his desire to serve his country in general and his own provinces in particular. Here is a willing patriot anxious to serve his countrymen if they but desire to avail themselves of him. Here is a solemn and earnest assurance that the grievances of the people in whatever rank or position they be placed will be forcibly and pointedly placed before our rulers. We have now to ask our readers to lend a hearty cooperation to talents consecrated and dedicated to them.

We are sorry we have a limited space to devote to such useful speeches however useful they be. We are ready to pay tribute to merit and virtue wherever they be found. But if we were found to neglect it the fault lies with the size of our journal. We hasten however to publish the address read in English by Dr. Kotuk the Assistant Surgeon of Burhanpur on the evening of 17th May in a tastefully decorated Mandap.

To
The Honorable Rao Saheb
Bulwantrao G. Bhuskute,
Jahagirdar of Timboorni, &c., &c.,
Burhanpur,

Sir,

We beg leave to approach you with this humble address of our sincere and hearty welcome on your return to your native town. You come to us a success and guaging from the opinions of the Indian Press, justly established in reputation.

It is impossible to express in words how much we missed you while you were away in Calcutta. Your absence had deprived us of your wise counsels in all matters pertaining to this town. But this temporary loss of ours was a distinct gain to that honorable body, which as the Vicergal Council presides over the destinies of the vast empire of which the town we call our own is but a microscopic part.

It is but natural that your townsmen should have watched the remarkable progress you made in the short time that you have been a member of the Imperial Council, with loving interest.

The qualities of head and heart which you exhibited in the discharge of your onerous duties and the prudence and moderation you exercised in your learned utterances in the Council have in our humble opinion more than justified your appointment as a representative of these provinces.

Your lucidly delivered speech full of cogent and convincing arguments in connection with the cotton duties was characterized by that public spirit and moral courage with which you have ever been known to advocate the cause of the poor and helpless.

Your part of work in connection with the legal practitioner's bill has laid the whole profession under a deep debt of everlasting obligation,

The acute intelligence and penetrating foresight,—ever your characteristics—that you brought to bear on the deliberation of the Select Committee to which the Excise Bill was referred, have, we dare say, earned for you the admiration of your colleagues. We hope that the Government of the Central Provinces will not lose sight of your strong recommendation to the levy of an acreage in preference to a direct duty on the article in question.

We will not be prolix, Hon'ble Sir by referring to your discerning criticism on the new Budget and to the tact and wisdom you displayed in turning to advantage the right of interpellation.

Your thorough grasp and judicious and pertinent procedure in the handling of every question could not have failed to confirm you in the good opinion of our benign and just Government which we doubt not, will, in the near future, recognize your important and meritorious services with fresh honours.

Now Honorable Sir, in unanimously according our best thanks and warmest congratulations, we once more emphatically express our continued confidence in you, and we need hardly say that your next session's work will only add fresh laurels to what you have already won.

In conclusion we pray that the Almighty may bless you with long life, sound health and increased vigour to enable you to do useful service to your country and people.

Burhanpur, 17th May 1896.

We beg to subscribe,
Honorable Sir,
Your most obedient servants,

The Hon'ble Rao Sahib Bhuskute in reply said:—

"Friends, Gentlemen and my countrymen:—

Had it been only for the formality unfortunately too common on occasions like these I should certainly have been the last person to respond to it in the terms in which I propose doing it today. The occasion which makes you make this demonstration of your feelings for one among you is not worth this much trouble on your part. As you want me to speak something I would have liked to enumerate to you what I have done in the awful body to which I had been called by the selection of the Hon'ble J. Woodburn. My gratitude to him can not be too great considering the unvaried interest evinced in me not only in my selection but in rendering me every possible assistance. I would not be doing my duty to myself if I do not mention the name of another gentlemen considerably kind to me. Had it not been for these two gentlemen I am sure you would all have shunned the present occasion. I need hardly say that the other gentleman is the Hon'ble Rai Bahadur P. Ananda Charlu.

Your mention about my services in connection with the Legal Practitioners' Bill which went so sorely against the grain gives me the greatest pleasure because it requires an explanation of my borrowed feathers and gives the praise where it is due. It is owing to these two gentlemen and to the Hon'ble Sir A. Miller in particular that the Bill took its present universally acceptable form and has become a law. You are all aware, my friends I am not a distinguished notary of the law and I was not even on the select committee to which the Bill was referred. An undeserved praise is a reproac[illegible] credit either to the [illegible] giver.

I was of course ve[illegible] I gave a similar reply to a simil[illegible] mark of your attention only fiv[illegible] months ago and I ever thought:—

"Two sisters by the goal are set,
Cold disappointment and regre[illegible]
One disenchants the winner's ey[illegible]
And strips of all its worth the priz[illegible]
While one augments its gaudy sho[illegible]
More to enhance the loser's woe."

With feelings such as these I took up the solemn task to which I was called and every day added to my difficulties. This time I only dwell on those points which concern us most. In doing this I shall be representin[illegible] nobody's views and shall pour ou[illegible] my thoughts just as they occur to m[illegible] The first problem of considera[illegible] difficulty is as to whether we shou[illegible] make political advancement the fo[illegible] most in our endeavours to the tot[illegible] neglect of an amelioration in our social condition. The reasonings [illegible] which I arrive at some conclusion [illegible] neither new nor exhaustive. It wo[illegible] be trite to repeat them to you. [illegible] I should like to remind you th[illegible] those who lead must also follow. [illegible] social progress be worked upon w[illegible] a degree of abhorrence proportione[illegible] its utility I ask to myself whether present political situation is co[illegible] mensurate with our present soc[illegible] position. The answer is a palpa[illegible] nothing.

Gentlemen there are two sorts [illegible] contentment one active and the ot[illegible] passive. The active contentment m[illegible] be compared to itchy sensation [illegible] vading the whole body. Something must mend or you seem to live [illegible] no purpose. All onward marches they what they may are due to [illegible] activity of an inordinate itchi[illegible] commonly called ambition.

When society is in a healt[illegible] condition this feeling spontaneo[illegible] grows up by a sort of natural [illegible] either slowly or rapidly. If we [illegible] remained at the advent of the [illegible] British Rule the same inert immo[illegible] sluggish race that we were some two hundred years ago where should we have now been? Even now what would have become of our old forms of arbitration by Punchayet or of the recording of evidence by mere oath of Shri or Gajanan, the Sun or the Moon? We must adapt ourselves to circumstances growing out of a

homogeneous whole which were never too old nor even too young. If we refuse to adapt ourselves to altered times we must be prepared to perish in the long run, drawing out a weary and languid existence. In the mean—while if we look to the present laws I am sure you will be convinced with me that they are more suited to train and advance those for whom they are framed than to meet the requirements at fixed times and at fixed definite periods. The laws of a country if wisely framed are framed with a view to their present requirements and not with a view to their future requirements in a state of ideal perfection. The various enactments obtaining in India were framed placing an advanced condition of the people in view. This noble and sober wisdom had its own reward. Laws not only protected person and property but also trained and built up the minds of the people. Elsewhere social advancement precedes [illegible] form. But in our country [illegible] observed to follow it. To [illegible] its motion would be [illegible] and unholy. But to leave it out of consideration would be equally so.

I therefore wished the reform to develop itself but never wanted it to attain an abnormal excess. This makes me indifferent to several of the reforms now preached everywhere and I wish us to attain the other form of contentment vulgarly called tranquility.

Not that I welcome it nor that I despise it. But I wish it to take care of itself. With this attitude towards ambition and tranquility when I come to reflect on our present apathy to certain things my mind is mightily confounded. When I think of the general apathy of our countrymen to the general state of agricultural depression all over the land not to think of the favourable condition of this or that particular piece of land or province my mind is mightily bewildered. What are the best among us doing? Are those best fitted to solve this riddle doing their duty to their countrymen? The answer is obviously against them. They may be engaged in the means of perpetuating the eminent rank of their families or in securing the objects contributing to their com[illegible]s or in amassing a little of wealth. But men who have persistently directed their efforts to remit the present condition, we have not. It agriculture fails as it is showing symptoms of a continual falling off on what resources are we to draw our maintenance? Are we to make a perpetual famine the constitution of our realm? This is the problem to which I am extremely sorry the attention of those best fitted to avert an impending calamity has not been sufficiently directed. Industrialism and trade-activity, manufactures and commercial enterprise which relieve a suffering population are not yet even thought of. These things, however desirable in themselves, must be thought of [illegible] our [illegible]men. No doubt there are symptoms of a convulsive movement in this direction but it dies in the heart in which it was conceived. This problem of much vital importance to our interest affected me most as it even now does and when I think to myself I have not been able to press these points either on the notice of those who govern us or on that of those whom I am proud to call my countrymen. I think, I as one have entirely failed in doing my duty.

When people are blind to their own interest it is the duty of their representative to work upon the minds of their rulers so often and so persistently that his efforts must find an echoe in the hearts of the people till they are roused to action. Have I done anything however slight in this direction? Then what is this evening's demonstration for?

I have already quoted "Those who lead must also follow." The question is whom should I follow? Who have come forward to help me and to suggest to me how I should proceed?

I shall be very happy to receive suggestions from my countrymen particularly of this province on the following major heads of importance:—

(a) The state of the resources of the soil in mineral productions, the facilities for industries and manufactures, and the probable development to which they can be worked.

(b) The amount of assistance expected from the Government in such enterprises as may be undertaken by the people and the probable success which may attend them.

(c) Details of information containing the account of the efforts more by the people in this direction with the fruit they bore. If the efforts of single and isolated persons however unsuccessful in this direction were combined together much light would be thrown on this obtruse subject and the Government of India will be able to bestow their best attention on it. I have no doubt of the will and power of Mr Lyall, of the Hon'ble J. Woodburn and of the Hon'ble Sir J. Westland to contribute their share to the success of such enterprises. About the good intentions of H. E. Lord Elgin there can be no two opinions. The present time is favorable to such undertakings and I would only say to you now or never.

(d) There is an imperative necessity for the extension of the right of trial by jury to the most advanced towns of the province such as Jabulpore and Nagpur. I think we have become sufficiently ripe for such a privilege and until I learn the general opinion here I would not be justified in attributing to you a desire which perhaps you may not entertain.

(e) Several administrative reforms will suggest themselves to you if you but wish your representative really to serve you.

(f) The condition of the public service rules made for recruitment, their wanton violation and a tyrannical and despotic conduct on the part of the different heads of administration whether of native or foreign extraction should not be overlooked by us. Asserting a privilege is a right and arbitrary conduct must be broken down.

(g) The condition of the Educational Departments all over this vast empire will also suggest to you certain shortcomings and I would be the first man to bring any irregularities to the notice of the [illegible]rnment of India.

(h) Petty taxations such as the assessment of the *Sir* lands, the Paudhri tax, the forest imposts, should also claim your attention.

I have detained you long and I must needs abridge my remarks.

I see hints thrown in newspapers that interpellations go for nothing and are merely farcical. It is not my province to criticise this opinion. I am convinced every sort of care and attention are bestowed on them if they were but reasonable.

A faculty of wise interrogating is well nigh an accomplishment of an object. I am quite sure the present members of the Government of India are anxious to promote our interest if they but come to know our real grievances. Be plain, honest and definite and straight forward in your demands and they are sure at least to be seriously considered.

Gentlemen, friends and citizens, you have done me a greater honor than I deserve. In thanking you for it I again express my gratitude to the Hon'ble J. Woodburn."

---

A great man is fallen from our midst! Mr. Edulji Bymonji Dastur died on Wednesday last. We are extremely sorry for his sudden death which, it is said, was due to high fever. He was a very popular officer. We have given elsewhere a short history of his life.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती अधिक जेष्ठ वद्य ६ शके १८१८

### सावधगिरि

( हत्याराच्या नव्या कायद्या विषयीं )

सन १८९९ च्या मे महिन्या पासून हत्यारें घरीं असूं देणें हें देखील गैरकायदा झालें आहे. ही गोष्ट पुष्कळांस ठाऊक नाहीं अशी आमची समजूत आहे. त्या वेळेपूर्वी घरोघर जुनीं हत्यारें ह्मणजे बंदुका, तलवारी, जंबिया वगैरे असलीं तरी कायद्यानें त्याला हरकत नव्हती. फक्त हत्यारें उपयोगांत मात्र सरकारी परवानगी वाचून आणूं नयेत असा नियम होता. वऱ्हाडांत पूर्वी लढाया अनेक वेळा झाल्या आहेत आणि दंगधोपे व लुटालुटी वारंवार होत असत. या कारणांमुळें लोकांपाशीं हत्यारांची सिद्धता बहुत प्रकारें होती. इंग्रजी सुरू झाली आणि परवान्याशिवाय हत्यार उपयोगांत कोणी आणूं नये असा निर्बंध झाला. परवाने ही सरसकट वाटेल तेव्हां आणि वाटेल त्या इसमांस मिळेनासे झाले आणि लोकांच्या घरोघर वडिलोपार्जित हत्यारसामुग्री जंगत व धुळींत मिळत चालली. घरगुती उपयोगा करितां कित्येक लोकांनीं तलवारी सारख्या शस्त्रांच्या विळ्या, कोयते वगैरे जरूरीचे पदार्थ बनविले. आणि पुष्कळांनीं जुनी बंदुक किंवा तलवार इत्यादि हत्यार घराण्याची शोभा व पिढिजादी लढवय्येपणाची निशाणी ह्मणून राखून ठेविलें. दसऱ्याच्या वेळीं पूजा अर्चा करून मंत्रपुष्प घालून पुन्हा त्या हत्यारास दुसऱ्या वर्षापर्यंत बंद करून ठेवावें अशी कित्येक घराण्यांची चाल अद्याप चालू आहे. वऱ्हाडांत जुनी ह्मणून जितकीं घरें आहेत त्यामध्यें हत्याराचा आढळ हा झालाच पाहिजे. अशा स्थितींत वऱ्हाडच्या स्थानिक सरकारानें कडक नियम केला आहे कीं हत्यार देखील परवान्या शिवाय बाळगूं नये. हा नियम फार घातुक झाला आहे आणि या नियमामुळें किती राजनिष्ठ, निरुपद्रवी व निःशस्त्र लोक कायद्याच्या पेचांत सांपडतील व हाल अपेष्टेस पात्र होतील याचा नेमच नाहीं.

अलिकडे नुकतीशी हत्यारा विषयींच्या नव्या नियमा संबंधानें लोकांस अती पीडा होऊं लागली आहे. पुष्कळ वर्षा पासून घरीं जंगत पडलेले हत्याराचा प्रत्येक वर्षी परवाना घ्यावा किंवा तें हत्यार सरकारांत नीमूटपणें गुदरून द्यावें ह्मणजे लोकांच्या वरील संकट दूर होईल. नाहीं तर, कोणावर केव्हां कसा प्रसंग येऊन बेतेल याचा नियम नाहीं. हत्यार ज्याच्या जवळ सांपडेल त्याच्यावर फौजदारींत खटला होतो. आणि दंड वगैरे होऊन त्याची मुक्तता होते. पण एवढा प्रकार घडून येईपर्यंत हत्यार ज्याच्या जवळ निघते त्याला पोलिस कोर्टातील यातना व बेअब्रू यांजपासून मोठी दहशत वसते.

निव्वळ हत्यार जवळ आहे अशा बद्दल फौजदारी खटले करण्याचा आधिकार डेपुटी कमिशनर यां या हातीं दिला आहे. त्यांनीं खरोखर लोकाचें नवीन नियमाविषयीं अज्ञान लक्ष्यांत आणावें, या नियमाचा अधीक कडकपणा मनांत आणावा, व परवाने मिळण्याचा खर्च व मेहनत विचारांत घ्यावी ह्मणजे आह्मास उमेद आहे कीं फौजदारींत त्रासदायक व पीडादायक खटले लोकावर सुखासुखी व चटकन करण्या विषयीं डेपुटी कमिशनर आपली संमतीच देणार नाहींत. जुनीं हत्यारें घरांत पूर्वी प्रमाणें शोभा ह्मणून राहूं देण्यासाठीं घरांतील कर्त्या पुरुषाच्या मरणकाल पावेतों फुकट परवाना देण्याविषयीं कायद्यानें सवलत दिली पाहिजे. अशी सवलत न दिली तर कायद्याच्या उपयोगापेक्षां दुरुपयोग मोठा होतो. इंग्रज सरकारच्या राज्यनीतीचें मूळ तत्वच असें आहे कीं विजातीय प्रजा निःशस्त्र असली पाहिजे आणि त्या तत्वाचा पूर्ण अंमल करण्यासाठींच हत्यारें हिंदुस्थानच्या जगांतून अजिबात घालविण्याची सरकारानें मोठी नामी युक्ती योजिली आहे. परवान्या शिवाय हत्यार कोणी बाळगता कामा नये असा नियम केल्यानें हत्यारच काणापाशीं असूं शकणार नाहीं तेव्हां त्याच्या उपयोगाविषयीं काळजी बिलकूल नको. परवाना देतांना सरकारी अधिकाऱ्यांनीं मोठी खटपट केली किंवा परवानाच दिला नाहीं ह्मणजे जुनीं हत्यारें लोकांनीं विहिरींत टाकून द्यावीं, गुप्तपणें पुरून टाकावीं किंवा सरकारच्या कदमापाशीं हजर करावीं असा एकंदर भावार्थ निघतो.

---

हल्लीं एक चमत्कारिक हत्याराचा खटला मि० सी. शामराव माजिस्ट्रेट वर्ग १ अकोला यांच्या समोर आला आहे. एका जागल्या शिपायापाशी जुनी बंदुक गंजून पडली होती. गांवांत एक पिसाळलेलें कुत्रें सैरावैरा धावूं लागलें ह्मण[illegible] [illegible] शिपायानें

[illegible] सं ५३

बंदुक भरली आणि कुऱ्याचा पाठलाग मोठ्या नेटानें केला. लोकांच्या प्राणाच्या संरक्षणार्थ त्यांनें जी बहादरी केली त्याबद्दल त्या स्वारीला हल्लीं आरोपी म्हणून कोर्टा समोर आणिलें आहे. कायद्याप्रमाणें ही गोष्ट गुन्हाच ठरते. परवान्या शिवाय हत्यार बाळगलें इतकेंच नाहीं तर बार भरून शिपाईबुवा फिरत होते. पण आह्मी उमेद बाळगतों कीं मे० शामराव साहेब या अपराधाचें शाब्दिक स्वरूप न पाहतां त्याचें प्रशंसनीय स्वरूप लक्ष्यांत घेऊन त्या शिपायाच्या कामगिरीबद्दल त्यास अगदीं पोकळ दंड करितील इंग्रजी अमलांत प्राण संरक्षणाचा उपाय देखील अपराध होते.!

## अकल्पित शोचनीय मृत्यू

( मि० एदलजी बहिमनजी दस्तुर, डेपुटी कमिशनर, अकोला, यांचा )

दुनियेंत मृत्यू सारखी हानि नाहीं. या हानीचा प्रतिकार मनुष्याच्या हातीं नाहीं. ही ईश्वरी इच्छा एकदा कळून चुकली ह्मणजे मनुष्याची सादरता हेंच खरें शांतवन होय. पण ज्याच्या अकालीं मरणाची कल्पना नव्हती असा गृहस्थ मरण पावला तर मन देखील स्थिर लवकर होत नाहीं. मि० एदलजी यांच्या बहुमोल अधिकारसंपन्नतेमुळें त्यांचे आप्तमित्र आनंदशिखरीं तल्लीन होते, शरीरसंपत्तीनें मि० एदलजी चांगले धट्टेकट्टे व निरोगी होते, आणि नेटिव डेपुटी कमिशनर मिळाल्यामुळें मि० एदलजी यांची कारकीर्द लोक कुतूहलानें निरीक्षण करीत होते अशा आनंदोत्सवाच्या वेळीं निघृण कालानें आपला अतर्क्य, सर्वंकष, व वैराग्यप्रद महिमा निदर्शनास आणिला ईश्वरी नेमानेमापुढें मानवी मनोराज्य लटकें आहे!

गेल्या बुधवारीं दुपारीं तीन वाजतां मि० एदलजी साहेब मरण पावले. मरणास कारण ज्वरक्षोभ झाला असें ह्मणतात. पंधरा दिवसा पूर्वीं ते अकोल्यास आले आणि तेव्हांपासून डिपुटी कमिशनरचें काम मरणवेळेच्या अगोदर चार पांच मुहूर्त पर्यंत ते करीत होते किरकोळ ताप दोन दिवस पूर्वीं येत होता तथापि हा ताप अखेरचा आहे असें त्यांच्या किंवा इतरांच्या ध्यानीं मनीं नव्हतें. बुधवारीं बारा वाजेपर्यंत नेहमी प्रमाणें चहाकाफी, जेवणखाण, व कामधाम चाललें होतें. आदले दिवशीं ढाळक घेतल्या मुळें थोडी निशक्तता वाटत होती. डाक्टराच्या सल्ल्यानें झोंपेचें औषध देण्यांत आलें. घटकाभरांत जांभ ओढूं लागली, देहावसानाची तडफड होऊं लागली आणि हां हां ह्मणतां प्राणज्योती मालवली !

मि. एदलजी साहेब आकोल्यास सडेच राहिले होते. त्यांचे वृद्ध मातापिता पुत्राची धन्यता व गौरव करण्यासाठीं उन्हाळ्या नंतर महाबळेश्वराहून येणार होते. बायकोमुलें शिंकदराबादेहून अजून यावयाचींच होतीं. त्यांचे चुलतबंधु माणिकशा रतनजी हे मरणाची तार पोचल्या नंतर बुधवारीं रात्रीं बुलढाण्याहून आले. मरणाच्या दुष्ट वार्तेमुळें सर्व लोक एदलजी साहेबांच्या बंगल्याकडे [illegible] ची [illegible] खरी ह्मणून प्रथम मन घेईच ना. पण पळमात्रांत ती भूल नाहींशी झाली. जो तो मरणाच्या प्रकाराविषयीं कपाळाला हात लावी. नेटिव डेपुटी कमिशनर आणि तशांत एदलजी साहेबा सारखें शहाजोग रत्न हरपलें ह्मणून सर्वजण नशिबाला दोष देऊं लागले. मृताचे गुणानुवाद स्मरण्यांतही मनुष्यें दुःखकालीं बरें वाटून घेऊं लागलीं.

गुरुवारीं सकाळीं प्रेतयात्रा निघणार होती ह्मणून अखेरच्या रामरामा साठीं हजारो लोक पुन्हां बंगल्यावर लोटले. सरकारी कचेऱ्या, बाजार, शालागृहें, लायब्ररी, आदिकरून सर्व संस्था मृताच्या स्मरणार्थ बंद होत्या. एदलजी साहबा विषयीं लोकांच्या मनांतील प्रेमाला दुःखाश्रूनें भरतें येत चाललें आणि गांवांतील सर्व शिष्ट जन व लहानथोर मंडळी प्रेतयात्रे बरोबर चालले तेव्हांचा तो देखावा अपूर्व खरा, दुःखाचा खरा, पण खरोखर अवर्णनीय होता पोलीसच्या छोट्या पलटणींनें दीन मुद्रेनें सलामी दिली, तुरुंगावरच्या शिपायांनीं शेवटचा मुजरा केला, आणि युरोपिअन अधिकारी ही स्मशानकूपा पर्यंत आले होते. पोलीस इनस्पेक्टर राजजी धोंडजी व त्याचे बंधु देवीरामजी यांनीं सर्व बंदोबस्त नीट ठेविला होता ह्मणून जमलेल्या लोकांस दुःखांतही थोडें समाधान वाटलें.

मि. एदलजी साहेब यांचें घराणें ' दस्तूर घराणें ' या नांवानें सुप्रसिद्ध आहे. पार्शी जातीच्या लोकांचें मुख्य धर्मगुरुत्व याच घराण्यांत आहे. पुण्यास दस्तूर कुटुम्बाचें घर पिढीजाद, श्रीमान व लोकमान्य आहे. एदलजी साहेबांचे वृद्ध वडील मि. बहिमनजी भाई साहेब हे वऱ्हाडांत बहुत वर्षें राहिल्या मुळें व मोठ्या नांवलौकिकास चढल्यामुळें सर्व प्रांतभर विदित आहेत. एदलजी साहेबांचा विद्याभ्यास येथील हाय कुलांत झाला. त्यांच्या बरोबरीचे विद्यार्थी पुष्कळ विद्यमान आहेत आणि त्यांस ही मरणवार्ता फार कष्टप्रद होईल. घरची श्रीमंती होती आणि प्रालब्ध योगानें एदलजी साहेब यांस बाविसावे वर्षीं चांगली हुद्याची नोकरी मिळाली तरी संपत्तीचा मद किंवा अधिकाऱ्याची आढ्यता एदलजी साहेबांच्या अंगीं कांहींच नव्हती त्यांची ती सौम्य व शांत मुद्रा, मृदु व नेमस्त भाषण, वर्तनांतली ती सौजन्यता, दयाळूपणा व परोपकारित्व हीं लोकांस तत्काळ मोहून सोडीत. नुकताच कोठें लोकांच्या भावी आशावृक्षाचा रोपा लागला होता तों अकालींच त्याचा मूलच्छेद झाला! सन १८७६ सालीं हे प्रथम अव्वाची झाले. पुढें १८८२ सालीं असिस्टंट कमिशनरच्या दर्ज्यास चढले. आणि नुकतेच डेपुटी कमिशनरच्या हुद्यास चढले होते. आकोला, जळगांव, वाशीम, उमरावती व शिकंदराबाद इत्यादि ठिकठिकाणीं चाकरीच्या निमित्तानें यांस फिरावें लागलें होतें. मरण समयीं एदलजी साहेबांचें वय ४२ वर्षांचें होतें. तीन मुलगे व तीन मुली अशीं सहा अपत्यें आहेत. मि. बहिमनजी साहेब सध्यां मुंबईस फार आजारी आहेत. त्यांच्या पत्नी गुरुवारीं अकोल्यास आल्या. उभयतांचा पुत्रशोक असह्य आहे तसाच आप्तमित्रांचाही होय. परंतु मनुष्यानें ' ठेविलें अनंते तैसेचि रहावें!'

## वऱ्हाड

हवामान— परवां रात्रौ पाऊस चांगला पडला. रोहिणीचा मंडप उत्तम बसला असून हवेंत थोडा थंडावा आला आहे. वारा सोसाट्याचा वाहतो. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

कै० एदलजी बहिमनजी यांच्या स्मरणार्थ कांहीं फंड दानधर्माच्या निमित्तानें निरनिराळ्या उपयुक्त संस्थाकडे खर्च होणार आहे असें कळतें.

रा. रा. पंडित सुरज नारायण असि० कमिशनर यांस डेपुटी कमिशनर नेमून अकोल्यास धाडावें अशा विषयीं अलिशान रेसिडेंट मि० प्लौडन यांस वऱ्हाडच्या प्रजेची सविनय प्रार्थना आहे.

आमचे येथील लोकप्रिय पोलिस इनस्पेक्टर मि० धोंडजी कोंडजी यांची बदली बुलढाणे जिल्ह्यांत मलकापूर सरकलास झाल्याची बातमी ऐकून येथील सर्व लोकांची फार नाखुषी झाली आहे. हे आपल्या कामांत फार दक्ष, तत्पर व चतुर असल्यामुळें सर्व जिल्ह्याचा बंदोबस्त मोठा नामी राहिला होता. ही नेमणूक रद्द होऊन अशा अनुभववृद्ध अधिकाऱ्यांस अकोल्यासच सदर ठिकाणीं कायम ठेवण्यांत येईल अशी आह्मी उमेद बाळगतों.

अकोल्यास रा० रा० नागोराव पोलीस इनस्पेक्टर यांस एक दर्जा कमी करून नेमण्यांत आलें आहे.

सर्जन लेफटेनंट कर्नल चार्लस लिटल एम डी. सानिटरी कमिशनर यांस लष्करी खात्याकडील बहुमानदर्शक ब्रिगेड सर्जन लेफटनंट कर्नल हा हुद्दा देण्यांत आला आहे.

मि० एदलजी बहिमनजी डेपुटी कमिशनर हे वारल्यामुळें त्यांचें काम सध्यां क्या० आयव्हर्स असि० कमिशनर हे पहात आहेत. आतां नवा अधिकारी कोण व कसला येतो या विषयीं लोक अनुमानें बांधीत आहेत.

आज तारखेपासून सर्व कचेऱ्या नेहमीं प्रमाणें दिवसा ११ वाजल्यापासून ५ वाजे पर्यंत भरत जातील. सकाळच्या कचेऱ्या कोणासच चांगल्या सुखकारक वाटल्या नाहींत.

मोहरमच्या शरगती सरकारी परवान्या वांचून काढू नयेत असा या जिल्ह्यांत सर्वत्र हुकूम फिरविला जाणार आहे. परवान्यांत शरगती केव्हां व कशा काढाव्या, वाद्यें कोणतीं वाजवावींत व किती वेळांत सर्व समारंभ आटोपला पाहिजे हें सर्व नमूद केलें जाईल तर सर्वांनीं परवान्यांतील अटी पाळण्या विषयीं तत्परता ठेवावी.

मि एफ. एल. कॉफर्ड ऑफिशिएटींग असि. पोलीस सुपरिंटेंडेन्ट यांस गेल्या १० तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली असून त्या रजेंत मि. स्पान्सकी पोलिस इन्सपेक्टर यांस असि. पोलीस सुपरिंटेंडेंट नेमलें.

लेफ्टनंट टी. सी. प्लौडन असि. कमिशनर यांस गेल्या ९ वे तारखेपासून सहा महिन्यांची आजारीपणाची रजा मिळाली आहे.

## दुसऱ्यास योग्य सन्मान देणें

[आमच्या एका मित्राकडून]

॥ वदनं प्रसाद सदनं हृदयं सदयं सुधामुचो वाचः ॥

॥ करणं परोपकरणं येषां केषां न ते मान्याः ॥

जे लोक आपल्या पेक्षां खरोखरच वरिष्ठ असतात त्यांस सन्मान देण्याविषयीं आपण अगदीं कर्तव्यबद्ध आहों हें सर्वांस कबूलच आहे; परंतु ज्या हरएक व्यक्तीशीं आपला व्यावहारिक किंवा शारिरीक संबंध असतो अशी प्रत्येक व्यक्ति आपणा पेक्षां वरिष्ठ असते असें मानणें मात्र कोणास रुचणार नाहीं ज्या लोकांस त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल, किंवा थोर घराण्याबद्दल, किंवा त्यांच्या सत्कृत्याबद्दल किंवा त्यांच्या आंगच्या कोणत्याही उच्च गुणाबद्दल समाजांत जास्त मानमान्यता असते अशा लोकांच्या निदान बरोबरीचे तरी आपण आहों असें दाखविण्यांतच कित्येकांस मोठा पुरुषार्थ वाटत असतो. लोकांनींही आपणास तसें म[illegible] नावें ह्मणून त्यांची मनापासून इच्छा असते परंतु अशा प्रकारच्या वर्तनानें एका मोठ्या महत्वाच्या नियमाचें उल्लंघन होत असतें जे लोक वरील प्रकारच्या गृहस्थांची व[illegible] णूक मोठ्या सूक्ष्म रीतीनें पहात असतात त्यांस ह्यांचा लब्ध-प्रतिष्ठितपणा तेव्हांच कळून येतो.

ज्या लोकांत आपण नेहमीं वागतो त्या पेक्षां आपले अंगीं यत्किंचितही कमीपणा नाहीं असें दा[illegible] समाजांतील व[illegible]च्या प्रतीच्या [illegible] प्रयत्न करीत [illegible] खरोखरच क[illegible] त्यांचें वर्तनच सकळ प्रमाण आहे [illegible] णऱ्यास कोणतीहि हरकत नाहीं. कारण विनय आणि सभ्यता हीं दोन्हीं एकमेकांच्या अंगभूत असतात; व ज्यांच्या अंगीं विनय असतो त्यांचे ठायीं अहंपणा नसून [illegible] जगांतील हरएक मनुष्याशीं व्यवहार करतांना ते आपल्या मनांत दुसऱ्याविषयीं वा[illegible] ळकळ बाळगितात; मग तो मनुष्य आपल्या पेक्षां श्रेष्ठ असो, बरोबरीचा असो कि[illegible] कनिष्ठ असो. ह्मणून जे लोक इतरांपेक्षां [illegible] रोखरच श्रेष्ठ असतात त्यांस आपलें श्रेष्ठत्व लोकांनीं ओळखावें ह्मणून त्यांवर जबरदस्ती करणें योग्य वाटत नाहीं. परंतु ज्या लोकां[illegible] आपलें जाणें येणें असतें त्यांच्या बरोबरीचे आहों असें दाखविण्याची ज्यांची [illegible] फल[illegible] असते ते आपला निष्फळ होणारा प्र[illegible] मात्र व्यक्त करून दाखवितात.

तथापि कोणी असा प्रश्न करील कीं [illegible]त्येकजण दुसऱ्या पेक्षां कसा श्रेष्ठ शेवाय शकेल ? आणि असें होणें जर अशक्य आहे तर प्रत्येकानें आपण दुसऱ्यापेक्षां योग्यतेचे आहों असें समजणें रास्त [illegible] कीं काय ? तर या प्रश्नाचें उत्तर देणें फारसें कठीण नाहीं. नेहमींच्या व्यवहारांत जेव्हां एखाद्या माणसाशीं आपला योग्य संबंध घडतो तेव्हां तो माणूस त्यावेळे पुरतां व तेवढ्या संबंधापुरतां आपणापेक्षां श्रेष्ठच असतो; ह्मणून एका अर्थी प्रत्येकजण आपल्यापेक्षां श्रेष्ठ असून तेवढ्यापुरता तो मानास पात्र आहे. उदाहरणार्थ— एका श्रीमंत गृहस्थाचे पायांतील जोडा वाटेने

जातां जातां फाटला व तो त्यानें रस्त्याचे बाजूला बसणाऱ्या चांभारास नीट करण्या विषयीं विचारिलें. आतां या दोघांच्या व्यवहारांत त्या चांभाराकडेसच त्या वेळेपुरतें मुख्य कर्तृत्व येतें. पायांतील जोडा काढून मागणें हें त्या चांभाराचें काम होय; व तो त्याचे पुढें काढून ठेवणें हें त्या श्रीमंत मनुष्याचें काम आहे. परंतु तोच जर चांभाराचे तोंडावर फेंकून दिला तर मात्र त्या श्रीमंत गृहस्थास शोभणार नाहीं. ह्मणून या वेळीं चांभाराशीं जो व्यवहार करायाचा त्यांत त्याच्याशीं सभ्यपणानें वर्तन न केल्यास जोडा शिवून घेण्यासाठीं आपणास चांभाराची जी मदत घ्यावी लागली तिचें महत्व ...रल्या लक्ष्यांत आलें आहे असें आपल्या ...नावरून मुळींच दिसणार नाहीं या क...तीं त्या श्रीमंत गृहस्थाचें वर्तन त्या चांभाराशी उद्दामपणाचें व मर्यादे बाहेर झालें तर त्याचे आंगीं सभ्यपणाचा जो भाग असलां पाहिजे तो कमी आहे असें व्यक्त झाल्यावां... राहायाचें नाहीं. आतां उलट बाजूनें ...हिलें तरी आपल्याकडे एवढा श्रीमंत गृ... जोडा शिवून घेण्यासाठीं आला ह्म... त्या चांभारानें ही गर्वानें फुगून जाऊ... त्या गृहस्थाशी वर्तन करितांना सभ्यता ...नम्रपणा सोडावा असें नाहीं; तर त्यानें नम्रपणें वर्तन ठेवण्याची खबरदारी घेतली पाहिजे. परंतु ती त्याची नम्रता नीच दास्यत्वाचें व्यंजक नसून जींत सभ्यता व सभ्यपणा आहे अशी असावी. याप्रमाणें ...ा चांभाराचें वर्तन असल्यास त्यास उत्तम ...भार गणण्यांत कोणतीही हरकत दिस... नाहीं या नियमाला अनुसरूनच समा...जांतील सर्व प्रतिष्ठित लोकांस—वर पासून खाल—पर्यंत प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्यास त्याच्या योग्यते प्रमाणें यथाक्रम मान देण्यास तत्पर असलें पाहिजे.

जे लोक जगांतील व्यवहार उत्तम रीती जाणतात त्यांस हें ठाऊक असलें पाहिजे कीं जी घर-धनीण दूरदर्शी, विचारशील व दयाळू असते ती आपल्या चाकरांस ...च रीतीनें नागवून त्यांवर आपला बोजा ...लिते; व जी खरोखरच अति द्वाष्ट व कजाग ...नायको असते तिची योग्यता तिच्या चाकरांपेक्षां ही कमी आहे असें जरी न ह्मटलें ...री त्यांच्या इतकीच आहे असें समजलें पाहिजे ह्मणून आपली योग्यता काय! आम्ही कोणत्या दर्जाचे माणूस आहों हें ज्यांस समजत नाहीं किंवा आपण जास्त सन्मानास पात्र आहों असें आपल्या भोंवतालच्या लोकांस समजतें किंवा नाहीं ह्या विषयीं ज्यांचे मनांत संशय उत्पन्न होतो अशा लोकांशीं व्यवहारांत वागणें ह्मणजे फार कठीण जातें. सार्वजनिक ठिकाणीं किंवा जेथें बहुसमाज जमतो अशा ठिकाणीं एखाद्या मनुष्याचे आंगीं कितपत सभ्यपणा आहे हें जाणायाचें असल्यास तो इतर मनुष्यांस जो सन्मान देतो त्यावरून सहज दिसून येण्या जोगें असतें. आपण दुसऱ्यांस योग्य सन्मान दिल्याव चून दुसऱ्याकडून आपणांस योग्य मान मिळण्याचा अन्य मार्ग नाहीं; तसेंच दुसऱ्याच्या अंगीं असलेलें श्रेष्ठत्व आपण जाणिल्या शिवाय आपल्या आंगचें श्रेष्ठत्व दिसून येण्यासही दुसरा मार्ग नाहीं.

( पु० चा० )

## वर्तमानसार.

प्रोफेसर गार्नियर्स यांनीं माकडांची भाषा समजून घेण्याचा प्रयत्न चालविला. आहे. प्रोफेसर सार्व्हिन क्लार्क हे मांजराची भाषा माहिती करून घेत आहेत. मांजराच्या भाषेंत ६०० सिद्ध शब्द आहेत व त्या भाषेचें चिनी भाषेशी साम्य आहे असें ते ह्मणतात.

हवेंतून उडणाऱ्या पक्ष्याचा गमनमार्ग तसेंच पाण्यांतून पोहणाऱ्या माशांचा मार्ग ज्याप्रमाणें दिसत नाहींत, त्याचप्रमाणें चांगल्या लोकांचीं चांगलीं कृत्यें करण्याचेही मार्ग दिसत नाहीं. क०

आजपर्यंत हैदराबाद संस्थानांत युरोपियन लोकांस जमीन खरेदी करण्यास निझाम सरकार परवानगी देत नसे; पण रेसिडेंट मि० प्लोडन यांणीं हा प्रश्न हिंदुस्थान सरकारापर्यंत नेऊन युरोपियन लोकांस फायदेशीर असा ठराव त्यांणीं हल्लीं करवून आणिला. हैदराबाद संस्थानांतील रयतेला इंग्रजी मुलखांत व्यापार धंद्या करितां जमीन घेऊन घरें बांधण्याची जशी मोकळीक दिलेली आहे, तशीच पूर्ण मोकळीक ब्रिटिश प्रजेला हैदराबाद संस्थानांत द्या असें निझाम सरकारास सांगण्याचा इंग्रेज सरकारचा हक्क आहे असें व्हेसरायांनीं ठरवून त्याप्रमाणें निझामांस समज देण्यांत आल्याचें समजतें. ही मोकळीक झाल्यामुळें युरोपियन भांडवल हैदराबादचा रस्ता आतां सुधारील व थोड्याच काळांत तेथें फॉक्टऱ्या व गिरण्या यांच्या धुराचे लोट सोडूं लागतील हें सांगण्यांस नकोच! स. शो.

'अरुणोदय' कर्ते लिहितात कीं:— मनुष्य प्रसंगाप्रमाणें वागतो. हिंदु लोकांस हल्लीं तसे प्रसंगच नाहींत ह्मणून सोवळ्या ओवळ्याचे व जातिभेदाचे प्रकार वाढत आहेत. शिवाजीनें लाऊन दिलेला उद्योग जर अजूनही तसाच चालू असतां व सगळा हिंदुस्थानदेश स्वतंत्र करून इतर देश काबीज करण्याचा क्रमही जर चालूच असतां जातिभेदांत ज्या सुधारणा व्हाव्या असें आज सुधारकांचें ह्मणणें आहे त्या यापूर्वीं कधींच अमलांतही आल्या असत्या व सुधारकांच्या ओरडीवांचून व त्यांच्या जन्मापूर्वीच अमलांत आल्या असत्या. तेव्हां हा सर्व प्रकार निरुद्योगीपणाचा आहे आणि तो निरुद्योगीपणा घालवून देण्याच्या व वेडेवाकडे प्रसंग येतील असें करण्याच्या उद्योगास सुधारकांनीं लागावें ह्मणजे त्यांचा हेतु आपोआप सिद्ध होईल. अ.

आमच्या मुंबईच्या युनिव्हर्सिटीस सरकाराकडून जी मोठी रकम आरंभीं मिळत असे, ती थकत थकत येऊन पांच हजारांवर आज कितीएक वर्षे येऊन बसली होती. तीही सरकारानें नुकतीच परवां हळूच कमी केली आहे. आणखी ही रकम कमी करण्याचा ठराव काढिला आहे. त्यांत, युनिव्हर्सिटीच्या कामदारांस काम चांगलें चालविल्याबद्दल शाबासकी दिली आहे. ही कमी केलेली रकम अजीबात घशांत टाकावयाची किंवा दुसऱ्या एकाद्या शिक्षण कामाकडे लावावयाची आहे हें समजलें नाहीं. इं० प्र०

इगतपुरी येथें पाण्याचा पुरवठा करण्याकरितां सर दिनशा पेटिट बारोनेट यांनीं १०००० रु. दिले आहेत.

जपानाच्या व्यापाऱ्यांनीं जगांतील सर्व देशांशीं व्यापाराचे वळण ठेवण्याची खटपट चालविली आहे. व तवख्या करितां जपानांतील एक कंपनी नव्या ८ आगबोटी तयार करवीत आहे. दर एकीचें वजन ५ पासून ६ हजार टन पर्यंत आहे.

न्यू सौथ वेलसचे मुख्य प्रधान हे आपल्या संस्थानांतुन एशिआटिक लोकांना काढून लावावें आणि त्यांत त्याना येऊं देऊं नये असा कायदा करण्याच्या विचारांत आहेत सु० प्र०

एक दोन वर्षांपूर्वी उत्तर हिंदुस्थानांत आंब्याच्या झाडांना मातीचे टिळे लावण्याचे काम मोठ्या जारीनें चालू होतें. ह्या टिळ्यांमध्यें गाईचे व डुकराचे केंस असत हे टिळे कोण लावीत असे याचा बरोबर पत्ता लागला नाहीं, परंतु यात्रांना जाणारे बैरागी लोक रस्ता लक्षांत राहण्यासाठीं कांहीं खूण ह्मणून हे टिळे चिकटवीत असावेत असा अखेरीस तर्क बांधण्यांत आला. संशयी इंग्रजी अम्मलदारांनीं तर हीं बंडाचीं चिन्हें आहेत अशी ओरड सुरू केली होती. हल्लीं शहाजहानपूर व कानपूर यांच्या शेजारच्या प्रदेशांतून हे टिळे पुन्हां दिसूं लागले आहेत अशी बातमी पसरली आहे.

दिवाण बहादूर श्रीनिवास राघव आयंगार यांच्या येण्यासंबंधीं बहुतेक नक्की झालें. च चालू महिन्याच्या अखेर ते बडोदें येथें येऊन आपलें काम पाहूं लागणार.

नोटीस

रा० रा० दुर्गा परसाद मोतीराम दुबे राहणार मौजे स्वरूपखेडे तालुके बाळापूर याजवर नोटीस देणार सोनाजी वल्लद यादो धनगर राहणार मौजे जानोरी मेळ ता० बाळापूर जिल्हा आकोला नोटीस देतो ऐसाजे कीं तुमचे रुपये १९८ चे दस्तऐवज मी लिहून दिले या रुपयांत गहान माल शेते दोनं मौजे जानोरी मेळ येथील सर्वे नंबर १० व दुसरे मोखे येथील आहे असें गहानवट लिहून दिले. यांत आह्मी हे रुपये रा० रा० हरकचंद गुलाबचंद गुजर दुकान तेल्हारे यानें आपला गुमास्ता रामभाऊ संमत १९५० मिती वैशाख वद्य १० रोज बुधवार तारीख १०।५।९४ इसवी रोजीं तुमचे रुपये आणिले होते ते घेतले नाहीं तर नोटीस पावल्या बरोबर रुपये व्याजासुद्धा घेऊन जावें कळावें तारीख २७।५।९६ इ०

( सही )

सोनाजी वल्लद यादोजी धनगर

निशाणी वखर खुद्द.

नोटीस

रा. रा. सखाराम वल्लद हिरामण पाटील राहणार सावरगांव तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे सावरगांव येथील सर्वे नंबर ९८ आकार रुपये १३ चे आमचें शेत तुह्मी फसली साल १३०५ करितां पट्ट्यानें घेतलें. आणि त्याप्रमाणें तुह्मी गुदस्ताचे पीकही घेतलें. यंदा तुह्मांस आह्मी तें शेत पट्ट्यानें दिलें नसतां ही तुह्मी बळजबरीनें आमच्या शेतकामांस हरकत करीत आहा. अशा दांडगाईनें तुह्मी परा वगैरे केल्यास तुमच्या कडून स्वामित्वा बद्दल रुपये १०० व शेत सारा रुपये १३ मिळून ११३ रुपये कोर्ट मार्फत या नोटीशीच्या खर्चाहस भरून घेतले जातील.

या शिवाय आह्मास शेत परत मिळेपर्यंत जे आमचे नुकसान होईल तेही तुह्माकडून भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख २९ मे सन १८९६ इ०

सही ( मारवाडीत )

लक्ष्मी नारायण तोपणीवाला दुकान


अकोला तर्फे वहिवाटदार अमृतलाल

रामनारायण.


## घड्याळ

किंमत ६ रुपये हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटो प्रमाणें वॉच घ्या. ८०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.



आह्मी स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे फिरविण्यास ठेच असून सेकंडकाटा आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस जुवेल [ ह्मणजे चक्राचे खालीं वर हिरे ] बसविले आहेत. ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. नेटी घड्याळ पाठवूं.

टीपः– "गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल."

गोविंद महादेव पोळ.

९२–२४ वाचमेकर आणि रिपेरर नासिक.


हे पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,,१ ०८

किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.

१० ओळींचे आंत रु० १

दर ओळीस .... ०१०६

दुसरे खेपेस .... .... ०४

Annual in advance 5 P. R.

Annual in arrears 7 ,,

Six monthly ... ... ... 3 4

Single copy ... ... ... ...

Advertise

Below 10 lines ...

Per line over 10 ..

Repetition Per ine

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX

AKOLA MONDAY 8 JUNE 1896

NO

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख ८ माहे जून सन १८९६ इ० अंक


## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोले म्युनिसिपाल कमेटीचे हद्दींतिल बारा फतराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलांव सन १८९६।९७ सालाबद्दल तारीख २ माहे जुलई सन १८९६ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें कळावें ता. ४।६।९६.

Md. Husain
Secretary
A. M. C.

## जाहिरात.

म्युनिसिपल नियम १२ अन्वयें सर्व लोकांचे माहिती करितां प्रसिद्ध करण्यांत येते कीं वार्ड नंबर १ पकचे निवडलेले मेंबर रा० गोपाळ हरी सावरकर यांनीं राजीनामा दिल्यामुळें खालीं झालेली जागा भरण्या करितां पाटील चावडींत ता० २७।६।९६ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजे पासून ते सायंकाळचे ५ वाजे पर्यंत निवडणूक होणार आहे.

उमेदवारचे नांवचे कागद मे० शेख इस्मायल साहेब ऐ० असि० कमिशनर ता. २०।६।९६ इ० चे आंत घेतील.

M I. Husain
सेक्रटरी
म्यु० कमेटी
अकोला

अकोला
५।६।९६

## दुसऱ्यास योग्य सन्मान देणें

( मागील अंकावरून समाप्त )

एखाद्याचे अंगीं जास्त विद्वत्ता असली ह्मणजे त्याला दुसऱ्याचे ठायीं असलेलें विवक्षित गोष्टींतलें तत्संबंधी श्रेष्ठत्व कबूल करवत नाहीं असें मनुष्य स्वभावाला अगदीं अनुसरून आहे तरी विद्वत्ता व शहाणपण या संबधानें ही हाच नियम लागू पडतो. जो खरोखर विद्वान असून ज्याचें मन सुसंस्कृत झालेलें असतें तो आपल्या आंगची विद्वत्ता दाखवितांना विनयादि गूण दाखविता इतकेंच नाहीं तर एखाद्या विषयावर वादाविवाद करण्यापुरती तरी ज्यांची प्रवीणता असते त्यांचे ठायीं असूं शकणारें थोडेंसें गुणाधिक्य जाणून तें मान्य करणें आपणांस भाग आहे असेंही त्याला वाटें पाहिजे. आपणांस जें माहीत नाहीं तें मोकळ्या मनानें कबूल करणें व तें कोणापासूनही जाणण्याची नेहमीं इच्छा धरणें हे दोन्ही गूण ज्या विद्वानांचे आंगीं वसत नाहींत त्यांचें ज्ञानाच्या कोणत्याही शाखेंतील वर्चस्व कमी होण्याची वारंवार भीति असते. कोणत्याही किंवा हरएक व्यक्तीपासून शिकण्याजोगें कांहींनां कांहीं तरी असतें व तें जाणण्याची प्रत्येक विद्वानाची इच्छा असली पाहिजे. या साठीं ज्या अर्थीं प्रत्येकापासून कांहीं तरी शिकायाचें असतें त्या अर्थीं प्रत्येकास योग्य मान देणें हें प्रत्येकाचें काम आहे व तें आनंदानें केलें पाहिजे.

प्रेसिडेंट मार्क हापकिन्स ह्मणून एक विद्वान अमेरिकेंत होऊन गेला. त्यानें एकदां एका विषयावर आपल्या नेहमींच्या पद्धती प्रमाणें एक जोरदार व गहन लेख लिहिला होता. त्याच विषयावर दुसऱ्या एका साधारण मनुष्यानें थोडासा विचार केलेला होता, ह्मणून वरील प्रसिद्ध विद्वानाची गांठ घेऊन आपण ज्या विषया संबंधीं विचार केला आहे त्यावर कांहीं तरी जास्त माहिती मिळेल या हेतूनें त्यानें त्याचे बरोबर आपल्या भाषणात तो विषय काढिला. या मनुष्याच्या बोलण्याच्या झोंकावरून प्रेसिडेंट हापकिन्स यानें ज्या वर आपण लेख लिहिला आहे. त्याच विषयावर यानेंही विचार केला आहे असें लागलींच ताडिलें. ह्मणून पुढील सर्व भाषणांत प्रे. हापकिन्स यानें आपलें ज्ञान दाखविण्याचा डौल न घालितां या गृहस्था पासून आपणास कांहीं तरी जास्त माहिती मिळेल ह्मणून मोठ्या खबरदारीनें संभाषण चालविलें. त्यानें आपल्या भेटीस आलेल्या मनुष्याचा चांगला मान राखिला व आपल्या बुद्धिकौशल्यानें त्या मनुष्याकडून त्याची त्या विषयावरील सर्व माहिती काढून घेतली. पुढें तो भेटीस आलेला माणूस बाहेर आल्यावर स्नेह्याजवळ ह्मणाला कीं—“ प्रे. हापकिन्स यानें मला कांहीं नवीन माहिती न देतां मजजवळून सर्व माहिती काढून घेतली. यामुळें माझें मनोगत सफल झालें नाहीं. ” परंतु या वर्तनावरून प्रे. हापकिन्स यानें असें दाखविलें कीं ज्यास एखाद्या विषयाचें ज्ञान बेतापुरतेंच असेल त्याच्याशीं त्या विषयासंबंधानें बोलतांना खऱ्या विद्वानानें आपल्या आंगचें ज्ञान प्रगट करण्याच्या भरीस न पडतां दुसऱ्या जवळ कांहीं अधिक आहे कीं काय या कडेच नीट लक्ष्य पुरविलें पाहिजे.

जगांतील रोजच्या घडामोडींत प्रत्येक मनुष्याचा दुसऱ्यांशीं जो हरएक प्रकारचा संबंध घडतो त्या प्रत्येकांत ह्याच सिद्धांताचें महत्व वारंवार दृष्टीस पडतें. विवक्षित प्रसंगीं व स्थलीं प्रत्येक जण आपणापेक्षां श्रेष्ठ आहे असें आपण मानिलें पाहिजे व त्या प्रमाणें त्यास योग्य मानही दिला पाहिजे. सरकारांत काम करणारे मोठमोठे हुद्देदार, समाजांतिल सद्गृहस्थ, शिक्षक, आईबाप, साधूसंत व या सारखे दुसरे या सर्वांस मान देणें अगदीं रास्त आहे हें तर उघडच आहे. परंतु जे आपल्यावर सर्वस्वी अवलंबून असतात, ज्यांशीं आपण देवघेव करितों, जे आपणापासून रोजमुरा घेऊन आपलें काम करितात, आपलीं मुलेंबाळें, आपल्या शेजाऱ्यांचीं मुलें, आपल्या हाताखालीं शिकणारे विद्यार्थी, दारावर भीक मागायास येणारे भिकारी व जे ह्मणून मनुष्यकोटींत गणिले जातील अशा सर्वांशीं त्यांच्या त्यांच्या मानानें अदबीनें वर्तन ठेवणें हेंही तितकेंच रास्त आहे. सारांश दुसऱ्याशीं हरएक प्रकारचा व्यवहार करितांना आपण त्यांपेक्षां श्रेष्ठ आहों हें त्यांस दाखविणें किंवा आपल्या ठिकाणींच आपण तसें मानणें हें आपलें काम नव्हे. कारण तेवढ्या व्यवहारापुरते ते श्रेष्ठ आहेत व त्या प्रमाणें त्यांस मान देऊन त्यांशीं योग्य वर्तन ठेवण्याची जबाबदारी आपणावर जशी आहे तशी उलट प्रसंगीं त्यांच्यावरही असते.

घरगुती व सार्वजनिक कामाकाजांत प्रत्येक जण हा सिद्धांत लक्ष्यांत ठेऊन चालूं लागल्यास कुटुंबांत व समाजांत प्रेमबंधनें किती बळकट होतील हें आज सांगतां येत नाहीं. एखाद्या गोष्टी संबंधानें आपलें ह्मणणें बरोबर असून दुसऱ्यांचें चुकीचें आहे अशी आपली खातरी असली किंवा त्याविषयीं आपणास पक्की व खरी माहिती असून दुसऱ्याचें चुकीचें आहे अशी आपली खातरी असली किंवा त्याविषयीं आपणास पक्की व खरी माहिती असून दुसऱ्यास तशी नाहीं असें आपणांस ठाऊक असलें, तरी वादाविवाद करण्याचा प्रसंग आला ह्मणजे उलटपक्षीय आपलें ह्मणणें सिद्ध करीत असतां त्याची हेळसांड करितां कामा नये, इतकेंच नाहीं तर आपली मुद्रा व आपलें भाषण हीं अशा प्रकारचीं असावीं कीं त्यामुळें दुसऱ्याचा कोणत्याही रीतीनें उपमर्द होणार नाहीं. या प्रकारचा वाद चाललेला असतां दोन्ही पक्षाचें वर्तन अशा प्रकारचें घडल्यास त्या पासून किती तरी फायदा होणार आहे! कांहीं गृहस्थ असे ही सांपडतील कीं ज्यांचें वर्तन या नियमास सदोदित अनुसरूनच असतें अशा गृहस्थांस सर्व लोक मनापासून मान देतात एवढेंच नव्हें तर त्यांवर त्यांची प्रीतीही जडत जाते परंतु असेंही कांहीं किंबहुना पुष्कळ लोक असतात कीं ते या नियमांस अगदीं हरताळ लावून आपलें वर्तन केवळ आपल्या तब्बेतीच्याच झोंकावर ठेवितात. अशा मनुष्यांच्या ठिकाणीं दुसरे कितीही चांगले गूण असले तरी वर सांगितल्या गुणांचा अभाव असल्यामुळें त्यांच्या वर्तनांत भारदस्तपणा व दुसऱ्याचें प्रेम व लक्ष्य आपणाकडे आकर्षून घेण्याचा गूण मुळींच नसतो ह्मणून जेव्हां जेव्हां ते आपलें श्रेष्ठत्व स्थापित करायास जातात तेव्हां तेव्हां त्यांचा तो हेतू सिद्धीस तर जात नाहींच पण उलट त्यांचा क्षुद्रपणा व अहंपणा मात्र लोकांच्या नजरेस पडतो.

मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्या शिवाय मान देण्याची खरी वासना होत नाहीं. पूज्यबुद्धि उत्पन्न हे ग ती देवाविषयीं किंवा ज्यांचे ठायीं कांहीं दैविक शक्ति आहे अशा साधु–संताविषयींच असली पाहिजे असें नाहीं; तर जे जे ह्मणून मानास पात्र आहेत त्या सर्वांविषयीं ती असते. ज्याच्या मनांत एखाद्या विषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होते तो त्यास–मग तो लहान असो अ... असो, मान देतोच. अधिकाऱ्या ... मनापासून मानण्यासाठीं ही पूज्यबु... णांस नेहमीं तत्पर राखिते. ज्यास ... च्या हाताखालीं चांगलें काम करित... नाहीं तो अधिकारारूढ झाल्यावरही ... लें काम योग्य रीतीनें बजावूं शक... नाहीं आपल्या पेक्षां जे वरिष्ठ आहे... मान देण्याबद्दल आपण कमबकूब ... सेंही सिद्ध होतें. जेव्हां पुढाऱ्याच... मा प्रमाणें चालणें यथान्याय अस... आपण तसें करण्यास तत्परता व ... दाखविला तर पुढऱ्यांचें काम अ... शिरावर पडेल तेव्हां तें करण्यास ... अयोग्य व असमर्थ बनूं हेंही ... आहे

शिवाय आपण ज्या लोकांत वागतों त... ज्या अगदीं बरोबरीचें आपण आहों अ... ज्यास वाटूं लागतें तो त्यांच्या पेक्षां कधींही श्रेष्ठ बनणार नाहीं. कारण असला माणूस श्रेष्ठ होण्यास अयोग्य आहे. ज्यांच्याशीं आपला व्यवहार असतो ते आपल्या ... श्रेष्ठ आहेत असें मनांत नेहमीं बाळगल्या... नें शहाण्या व समंजस माणसास एक ... चें उत्तेजनच मिळत असतें. पण आ... सऱ्या पेक्षां श्रेष्ठ आहों असें ज्यांच्या ... नांत वागत असतें त्यांस हें उत्तेजन ... मिळत नाहीं. जे मानास पात्र असत... चें अंगीं कांहीं विलक्षण व चांगले गूण ... हेत ह्मणून त्यांस मनापासून मान देण्या... तत्परता बाळगणें हेंच खऱ्या मोठेपणा... रहस्य होय. आपणांशीं संबंध घडण... विचार, भाषण व आचार यांच्या निर... ळ्या कक्षेच्या मानानें ते आपणा पेक्षां ... ष्ट आहेत असेंच मानणें ह्मणजे आप... च्या पेक्षां श्रेष्ठ आहों असा ठसा त्यांचे ... नावर उमटविण्याची आपले अंगीं येणारी शक्ति नाहींशी करण्यासारखें आहे. शिवाय अशा वर्तनानें ज्या उच्च व सर्वमान्य पदा... ला आपणांस अद्याप पोहोंचायाचें आहे तिकडे जाण्याची आपली गति आपण हो... न कुंठित करून टाकतों असें होतें.

दुसऱ्यांशी आपलें वर्तन सरळपणा... राखण्याकरितां, स्वतः या वर्तनाचा योग्य विचार करण्या करितां आपणाला जें खरोखर पसंत आहे तसेंच आपण वागतों असें दिसण्या करितां व सभ्यपणा... या ज्या ज्या चाली असतात त्या योग्य रीतीनें अनुसरण्या करितां स्वतः पेक्षां दुसऱ्यासच चाहाणें व मान देणें खरोखर अति अवश्य आहे. परंतु अशा प्रकारचें

...खण्यास आपण उपजतच शहाणे, ह्मणून आपल्या मनोविकारांस व वणळ देतांना व जगांत दुसऱ्यांशी ...हार करितांना ह्या गोष्टीकडे मोठ्या खबरीनें व शहाणपणानें वारंवार लक्ष्य दि... पाहिजे. तसेंच आपल्या मुलांबाळांना ...ण देतांना या सर्व गोष्टी लक्ष्यांत ठे... स्वतःच्या वर्तनापासून त्यांस वाईट वळलागण्याची संधि न आणू देतां ...ण चांगला कित्ता घालून दिला ...हिजे.

एलिचपूर २७।५।९६

## गप्पाष्टक.

### आचार्य परिषद्

...ही सापेक्ष नीतीचीं तत्वें सद्यःस्थितीस ...सरून परंतु उत्तम स्थितीस नेऊन पोहच... असल्यामुळें खरीं परमार्थसाधक ...माज ला सुखी, सज्ञान, सशक्त आणि ...रणारीं तींच तत्वें होत. राष्ट्राचें, ... आणि व्यक्तीचें आजपर्यंत जें हित ...हे तें सापेक्ष नीतीच्या तत्वांनींच ...लेलें आहे असें जगाच्या इतिहासा... तत्व चालू व्यवहारावरून कोणासही क... येईल. आर्यपुत्रांचे हितासाठीं आज आ...गास जे निर्बंध घालून द्यावयाचे आहेत ते ...र्थात वरील तत्वांस अनुसरूनच तयार करा...याचें आहेत. तें तयार करितांना आजच्या स्थितीचे आणि इष्ट स्थितीचे धोरण राखिलें पाहिजे आणि उपायांची योजना झाली पाहिजे, त्याच प्रमाणें लोक स्थितींत पुढें जे बदल होत जातील त्यांचेकडेहि फार ...क्ष्म लक्ष असलें पाहिजे; व प्रसंगास अनु... व्यक्तीच्या आणि समाजाच्या वर्तन... वरील फेरफारा मुळें जे फरक करणें ...श्यक दिसेल ते तात्काल करीत गेले ... जुन्या कायद्यांस परिस्थितीच्या ...अनभवाच्या मानानें नेहमीं याप्रमाणें ...य दिलें पाहिजे ह्मणजे ते लोकोपयोगी ...सजीव राहतील आणि लोकांच्याहि आ...री ते नियम व तत्प्रवर्तक आचार्य नि... पात्र राहतील.

...याप्रमाणें भाषण झाल्यानंतर पुढील ठ... सर्वानुमतें कायम करण्यांत ...ले.

ठराव १. आत्म्याला जसें शरीर तसें ...स शरीराला राज्य होय. आत्म्याच्या सुखासा... आणि उन्नतीसाठीं शरीराचें योग्य संगो...न करणें ज्या प्रमाणें आवश्यक आहे त्याच ...प्रमाणें शरीराच्या संरक्षणासाठी राज्यरक्ष...करणें ही आवश्यक आहे. तेव्हां ज्याला सन्मोन्नति साधावयाची आहे त्यानें शरीर आणि राज्य यां विषयीं उदासीन न राहतां आत्म्याचें हितां करितां आत्म्यापेक्षांही अ...धिक त्यांची काळजी घेतली पाहिजे. शरीराची व राज्याची जो उपेक्षा करील तो परमप्रिय आत्म्याची उपेक्षा करणारा आत्मघातकी समजला पाहिजे.

( पुढें चालू )

---

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक जेष्ठ वद्य १२ शके १८१८

हल्लीं विद्यादानाच्या संस्था पुष्कळ चालूं आहेत पण गरीब लोकांच्या सोयीला ज्या प्रकारचें शिक्षण आवश्यक आहे तसा शिक्षणक्रम अजून सुरूं होत नाहीं. प्राथमिक शिक्षण सर्वांस अवश्य मिळालें पाहिजे ह्मणजे साधारणपणें लिहितां वाचतां येऊं लागतें आणि व्यवहारोपयोगी गणितही समजतें. जरूरीच्या मानानें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार जसा सार्वत्रिक व सुलभ व्हावयास पाहिजे तसा तो नाहीं ही असमाधानाची गोष्ट होय. त्या पुढील शिक्षण मार्ग गृहस्थितीच्या अनुसंधानानें बदलत गेला पाहिजे पण तो बदलण्याच्या शाळा आमच्या देशांत नाहींत. प्राथमिक शिक्षणा नंतर मध्यम, उच्च व वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळण्याच्या शाळा पुष्कळ आहेत परंतु गरीब विद्यार्थ्यांच्या गरजा भागण्या जातील असा शिक्षण क्रम प्ररूढ नाहीं ह्मटलें तरी चालेल. गरिबाच्या स्थितींतल्या विद्यार्थ्यांनीं शाळा सोडल्या नंतर त्यांस जो उद्योग धंदा करावा लागतो तोच चांगल्या प्रकारें करितां येईल अशा प्रकारचें शिक्षण त्यांस मिळालें तरच त्यांचा फायदा आहे.

कित्येक सरकारी नोकरी चाकरीला लागतात पण सर्वांची सोय सरकारांत होऊं शकत नाहीं. पुष्कळांस इतर धंदे पाहिले पाहिजेत. हल्लीं चटाभेद इतकी बिकट झाली आहे कीं चांगल्या चांगल्या विद्वानास देखील त्यांच्या ज्ञानाच्या भांडवलावर पुढील चरितार्थाची योग्य सोय लाविता येत नाहीं. अशा स्थितींत ज्या गरीब विद्यार्थ्यांस पुष्कळसें शिक्षण मिळत नाहीं त्यांचे हाल व अपेष्टा हीं कल्पनेनें, व अनुभवानें उत्तम कळण्या सारखीं आहेत. नवीन पदवीवाल्या गृहस्थांस देखील मद्रासचे जज्य नामदार सुब्रमण्णायर यांनीं पदवीदानाच्या समारंभाच्या प्रसंगीं मोठ्या कळकळीनें उपदेश केला कीं अमूक काम मिळालें तरच तें स्वताच्या विद्वत्तेला व योग्यतेला शोभेल अशा जुन्या कल्पना सोडा, श्रमाची मातब्बरी ध्यानांत आणा आणि कोणताही धंदा असला तरी तो त्याज्य न मानतां त्याच्या वरच सर्व भूषण व मानसन्मान जोडता येईल अशी मनांत पक्की गांठ बांधा. हाच उपदेश गरीब व अल्प स्वल्प विद्यार्जन केलेल्या विद्यार्थ्यांस अनंत पटीनें बरोबर लागू पडतो. आयुष्यांतील भावी उद्योगाला अनुकूळ असें शिक्षण मिळत नाहीं इतकेंच नाहीं तर सांप्रतच्या शिक्षणानें विद्यार्थी श्रमाच्या व हस्तकौशल्याच्या उद्योगाला अपात्र होतात. ही अपात्रता थोडीबहूत कोत्या समजूतीमुळें व कांहींशी शिक्षणक्रमांतील दोषामुळें उत्पन्न होते. आह्मी जें नवें शिक्षण पाहिजे असें ह्मणतो तें मानसिक उन्नती करणाऱ्या सामान्य शिक्षणाला जोडगोळी सारखें सहगामी असलें पाहिजे आणि त्या शिक्षणाच्या योगानें कोणताही उद्योग धंदा आपोआप येईल असाही गैरसमज कोणाचा होता कामा नये. नवीन उद्योगधंदा आरंभण्याला व शिकण्याला या शिक्षणामुळें विद्यार्थ्यांच्या अंगीं फक्त पात्रता येईल व रस्त्यावरील फळी हस्तमुद्रेनें जसा मार्ग दाखविते तसा हें शिक्षण पुढील उद्योगधंद्यांतील वाटा व खाणाखुणा यांची ओळख करून देईल.

हें नवें शिक्षण कसें असावें या विषयीं कांहीं अनुभवी गृहस्थांनीं विचार केला आहे. बंगाल सरकारनें युरोपिअन व युरेशिअन मुलांच्या शिक्षण क्रमा संबंधानें कांहीं अभिप्राय विचारला होता तो अभिप्राय सात आठ गृहस्थांच्या कमिटींत कायम ठरून प्रसिद्ध झाला आहे. या अभिप्रायांत वरील शिक्षण कसें द्यावें या विषयीं उत्तम विवेचन करण्यांत आलें आहे. त्या विवेचना सारांश असा कीं कवाईत, तालीम, चित्रलेखन, व सृष्टीशास्त्र विषयीं ठोकळ व्यवहारिक माहिती हे विषय शिक्षण क्रमांत फार महत्वाचे व अगत्याचे आहेत; किंबहुना या विषयांची जरूरी गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणांत पराकाष्ठेची आहे. या विषयांच्या अध्ययनानें शरीर निकोप व सदृढ असतें, हस्त व नेत्र यांच्या व्यापारांस उत्तम वळण लागतें, किंवा निरीक्षणीचें संवय लागते अशा प्रकारचें शिक्षण मिळाल्या नंतर तो विद्यार्थी पुढें कोणत्याही विशिष्ट धंद्यास लागला तरी सर्व साधारण अशी विद्यासामग्री व पारायणता या शिक्षणानें उत्तम प्रकारची प्राप्त होते. आणि याच कारणामुळें हें विषय प्रथम शिकविले पाहिजेत. या नंतर उद्योग धंद्याचें शिक्षणा जवळ जवळ आपल मार्ग पोचण्याला प्रथमारंभीं निरनिराळ्या विषयांत प्रत्यक्ष गती झाली पाहिजे. सध्यां सधुलेखनपद्धती फार जरूरीची आहे तिव्ह तिकडे व्यासंग कांहीं झाला तर पुष्कळ बरें होय. या शिवाय विटाळ्यानें निरनिराळे नमुने तयार करण्यास शिकविलें पाहिजे. त्यामुळें शोधकपण व चौकसबुद्धि वाढते आणि वस्तुमात्राचें यथायोग्य निरीक्षण होते. सुतारकाम व लोहारकाम यांत थोडा आगम व्हावा ह्मणजे त्यामुळें कोणत्याही धंद्यांत शिरण्याजोगा हस्तकौशल्य व मनाची परिपक्वता हीं सहजीं उत्पन्न होतात. सुतारकामाची व लोहार कामाची साधारण माहिती होण्या पुरतें या विषयांत शिक्षण मिळालें ह्मणजे भावी उद्योगाची प्रारंभशिला बसविली असें होईल. या शिवाय आमच्या देशाच्या मानानें शेतकी विषयक शिक्षण अवश्य निरनिराळ्या मार्गांनीं मिळेल अशी सोय झाली पाहिजे. वरील विषया पेंक्षां शेतकीचें शिक्षण आमच्या लोकांस अत्यंत अवश्य व अगोदर पाहिजे.

---

The Berar Samachar

MONDAY JUNE 8 1896

It is a happy sign of the times that we have begun to think of Technical Education. Technical Education as opposed to general education means practical training. We however exclude that branch of professional learning in Law Medicine and Engineering. We do so because this training is available in India at all chief centers. We would thus define Technical Education to mean instruction, in the principles of science and art applicable to industries, and in the application of special branches of science and art to specific industries and employments, as well as in modern languages, and commercial and agricultural subjects, but not in teaching the practice of any trade or industry or employment. Technical Education is thus a suppliment to ordinaraly general education and a stepping stone to training in special branches of industry. The May No. of the Indian Journal of the Education contains a lucid and interesting lecture delivered by Mr. Chatterton of Madras. We can not help our inclination to quote the observations which press upon the notice of Indian people the urgent necessity of Technical Education. Mr. Chatterton proceeds to remarks in the midst of his lecture:—

"If those who have received the benefits of liberal education would only take courage and step out of the beaten track of the public service or the usual professions, and enter into other, equally honourable though more laborious, walks of life as yet untrodden by them, I feel sure they will find plenty of good work to do, which would prove not only fairly remunerative to those who do it, but also would, in the long run, be beneficial to the community as a whole." Hitherto the public services, the legal profession, and in a minor degree the the educational institutions of this Presidency, have absorbed and found employment for the great majority of those upon whom the University has set the seal of her approval, but the rapid extension of higher literary education is rendering this distinction of smaller market value and the time is coming, if indeed it has not already come, when many of you, at the end of your college careers, will find it difficult, if not impossible, to make a respectable livelihood in the paths which you have hitherto considered most lucrative and most adapted to your personal idiosyncrasies. The love of personal ease and hatred of active physical exertion has been and still is the leading characteristic of the intellectual races of this country, and so long as that prevails there will, I fear, be little chance of your obtaining conspicuous success in the other walks of life which are open to you I am glad, however, to notice that there is in every college I am acquainted with, and in this college particularly, a gradually increasing number of students, who have thrown aside their inherited sedentary habits, and have displayed an amount of enthusiasm for, and degree of skill in, outdoor exercises, which augurs well for their future. The love for an active life is a growing one, and I can only hope that some of you, at any rate, will be sufficiently imbued with it, that will lead you to eschew those occupations which are pursued at the desk or writing table, or in the courts of justice or the lecture rooms, and to turn attention to other possible ways of making a living."

We are highly obliged to Mr. Chatterton when he earnestly asks

us to remove all hazy notions about it, to control our sanguine hopes about its speedy devolpment and to mark inwardly that the Technical education is the only saviour if India s ever to rise in material prosperity. Let no one fail to mark his tone of moderation when he says:—

In the railway workshops, in the cotton-mills, in the gold mines of Mysore, and in other modern industrial enterprises which have arisen in Madras, you will find that the foremen and others in responsible positions are nearly all Europeans, who are paid high wages, because it has been found impossible to rely on native labour for work of this kind. Something more than Technical education will be required to change the character of the Hindu race and supply those deficiencies which it now lacks and which are essentially the birthright and possession of only dominant races. If the people of India had been cast in the same mould as the people of Japan Technical education would have developed out here with the same extraordinary results that have been produced in those isles of the extreme East. But the fact is, you are not a practical people, and the enervating influence of the tropical temperature in which you live for the whole year has to a large extent deprived you of that energy & forgo, that love of independence and responsibility which is necessary to success in practical life. From the experience of the past, we cannot be sanguine of effecting any great change in the future except by degrees to show that generations will have to pass away before its results become appreciable. You are representatives of the intellect of your country, but you will have to associate that intellectual superiority with a similar physical superiority, coupled with manual skill and dexterity before Technical education can achieve much more than it has done already. When that time comes you will be able to manage your own affairs, and the British work in India will have been accomplished.

The rigid line of demarcation which separates the intellectual from the labouring classes, which divides those who think from those who toil, is the main obstacle in the way of progress, and the first steps should be taken with a view to breaking down these distinctions. Something in this direction has already been achieved, some of the lower classes are being educated, and some individuals belonging to the higher castes no longer look on manual labour as derogatory to them. The introduction of manual training into the primary schools would, if it were possible, accomplish much, and the establishment of voluntary workshops in the high schools and colleges where the boys, who wished to do so, could practice carpentry, wood-carving fret-work, turning, modelling or even cardboard work, would enable those who, in the primary schools, had developed any taste that way to cultivate it further. The great difficulty which must be overcome before such schemes as these can be carried out, is to provide suitable instructors which leads me to think that Technical education must work its way downwards from the few to the many, from the higher classes to the lower, from the science students who become practical men and able to work with their hands, to the working men who want Technical training to enable them to do letter work. Unhandiness according to Mr. F. J. E. Spring, is the great disease from which middle class India is suffering, and the measures which are taken to promote Technical education can only be successful if they strike deep at the roots of this all prevalent complaint."

## वऱ्हाड

हवामान— ऊष्मः होत असून आकाश आभ्राच्छादित असते. पाऊस पडण्याची चिन्हे उत्तम आहेत गेल्या आठवड्यांत थोडा पाऊस ही पडला.

रा. रा नारायण पांडुरंग जोशी एक्स्ट्रा असि० कमिशनर, इलिचपूर यांस इलिचपूरचे जिल्हा रजिस्ट्रार नेमिलें.

खामगांवास जे बेंच-माजिस्ट्रेट आहे त्या पैकीं मि. सारगन साहेब बाह्य प्रांतीं गेल्या मुळें त्यांच्या जागीं रा. रा. हुकूमचंद जोतीराम यांस माजिस्ट्रेट नेमण्यांत आलें या गृहस्थांच्या आंगची गुणराशी कार्यभेदानें चांगली उजेडांत येईल.

रा० रा० बळवंत बाळकृष्ण सुळे एक्स्ट्रा असि० कमिशनर यांची बदली बुलढाण्यास झाली आणि त्यांच्या स्मालकाज कोडताचे न्यायाधीशाचे जागीं रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि. कमिशनर हे येत्या १६ वे तारखे पासून विराजमान होतील.

रा. रा. बी. बी. सुळे एक्स्ट्रा असि० कमि० यांच्याकडे सध्यां खामगांवाचें कोर्ट असल्यामुळें ते तूर्त खामगांवास शिल्लकी जरूरीयांत काम आटोपण्यासाठीं गेले होते. तेथील दिवाणी कोर्ट खुलें होईल तेव्हां लेफटनंट डी. ओ. मारीस साहेब असि० कमिशनर दाखल होतील.

अलिशान रेसिडेंट साहेबांनीं मि० सदरुद्दीन अहमद यांस वऱ्हाडांत सन्मानी अव्याची नेमून त्यास उमरावती जिल्ह्यांत धाडलें आहे. या नवऱ्या अधिकाऱ्यांस वर्ग ३ ची माजिस्ट्रेटी व असि० कमिशनर वर्ग ३ ची दिवाणी देण्यांत आली आहे.

उमरावती क्यांप मुनसिपालिटींत मेसर्स क्ले असि० कमिशनर व किंग ए० असि० कमिशनर यांस सभासद नेमण्यांत आलें.

मि० महमद रहिमतुल्ला तहशिलदार वर्ग ४ वणी यांस चालू महिन्यापासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

आणि त्या रजेत रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर क्लार्क आफ कोर्ट, यवतमाळ यांस अक्टिंग तहशिलदार नेमिलें.

मि० शेर महमदखान आक्टि० तहशिलदार, मंगरूळ यांस गेल्या १ ले तारखे पासून दीड महिन्याची हक्काची रजा दिली. आणि त्या रजेंत रा. रा. रामचंद्र अंबादास यांस तहशिलदार नेमून शेंवटील नायब तहशिलदारीवर रा. रा. गणपत यादव शहानवीस यांस नेमिलें.

येथील लोकप्रिय पोलीस इन्स्पेक्टर मि० धोंडजी यांची बदली मलकापूर येथील मंडळींनीं त्यांस ग्रेन मार्केट मध्यें काल प्रातःकाळी ८॥ वाजतां मोठ्या थाटानें पानसुपारी दिली ह्या वरून हे किती लोक प्रिय होते हे सहजच कळून येईल.

NOTICE

Under rule 12 of the Municipal rules, it is hereby published for general information that election to fill up the vacancy caused by the resignation of Mr. Gopal Hari Sawarkar an elected Member for ward No. I, shall take place from 7 Am. to 5 P M. on the 27th June 96 at the Patels' Chowri.

The nomination papers will be received by Mr. Shaik Ismail Extra Assistant Commissioner before the 20th June 96.

Akola
Dated 5th June 96

Md. Husain
Secretary
Municipal Committee
Akola.

नोटीस

नोटीस— सखाराम भगवंत कुळकर्णी मौजे सिलोडे ता० अकोले जिल्हे अकोला यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते की माझी मातोश्री नामे यमुनाबाई मर्द रेडाजी रोम इजकडेस तुमचे गहाण खताचें दस्तैवजावरून मुद्दल रुपये ९०० कर्ज देणें आहे तें तिणें तुह्मांस गहाण दिलेला माल मी खरेदी घेतलीं आहे. त्यावरून तुमचे गहाण खताचे रुपये मी देण्यास जबाबदार आहे. करितां तुमचे व आमचे समक्ष ठराव जगन्नाथ.जीतमल यांचे दुकानांत झाल्या प्रमाणें तुमचे सांगण्यावरून आह्मी तुमचे रुपये मुद्दल रुपये ९०० आणि त्याचे व्याज ता० २७।५।९६ इ० पावेतो जे होईल तें असें आह्मी वरील तारखेस जगन्नाथ जीतमल यांचे दुकानांत तुह्मांस देण्या करितां जमा केलें आहेत. ते तुह्मी नोटीस पावल्या बरोबर साहू मजकूर अकोलें याचे दुकानातून तुह्मी आपले रुपये घेऊन जावे जर तुह्मी रुपये नेणार नाहीं तर ज्या तारखेस आह्मी रुपये जमा केले आहेत त्या तारखेपासून व्याजाबद्दल आह्मी बिलकूल जबाबदार नाहीं. आणि तारखेचे पुढें तुमचें रुपयास आह्मी व्याज देणार नाहीं आणि सदर्हू रकम तुह्मी त्याजपासून घेऊन आमचा दस्तैवज आणि रीतिप्रमाणें पावती वगैरे सर्व कागद साहू मजकूर याज पाशी द्यावें. जर तुह्मी असें केलें नाहीं तर त्या संबंधानें कायद्या प्रमाणें गहाण सोडविण्याची तजवीज करावी लागेल त्याजबद्दल जो खर्च होईल तो आणि या नोटीशीसुद्धां सर्व तुमचे देणें आहे त्या रकमेतून वजा करून घेतली जाईल. कळावें. ता० १।६।९६ इ०

( सही )

जानाई मर्द सखाराम धोंड रहाणार पळसोद ता० अकोला निशाणी बांगडी.

नोटीस

ईश्वरीलाल मांगीराम मारवाडी रहाणार भोनगांव हल्लीं वस्ती जयपूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझे अज्ञान अवस्थेत माझा बाप चंपालाल मरण पावला त्यावेळीं माझी असलेली एकंदर मालकीची इस्टेट स्थावर जंगम व नगदी दस्तैवज वहीखोत वगैरे सर्व व्यवस्था करण्यासाठीं व अज्ञानाचे पालन करण्यासाठीं फौजदारी अनुक्रम नंबर ११७ मिसल नंबर १७ सन १८९३ इ० चे विद्यमान स्पेशल अ० क० साहेब बहादर कोर्ट अकोलें यांचे हुकुमावरून पालन कर्त्याचे तुह्मास सर्टिफिकीट मिळाले आहे आणि माझी सर्व इस्टेट तुमचे ताब्यांत व्यवस्थे करितां दिली गेली. करितां आतां या नोटिशीनें तुह्मांस असें कळविले जाते कीं हल्लीं मी सज्ञान झालो असून माझी इस्टेटची मी स्वतः व्यवस्था करण्या करितां हल्लीं मी तयार आहो करितां ही नोटीस पावल्या दिवसा पासून १५ दिवसाचे आंत एकंदर सर्व इस्टेट माझे ताब्यांत द्यावी आणि आज पावेतो सदर्हू इस्टेट बद्दल व्यवस्था केल्याबद्दलचा हिशेब वरील मुदतींत तुह्मी आह्मास द्यावा जर देणार नाहीं तर रीतिप्रमाणें तुह्मावर दावा आणून त्या संबंधानें होईल तो खर्च तुह्मास द्यावा लागेल. वरील मुदतींत इस्टेट ताब्यांत न दिली तर इस्टेटची गैरशिस्त उपयोग केला असें समजून तुमचेवर विश्वास घाताची फिर्याद केली जाईल. कळावें तारीख ६।५।९६ इ.

[ सही ]

घासीलाल चंपालाल मारवाडी रहाणार भोनगांव ता० खामगांव दस्तुर खुद्द.

नोटीस

नोटीस बेशमी— जगु वल्लद रोडबा राहाणार सुगोडेकर ता० खामगांव, गुणवंतराव सुगोडकर, शिताराम वल्लद नवलाजी, रहाणार भोनगांव, मका वल्लद रामदीन परदेशी राहणार भोनगांव, रामू वल्लद महादु माळी भोनगांव, एकोबा वल्लद विठोबा रा० भोन, बापुजी वल्लद अन्याजी पाटील भोनगांव, ईश्वरीलाल कणीराम मारवाडी रहाणार भोनगांव, शिवलाल गुलाबचंद रहाणार भोन, धन्नामल कणीलाल मारवाडी रहाणार भोन ता० जळगांव, तुकाराम वल्लद चंद्रभान रा० भोन, जानु भोई रा० भोन तालुके जळगांव, नारायण वल्लद एकोबा पाटील राहाणार भोन ता० जळगांव यांस घाशीलाल चंपालाल मारवाडी रहाणार भोनगांव ता० खामगाव याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा बाप चंपालाल गिरधारीलाल हा मरण पावला त्या वेळीं मी अज्ञान होतो. माझे पालन करण्याचें सर्टिफिकीट ईश्वरीलाल कणीराम मारवाडी रहाणार भोनगांव यांस सन १८८४ सालांत मिळालें व स्थावर जंगम माल सदर्हू इसमाचे ताब्यांत दिले हल्ली मी सज्ञान झालो आहे सबब ज्या ज्या लोकाकडेस माझे मालकीची जमीन आहे ती जमीन ईश्वरीमल कणीराम यांनीं लाऊन काढली आहे व पट्ट्यांनी घेतली आहे. अगर स्वामीत्वानें घेतली आहे त्या सर्वांना या नोटिशीनें कळविलें जाते कीं सदर्हू जमीन साल मजकुरी ज्यांनीं पट्ट्यांनीं, अगर स्वामीत्वानें केले असेल त्यांणीं ती स्वामीत्वाची रकम मजला देऊन माझी पावती घ्यावी माझे विचारल्या वांचून ईश्वरीलाल कणीराम यांस कोणी पैसा देऊं नये ही नोटीस लिहून दिली. सही. ता० ६।६।९६ इ०

( सही )

घासीलाल चंपालाल मारवाडी रहाणार भोनगांव द. खु.

## वर्तमानसार.

हलके जातीचें केरोशीन तेल चांगले जातीचे तेलांत विकण्याचे गुन्ह्यावरून नुरभाई महंमदअली व फिदाअली बाकरअली या उभय वेहऱ्यावर बरेच दिवसापासून ख. ब. दस्तुर यांचे पुढें खटला चालून त्याचा निकाल गेले गुरुवारीं झाला, उभय आरोपीस ५००।५०० शें रुपये दंड झाला व दंडाची रकम न भरल्यास ३-३ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. दी. बं.

टोणग्याची मिरवणूक –मुं. वै.स पुण्याचा एक बातमीदार लिहितो कीं, गेल्याचे मागील बुधवारीं एका लष्ट टोणग्यास पुष्पांनीं व वस्त्रांनीं शृंगारून मोठ्या रस्त्यानें मिरवीत मिरवीत व टोणगे बहाद्दर की जय ' ' हेले बहाद्दर की जय ' ' ह्मशा बहाद्दर की जय ' अशी गर्जना करीत ओंकारेश्वराच्या महाद्वारापुढें नेऊन उभा केला. हा टोणगा मनुष्याबरोबर बोलतो असा शहरभर पुकारा झाला होता; त्यामुळें लोकांची पुष्कळच गर्दी झाली होती. गाढवाच्या लग्न समारंभा सारखीच ही कांहीं तरी नक्कल पुणेकरांनीं केलेली असावी ! !

दलाली करणाऱ्या ७ जणांचीं नांवें गेल्या आठवड्यांत वायव्यप्रांताचे हायकोर्टीच्या फुलबेंचानें पाटीवर लाऊन नवीन झालेल्या कायद्याच्या अंमलबजावणीस सुरवात केली. स. शो.

हल्लीं जपानांत २११८ मैल लांबीची रेलवे आहे. अगदीं प्रथमतः तिकडे इंग्लंडांतून रेलवेचें सामान जात असे. पुढें तें जपानी लोक अमेरिकेहून आणूं लागले. हल्लीं तर ते आपल्याच देशांत इंग्लिश इंजिनियरांच्या हाताखालीं तें सामान तयार करितात. याचें नांव उद्योग.

एकंदर पृथ्वीवर लोक वस्ती सुमारें १२७ कोटी आहे व त्यांपैकीं दरसाल ३० कोटी २२ लक्ष मनुष्यें मरतात ह्मणजे प्रत्येक मिनिटास ६७ मनुष्यें मरतात व ७० मुलें जन्मतात.

दावानल– कांग्रो प्रांतांतून आलेल्या बातमीवरून असें समजतें कीं, तिकडील प्रांतांत पुराणांतरीं वर्णन केल्याप्रमाणें एक दावानल [ मोठा प्रलयाग्नि ] पेटला असून तो वाटेंत येणारीं शेतें, खेडीं, जंगलें वगैरे सर्व जाळीत चालला आहे. एका बाजूनें दावाग्नि व दुसऱ्या बाजूनें दुष्काळ असें झाल्यामुळें तेतिकडील लोकस्थिति अतिशयच वाईट झाली आहे. इं. प्र.

मास्को ता. ३० मे राज्याभिषेकाच्या वेळीं लोकांना मेजवानी देण्यांत आली. त्या वेळीं लाखो लोक जमले होते. त्या जमावांत २००० लोक पायाखालीं चिरडून मेले.

" मद्यपी मनुष्यांचीं मुलें बहुतकरून बदमाष निपजतात असें अनेक उदाहरणांवरून सिद्ध झालें आहे. " हें वाचून दारूबाज लोक सावध होतील काय ?

रत्नागिरीची काळीबाजू फारच वाढली आहे असें कोणासही दिसेल. दाहावीस वर्षांपूर्वी येथें वेश्यांची संस्था अगदीं थोडी होती; परंतु आतां ती दसपटीनें कीं वीसपटीनें वाढली आहे ह्याचा पत्ता नाहीं. आजकाल येथें भरवस्तींतून ठिकठिकाणीं वरघण्यांगनाच्या जणूं गोठणीच होऊन राहिल्या असून बीभत्स प्रकार, चोऱ्या, हाणामाऱ्या ह्यांचें पीक आणखी किती पाडास येईल ह्याचाही नेम नाहीं ! हा अनाचाराचा ऊत येथें कां व कोठून बरें यावा ? येथें गेल्या १० सालांत शिक्षणालयांची समृद्धि झाली आहे; सभा व्याख्यानें धूम चाललीच आहेत; देशस्थिति सुधारण्याचा विचार करणारीं माणसें आपलीं डोकीं व लेखण्या झिजवीत बसलींच आहेत, मग असल्या चौकी पाहाऱ्यांतून नीतीवर दरवडा घालणाऱ्या चोरांचा जास्त जास्त प्रवेश कां बरें व्हावा? आकोल्यासही हा प्रकार पुष्कळ आढळतो.

नदीला बांध घालून पाणी नेण्याचा हक्क—खेड्यापाड्यांत नद्याला बांध घालून तें पाणी शेतकीस नेण्याचा लोकांचा पूर्वाचार हक्क सर्वत्रच आहे ह्या हक्काप्रमाणें बरद्वान परगण्यांतील २ गांवचे लोक बंका नदीला धरण बांधून शेतकीस पाणी नेत असत; परंतु बंगालचे लेफ० गव्हर्नरांनीं एक जाहिरनामा लावून सदर नदी हा एडन कालव्याचा एक भाग आहे; सबब पाणी पट्टी दिल्याशिवाय नदीला बांध घालून पाणी नेऊं दिलें जाणार नाहीं असें फर्माविलें होतें. खुद्द बंगाल सरकारानें जरी हा हुकूम फर्माविला होता, तरी त्याला न भितां आपलें कर्तव्य आहे असें समजून सदरहू गांवकऱ्यांनीं बरद्वानच्या कोर्टांत बंगाल सरकारावर दावा लावला. त्याचा हुकूम नुकताच होऊन सदरहु जाहिरनामा गैरशिस्त आहे व गांवकरी लोक सदरप्रमाणें पाणी पट्टी बसविण्यास पात्र नाहींत असें कोर्टानें ठरवून बंगाल सरकारावर दावा देवविला हा निवाडा खेड्यांतील लोकांनीं टिपून ठेवण्या सारखा आहे. स. शो.

निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंची फळ. आह्मी असा निश्चय करून कट केला कीं आमचें फारच मोठें हित होईल. दिवसभर खपूनही पोटभर अन्न मिळत नाहीं अशी जी आमच्या हजारो किंवा लाखो भाऊबंदाची स्थिती झाली आहे ते आमच्याकरतां कापड तयार करण्याच्या गिरण्यांत कामावर लागतील; हजारों लोक चांगला व जास्त कापूस पिकविण्याच्या मार्गे लागतील, कापूस व कापड यांची आण ने करण्याकरतां हजारों हमाल व गाड्या यांचा रोजगार चालूं होईल. लव्हार, सुतार, चांभार, कुंभार, इत्यादीकांचा धंदाही त्या मानानें वाढेल, आणि शेवटीं आह्मी व आमचा देश चांगला सुखी व संपन्न होऊन आह्मी आपल्या पूर्वजांसारखे लौकिकवानही होऊं. हा असा प्रकार व्हावा अशी आमची इच्छा नाहीं काय? नाहीं कशी; आमची तशी इच्छा आहेच, व तसा आनंदाचा दिवस येण्याकरतां आह्मी तसा निश्चय करूंच.

शिकंदराबाद व दाद्री यांच्या दरम्यान मुंबईहून पंजाबास जाणाऱ्या डाकेच्या आगगाडीस आग लागलेल्या पोष्टाच्या डब्यांत टपालच्या पत्रांनीं भरलेलीं एकंदर ४५ पोतीं असून त्यांत निदान ५०,००० तरी पाकिटें, कार्डे, वगैरे होतीं त्यांपैकीं सुरक्षित पत्यांचीं अशीं फक्त ३०० सांपडलीं तीं निकडच्या तिकडे पावतीं केलीं. बाकीच्यांची राख झाली. त्यांत कित्येक सोन्या चांदीचीं घड्याळें जळालीं; वेगळाल्या प्रकारचे कित्येक दागिने जळाले, विमा उतरल्यावाचून नोटा वगैरे पोष्टांतून पाठविण्याचा जी लोकांची रीत आहे त्यामुळें नोटी वगैरे किती जळाल्या असतील याचा पत्ताच नाहीं, बंग्या व पार्सलें यांत लोकांचा कोणत्या प्रकारचा किती माल होता हें समजण्यासही कांहीं साधन नाहीं.

राज्याभिषेकाच्या आनंदोच्छवाच्या वेळीं रशियन बादशहानें एक जाहिरनामा लाविला व त्यांत प्रजेकडे थकलेल्या करांचा वसूल माफ करून १० वर्षेपर्यंत जमिनीचा धारा निमे केला. पुष्कळ कैद्यांच्या शिक्षाही कमी केल्या. इंग्रजी राज्यांत अशी सूट कधीं मिळेल काय? ठा. अ.

स्वदेशी कपड्यांचा अभिमान— नेपाळच्या महाराजांनीं आपल्या लष्करांत सर्व शिपायाचे पोषाख देशीकपड्याचे बनविण्याचा हुकूम केला आहे असें कळतें. फारच स्तुत्य.

एका डॉक्टरानें ३० वर्षे अनुभव घेऊन असें सिद्ध केलें आहे कीं ज्या लोकांस सुगंधी पुष्पें व अत्तरें वगैरेचा सुवास घेण्याची संवय असते त्यांचें मन फार अशक्त व नाजुक असतें.

आफ्रिकन लोकांत आत्महत्या करण्याचा विचित्रच प्रकार आहे: न्यासा सरोवराचे जवळ राहणोर लोक आत्महत्या करण्याची असली ह्मणजे सदर सरोवरांत उतरून बऱ्याच लांब पर्यंत पायीं चालत असतात, व तेथें एखादा मगर येण्याची शांतपणें वाट बघत उभे राहतात. मगर आला ह्मणजे अर्थात तो ह्या मुमुर्षूस आपल्या कालद्दाररूप भयंकर जबड्यांत घेऊन उदरांत प्रदेशांत पोंचवितो! ज्ञा.च.

सोलापूर—येथील असि० स्टेशन मास्तर मि० ईझिंग्टन यांनीं रा. नारायण रामचंद्र राळेरासकर नांवाच्या एका इसमास, तो टिकिटाशिवाय प्लाटफार्मवर आला ह्मणून, गचांडी देऊन बाहेर घालविलें. त्याबद्दल सदरहू इसमानें मि० ईझिंग्टन यांजवर अन्यायाचे बळजेरीबद्दल मे० देशमुख साहेब दि० माजिस्ट्रेट यांजकडे फिर्याद केली. तिची चौकशी होऊन मि० ईझिंटन यांस १ रुपया दंड झाला. क. त.


## घड्याळ

किंमत ६ रुपये हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटो प्रमाणें वॉच घ्या. ८०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.



आह्मी स्विट्झरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे फिरविण्यास ठेच असून सेकंडकाटा आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस ज्युवेल [ ह्मणजे चकचके खालीं वर हिरे ] बसविले आहेत. ज्या घड्याळास रुबी ज्युवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।१ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. ने० घड्याळ पाठवूं.

टीप:– " गिऱ्हाइकास घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

**गोविंद महादेव पाळे.**

१२-२४ वाचमेकर आणि रिपेरर नासिक.


### नोटीस

खुशाल वा जानजी पाटील भाकरे व सजन जवजे मारुती भाकरे राहणार मोरगांव भाकऱ्याचें यांस तुह्मास ता. २४ जून १८९६ रोजीं नोटीस देऊन कळविल्या प्रमाणें तुह्मी केलें नाहीं. पुनः तुह्मास जनावितो. मोरगांवचा नंबर ८ पैकीं जमीन एकर ५८५ आकार रुपये ८ ची तुह्मी सोडीत नाहीं. तर त्य जबद्दल गुदस्ताचे रुपये ४० व नोटीस खर्च यांस दोन रुपये शेकडा व्याज व चालते सालचे रुपये ४० व या नोटीसीचा खर्च व जमिनीचा ताबा घेण्याची फिर्याद तुह्मावर करून रुपये व ताबा घेऊं हें कळावें ता. ४।६।९६ इसवी.

( सही )

अमृतराव आबाजी कर्णीक द. खु.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आमचा मुलगा बालमुकुंदगीर सिवचरणगीर यांचें वर्तन आमचे आज्ञेबाहेर असल्यानें त्यास आह्मी बरेंच दिवसा पासून घरा बाहेर काढून दिलें आहे सबब सदहू मुलासी कोणी कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये त्याच प्रमाणें त्याजवर आमचे परवानगी वाचून आणि न कळत जे व्यवहार त्यांनीं केले असतील त्यास किंवा नवीन करील त्यास आह्मी जबाबदार नाहीं. या विरुद्ध कोणाकडून झाल्यास त्याचे बद्दल आह्मांवर कोणतेच प्रकारचा जोखीम नाहीं या साठीं या साठीं या जाहिरातीनें कळविलें आहे ता. ४।६।९६ इसवी.

( सही ) सिवचरनगीर रामगीर बस्ती आकोला दस्तूर खुद्द.

हे पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,,१ ८

फिरकोळ अंकास .... .... .... ८४

नोटिशी बद्दल.

१० ओळींचे आंत रु० १

दर ओळीस .... ०।८६

दुसरे खेपेस .... .... ८।

Annual in arrears 7 ,, 1 R,

Six monthly ... ... ... 3 ,,

Single copy ... ... ... ... 4

Advertisement.

Below 10 lines ... 2 1

Per line over 10 ... 4

Repetition Per line 3


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXX AKOLA MONDAY 15 JUNE 1896 NO 23

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १५ माहे जून सन १८९६ इ० अंक २



### घड्याळ

**किंमत ६ रुपये हमी ३ ची**

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटो प्रमाणें वॉच घ्या. ८०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे फिरविण्यास ठेच असून सेकंडकाटा आहे. चावी देण्यास मोगरा आहे डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस जुवेल [ ह्मणजे चक्राचे खालीं वर हिरे ] बसविले आहेत. ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. ने० घड्याळ पाठवूं.

टीपः– " गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

**गोविंद महादेव पोळ.**

९२–२४ वाचमेकर आणि रिपेरर नासिक.


---

नोटीस.

रा० रा० देवराव अवधूत पाटील राहणार असेगांव यांस.

खालीं सहीकरणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझ्या मालकीच्या मद्दीच्या बाबतींत झुऱ्या वल्लद सोनाजि याचे नांव पुढें करून माझ्याशी दगलबाजी केली त्याबद्दल तुमचा जबाब योग्यवेळीं सरकार घेतीलच. मौजे असेगांव येथील माझ्या मालकीचीं दोन शेते भांडावाले व अंब्यावाले अशी नांवें आहेत ती दोन शेते तुह्मास पांच वर्षाच्या कौलानें देण्याचा मानस होता तेव्हांच्या विचाराप्रमाणें के : तीच अठपाळ्णी नाहींत सबब मी माझी शेते तुमच्याकडे वहितीस देण्यास बिलकूल राजी नाहीं या उपर तोंडि केलेलो मनाइ न जुमानता आणि या दाखिल नोटिशीस ही न जुमानता जर तुह्मी सदरहु शेतांत पाय टेवाल तर तुह्मावर फौजदारी केली जाईल. आणि तुमच्या कृतीमुळे माझें जे जे नुकसान होत आहे आहे तें सर्व या नोटिसिच्या खर्चासुद्धां कोर्ट मारफत भरून घेतलें जाईल. कळावें, तारीख १२ माहे जून सन १८९६ इसवी.

( सही ) गुजाबाई मर्द गंगागीर गोसाई राहाणार आसेगांव निशाणी खुद हातची बांगडी असें

---

नोटीस.

१. राणू वल्लद जानजी कुणबी राहणार भंडारज.

१. गणपत वल्लद अर्जुनजी गीते राहणार भंडारज.

१. शंकर वल्लद जानजी गीते राहणार भंडारज.

१. जानू वल्लद भोपतजी मंगळें राहणार भंडारज.

१. पुंजप्पा सोनार राहणार भंडारज.

१- बालू रजपूत राहणार भंडारज.

१. मळ्या वल्लद अर्जूनजी राहणार भंडारज.

१. लक्षुमण वल्लद टुलाजी राहणार भंडारज.

१. नटव्या न्हावी राहणार भंडारज.

१. मारुती वल्लद अवच्युत राहणार भंडारज

१. सय्यद हातम मुसलमान राहणार अंजनगांव.

१. हुसेन मक्तेदार राहणार भंडारज

१. गंगाराम कृष्णपक्षी राहणार सिरसोली तालुके अकोट जिल्हे अकोले.

१ गणू पाटील जात कुणबी राहणार राणेगांव तालुके अकोट.

---

१४

वरील सर्व इसमांसः—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा मुलगा नामे पुंजाजी झापे हा अज्ञान असून तो वाईट चालीचा आहे सबब तुह्मी, तो तुह्माकडे रुपये मागण्यास आला असतां रुपये देऊं नये. त्यांची जबाबदारी मजवर नसून ते रुपये मी देणार नाही व तो अज्ञान असल्यामुळें तो ही जबाबदार राहणार नाहीं. आजपावेतो त्यास कोणी रुपये दिल्हे असल्यास त्याची जबाबदारी मजवर नाहीं. जर कोणीं अज्ञानापासून दस्तारेवज घेईल तर त्याजवर मला फौजदारीत फिर्याद करणें भाग पडेल कळावें तारीख दोंन माहे जून सन १८९६ इसवी.

( सही ) निशाणी रुखमाबाई मर्द रावजी झापे राहणार भंडारज इची असें.

---

नोटीस.

अजनगांव, सातेगांव, भंडारज, चौसाळ, कारल.

वरील गांवच्या सर्व सावकार लोकांस.

खालील सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं माझा मुलगा पुंजाजी झापे हा अज्ञान असून वाईट चालीचा आहे ह्मणून त्यास कोणी पैसा देऊं नये. दिल्यास त्याची जबाबदारी मजवर नसून अज्ञानावर ही नाहीं कळावें. तारीख दोन माहे जून सन १८९६ इसवी.

( सही ) निशाणी रुखमा मर्द रावजी झापे राहणार भंडारज इची असे.

---

## गप्पाष्टक.

( मा॰ अं० ब० )

ठराव, २. व्यक्तीचा संसार प्रपंच आणि व्यक्तिसमुदायाचा अथवा समाजाचा संसार राज्य दोन्ही संसार प्रत्येक व्यक्तीनें मोठ्या आस्थेनें, सुखाचा व लौकिकाचा पूर्ण अभिलाष धरून वाखणण्या जोग्या रीतीनें केलें पाहिजेत. राजा विष्णु नव्हे; राज्य राजाचें नव्हे तें लोकांचें आहे. प्रपंच मायेचा नव्हे; तो माणसाचा आहे. प्रपंच पद्धति आणि राज्य पद्धति माणसाच्या हिता करितां आहेत व त्यावर सर्व प्रकारची सत्ता प्रत्येक माणसाची आहे. प्रत्येकानें दोहोंची काळजी घेतली पाहिजे. स्वतःच्या स्वातंत्र्या करितां आणि सुखाकरितां दोहोंचाही त्यानें अभिमान बाळगिला पाहिजे. राज्याशीं आणि संसाराशीं व्यक्तीचा एक जीव झाला पाहिजे. उत्तम रीतीनें हा लहान मोटा संसार ज्याला करितां येणार नाहीं तो परमार्थ साधनाला कधींही योग्य होणार नाहीं. संसार परमेश्वरापासून माणसाला विभक्त करितो हा समज खोटा आहे, त्याच प्रमाणें संसार स्वभावतः दुःखमय आहे हाही समज चुकीचा आहे. माणसाच्या चुकीमुळें आणि अज्ञानामुळें संसारांत दुःखाचा जरी बराच अंश आढळून येतो तथापि कालावधीनें आणि विचारानें तो नाहींसा करून टाकितां येणार आहे यांत संशय नाहीं. रोगरहित सदृढ शरीर, सर्वार्थ साधक नीति आणि सर्वभेदक बुद्धि ही तीन संसार सुखाचीं मुख्य साधनें होत; तीं प्रयत्नानें प्राप्त करून घेतलीं असतां संसारांतील सर्व दुःखांचें निर्मूलन होईल. या तिन्ही वस्तु परिस्थितीशीं झगडून तुह्मी हस्तगत करून घ्या. खरें मोठपण मिळविण्याकरितां प्रपंचांत माणसाला मोटालीं क[ामें] करावयाचीं आहेत. प्रपंचांत जो करंटा परमार्थांत कोठलें भाग्य काढील ? प्रपंच आणि परमार्थाचें वांकडें नसून प्रपंचहि [पर]मार्थ शिक्षणाची शाळा आहे; किं[बहुना] प्रपंच हाच परमार्थ होय अनेकविध सुख यथेच्छ लाभ घेत, आपलें अनेक प्र[कारचीं] कर्तव्य यथासांग बजावीत, स्वातंत्र्य [सुख] समृद्धि यांची भरपूर जोड करीत, [...] ज्ञान आणि बल काबीज करीत प्रत्येक[ानें] उत्तम प्रकारें संसार करावा.

ठराव ३. समाधानांत सुख मान[ण्यास] [शि]कविलेले [...] स कोणी ही फसवून घेऊं नये. [...] पाहिजे [...] हव्यासांत आहे. खरें सुख प्राप्तींत [...] ज्ञानाविषयीं, लौकिकांविषयीं, सुखा[...] संपत्ति विषयीं, स्वातंत्र्या विषयीं पर[...] हव्यास असूं द्या. वैराग्य, संन्यास, [...] क्षय, कर्म फलत्यागाचा योग इत्यादि [...] ज्यांच्या आटोक्या बाहेर असा[...] त्या तूर्त खोट्याच आहेत व ह्मणून [...] चें हित करणार नाहींत. तुह्मी रा[...] विसरा व आपल्या कोशांत ही त्यांस ताळ लावा. अगोदर येथलें राजे व्हा; अ[...]गोदर येथें सुखी व संपन्न व्हा. समाधान हा आळशाचा वेदांत आहे. खऱ्या संसारिकाचा धर्म उद्योग होय. तुमच्या अंतःकरणांतील सर्व मनोरथ पुरवून घ्या; जें पाहिजे असेल तें अनुकूळ करून घ्या. आपला कार्य भाग साधला ह्मणजे निराळें होऊं [नका]. ज्या दुबळ्यांचा साधला नसेल [त्यांस] सबल करून त्यांसही सुखी करा. अ[...] यत उद्योगानें सर्वांचे कल्याण केलें [...] फुकाच्या पोकळ समाधानानें कोणीही [...]र्थ झाला नाहीं. उद्योग, कर्तव्य, सुख [...]त्र्य आणि ज्ञान यांचे पायीं मरण येणें [...] माधानानें काष्टासारखें जगण्यापेक्षां [...] श्रेयस्कर होय.

ठराव ४ ज्या थोड्यांना तपाचरण [...] याचे असेल त्यांना एकीकडे बसूं देऊन फल[...]हार अथवा उपवास करूं द्यावा बाकी[च्या]नीं उत्साहानें प्रपंच करण्यासाठीं आणि [परा]क्रमानें राज्य करण्यासाठीं आवश्यक वाट[ल]्यास खुशाल मांसाहार करावा. त्वेष, वेश, उल्हास सतत कायम राखण्यास [...] आवश्यक वाटल्यास उत्तम मद्यांचे परिमित प्राशन ही करावें. दिन चर्येंत आहार आणि व्यायाम हीं मुख्य कामें समजावींत. शरीराच्या सत्तानें जर तुह्माला पुष्कळ मेहनतीचीं कामें करावयाचीं आहेत तर शरीरें जितकीं धिप्पाड, दांडगीं व राकट करितां येतील तितकीं करणें जरूर [...] किती ही श्रमाला न जुमानण्या इतकी रग आंगात राहिली पाहिजे शरीर दृढ व दीर्घ करण्या करितां व राखण्या करितां आणि आयुर्मर्यादा वाढविण्या करितां खाद्य पेयांत

फेरबदल करणें इष्ट दिसेल ते खुशाल रावेत. अन्न परब्रह्म आहे अशी श्रुति आ- तेव्हां प्रत्येकानें भोजनाचें काम देवतार्च- तकें आस्थेनें केलें पाहिजे.

ठराव ५ प्रत्येक व्यक्तीनें उत्तम शरीर ऊगून शिपाईगिरीच्या कामांत प्राविण्य पादन केलें पाहिजे. ज्ञानाची आणि सु प्रत्येकास इच्छा असली पाहिजे तशी- र्यांची ही आवड असली पाहिजे. स्व- रक्षणा करितां प्रत्येक स्त्री पुरुष, तरुण आणि वृद्ध या तिनही अवस्थेंत त्या मातृभूमीचा बंदा शिपाई आहे परत्वें सर्व कामें तुमचींच आहेत. वेळीं तुह्मी भोगी व्हावे, सभेंत त व्हावे आणि संकट समयीं समर शूर शिपाईही बनलें पाहिजे. शिपाई काय काम करील? युद्ध प्रत्येकानें अभ्यास केला पाहिजे, ाचीं कामें करून प्रत्येकानें धाडशी ाहिजे व द्रोणाचार्यांस गुरू करून धनुर्विद्या आमरण सज्ज राखि- सारे राष्ट्र नखशिखांत क्षत्रिय हिजे.

व ६. आर्यभूमीचा व आर्यपूर्वजांचा अभिमान बाळगा. जीवानें तुह्माला या अभिमानानें तुह्माला टाकूं सेवा करण्याचें आणि त्यांचा ार करण्याचें तुमचें व्रत असूं नाला सोडून आपला घात क आर्यपुत्रानें इमानानें आ- व्य बजाववें अशी आर्यमातेची इ- आहे.

पुढें चालू.

त्रैमूर्ति

वऱ्हाडसमाचार

धिक जेष्ठ शुद्ध ४ शके १८१८

## स्वदेशी कपडा.

पती कापड होईल तितकें न वा- सा उत्तरोत्तर लोकांचा पक्का ग्रह ला आहे ही मोठी आनंदाची गो- थोड्या महिन्यांच्या अवकाशांत कपड्याविषयीं लोकांच्या मनांत प्रे- ा जडत चालली तथापि ही च- ाप चांगली सार्वत्रिक व सर्वमान्य हीं. इंग्रजी कापडाच्या सुबकप- स्वस्त भावाला लोक अजून भूलतात, ची जातीचें देशी कापडच मिळ- आणि सांप्रतच्या चळवळीची ओ- शहानिशा लोकांस नीटशीं झालेली शिवाय बाजारांत देशी कापड नें व सहजावारीनें गिऱ्हाइ- वियास पाहिजे तसें मिळत नाहीं. ी कपड्याचा खप जारीनें वाढ- ी अडचण पडते. कांहीं ही अ- डथळे आले तरी आतां ही गोष्ट निर्विवाद ठरली आहे कीं चालू देशी कपड्याच्या चळवळींत कांहीं राम आहे, ती निरर्थक नसून देशाच्या कल्याणाची व भावी उद्योगवृद्धीची एक मोठी पताका आहे आणि तीच सतत प्रयत्नानें ती चळवळ कायम व प्रसृत केली तरच आपल्या देशास एक निराळेंच उत्तम शिक्षण आपोआप मिळण्याचा संभव आहे.

देशी कपड्याच्या चळवळीला चांगला जय यावा ह्मणून मुंबईच्या 'प्रभाकर' पत्रकर्त्यांनीं प्रदर्शनाचा नामी उपाय सुचविला आहे. एक वेळ देशी उपलब्ध कापडाचें प्रदर्शन भरविलें. ह्मणजे निरनिराळ्या पदार्थांची वर्गवारी करून प्रत्येक वर्गाचें वर्णन पुस्तक रूपानें तयार करवावें. त्यांत भिन्न भिन्न जातीच्या कापडाचें उत्पत्तिस्थान, तें बनविण्याच्या तऱ्हा, त्याचा उपयोग, टिकाऊपणा, दर, भाव इत्यादि माहिती बरोबर द्यावी ह्मणजे प्रदर्शनापासून व अशा वर्णनात्मक पुस्तका पासून देशी कापडा विषयीं लोकांची चांगली ओळख होईल.

गावोगांव देशी कापड सर्व प्रकारचें पाहण्यास देखील मिळत नाहीं. ही अडचण दूर करण्यासाठीं व देशी कापडाचा खप व विक्री वाढविण्यासाठीं पुणें, मुंबई, नगर, सोलापूर इत्यादि प्रसिद्ध शहरांतल्या प्रमाणें निव्वळ देशी मालाची दुकानें नवीन निघालीं पाहिजेत. हीं दुकानें मंडळ्यांनीं निराळें भांडवल उभारून काढावीं ह्मणजे भागीदार दुकानचे गिऱ्हाईक सहजी होतात व त्यांच्या अनुकरणानें दुसऱ्या गिऱ्हाईकांची संख्याही पुष्कळ वाढते. अशा कंपन्यांपासून दुकानदारींत नफा होतो आणि देशी कपड्या विषयीं लोकांची श्रद्धा वाढते.

अर्थ शास्त्राचा एक ठोकळ नियम आहे कीं जरूर लागली कीं पुरवठा होऊं लागतो. लोकांची मागणी देशी कपड्या विषयीं होऊं लागली कीं तो माल पुरविण्यासाठीं देशी कारखाने आपोआप वाढतात ही गोष्ट हळू हळू प्रत्यन्तरासही येऊं लागली आहे. आरंभीं विलायतच्या कपड्या इतका देशी गिरण्यांतील मालाचा भरपूर पुरवठा होणार नाहीं हें खरें आणि याचकारणामुळें मि. दिनशा वाच्छा सारख्या निस्सीम देशभक्तास देखील देशी कपड्यासंबंधाची चळवळ निरुपयोगी व नुकसानकारक होईल असें वाटलें होतें. पण आमची ही चळवळ पूर्णतेस पोचण्याच्या कालापर्यंत वरील अडचण राहणार नाहीं. देशी गिरण्यांचीं कामें वाढलीं, कांहीं नवीन कारखानें निघाले व निघत आहेत आणि जरूरीच्या मानानें मालाचा पुरवठा वाढत जाईल अशी आशा येत चालली आहे.

---

जमिनीचा धारा वाढविण्या संबंधानें एक नवीन तत्व अलिकडे बाहेर निघालें आहे, आणि हें तत्व मुख्यत्वें करून रयतवारीच्या पद्धतीला विशेष लागू पडतें. हें तत्व प्रथम मद्रास सरकारानें प्रसिद्ध केलें आणि त्याचा प्रकाश सर्वत्र कृतीमध्यें स्पष्टपणें दिसून पडत आहे. मद्रास सरकारचे कौंसिलदार मि० ब्लीस ह्मणतात कीं रयतवारीच्या पद्धतीमध्यें सरकारचीं जीं कुळें असतात त्यामध्यें दोन प्रकार आहेतः (१) जे खरोखर जमीन वहित करितात असे लोक; आणि (२) ज्यांच्या नांवानें जमिनी आहेत पण ते स्वतां न वाहतां मोलमजूरीनें जमीन वहितीस देतात पहिल्या वर्गातल्या लोका संबंधानें कांहीं प्रतिकूळ ह्मणणें नाहीं आणि या वर्गातील लोक संख्याहि थोडी आहे. दुसरा वर्ग ह्मणजे सुखवस्तु मध्यम स्थितींतले जमीनदार लोक. हे लोक शेती वर जो फायदा मिळवितात तो सरकारी साऱ्याच्या वाढीनें कितीही कमी झाला तरी हरकत नाहीं. सारा वाढवितांना हें तत्व जर सरकारानें मनांत वागविलें तर यापासून अतोनात नुकसान आहे. वऱ्हाडांत जमिनीचे वहितदार असे खरे शेतकरी फार थोडे आहेत; आणि बहुत करून पुष्कळ लोक शेतीमध्यें मोलमजूरीनें राबणारे असे आहेत. कर्नल मेकेंझी यांनीं आपल्या अनुभवावरून जुडिशियल कमिशनर असतांना असें लिहून ठेविलें आहे कीं वऱ्हाडांतील पुष्कळ जमीन कुळांच्या हातून सावकार व पांढरपेशे सुखवस्तू लोक यांच्या ताब्यांत गेली आहे; आणि हीच गोष्ट दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्टपणे निदर्शनास येत चालली आहे. तेव्हां हल्लीं जो सारा वाढला जात आहे त्याचा बोजा मुख्यत्वें करून दुसऱ्या वर्गातील लोकांवर पडणार आहे आणि त्याच कारणानें या सुखी कुळांच्या स्वामीत्वामुळें सरकारचा सारा भारी आहे ह्मणून जमिनी परत करण्यांत येणार नाहींत जोपर्यंत शेतीच्या व्यापारांत कांहीं फायद्याचा अंश ह्मणून दृष्टीस पडतो तोंपर्यंत हे दुसऱ्या वर्गातील लोक जमिनी सोडणार नाहींत. त्यांच्यापाशीं पैशाचें बळ मोठें आहे पण गरिब शेतकऱ्यांचा नव्या वाढलेल्या साऱ्यामुळें चक्काचूर होणार आहे. सरकारची सारा वाढविण्याची जी घातुक पद्धत आहे तिचे परिणाम सध्यां गुप्त राहतील पण जेव्हां ते सव्याज उजेडांत येतील तेव्हां ते टाळण्याचा उपाय लोकांच्या व सरकारच्या हातीं रहाणार नाहीं.

रयतवारीची पद्धती जमिनीचा सारा वर्षानुवर्षे वाढविण्यासाठीं सुरू केली नाहीं. हे सरकारानें पक्कें स्मरलें पाहिजे. रयतवारी मध्यें जे कांहीं फायदे आहेत ते धारा वाढविण्याच्या पद्धतीनें अगदीं नाहींसे होतात. सरकार आपले स्वामी आणि जमिनीच्या स्वामीत्वाचा योग्य खंडणी दिल्या नंतर जमिनीचा उपभोग कुळास उत्तम प्रकारें घेतां येईल अशी सरकारनें राजनीति ठेविली पाहिजे. सध्या इसापनीतींतल्या सिंहाप्रमाणें सरकार प्रजेची जमिनींतील कमाई हरतऱ्हेनें लुबाडूं पाहत आहे हें राज्याच्या बळकटीस, प्रजेच्या स्वाथ्यास व आबादानीस वाईट होय आपलीं कुळें जमिनी स्वतां वहात नाहींत या सबबीवर सरकार सारा वाढवील तर जमिनीस किंमत ह्मणून कांहीं राहणार नाहीं, जमिनींत लोक पैसा घालणार नाहींत, आणि एकंदरीनें लोकांचा व सरकारचा तोटाच होईल.

---

मृत्यूची वार्ता जुनी झाली पण मृत्यूमुळें घडलेली हानी नित्य नवी नवी वाटत आहे. रायबहादूर नारायण स्वामी नायडू वकील हे नागपुरास मरण पावल्यामुळें आपल्या राष्ट्राची आणि मुख्यत्वेंकरून आमच्या प्रांताकडील प्रांतांची फार मोठी हानी झाली आहे! रायबहादूर अय्यासाहेबा सारखे लोकनायक फार विरळा पण त्यांच्या सकृतीचा, परोपकाराचा, व निरपेक्ष देशसेवेचा परिमळ मात्र चिरकाळ कायम राहील. अय्यासाहेबांचे पूर्वज मच्छलीपट्टणचे मूळचे रहिवाशी होते. साधारण गरीब स्थितींतून हे आपल्या दृढव्यासंगानें, सरळ व नेमस्त वर्तनानें आणि चित्ताकर्षक गुणानें मोठ्या श्रेष्ठपणाला पोहचले. वकिलीचा धंदा त्यांनीं १८६० च्या सुमारास आरंभला. त्यांत त्यांस उत्तम यशप्राप्ति व धन प्राप्ती झाली. स्वभावतां उदार असल्यामुळें यांचा पुष्कळ पैसा लोककल्याणाच्या कामाकडे लागला आहे. नागपुरास भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या कामा करितां ते इतके जीवापाड तनमनधनें करून खपले कीं वेळ पडली आणि पैसा लागला तर स्वतांचा राहता वाडा देखील विकण्यास ते तयार झाले होते. असा निस्सीम व अप्रतिम राष्ट्रीय सभेचा भक्त हरपला हें देशाचें दुर्भाग्य होय! मध्यप्रांतांतील बहुतेक सार्वजनिक कार्यांच्या किल्या आय्या साहेबांच्या हातांत असत आणि त्यांच्या नाममहिम्यानें लोक कार्यें निर्विघ्नपणें होत असत ईश्वर या महापुरुषाच्या आत्म्यास चिरकाल शांति देवो!

---

इजिप्तच्या मोहिमेवर जी इंडियांतून फौज पाठविली आहे तिचा खर्च इंडियाच्या खजिन्यातून करावा असा लार्ड हामिल्टन याचा मानस आहे पार्लमेंटपुढें अजून पक्का निकाल झाला नाहीं पण चिन्हें मात्र अन्याय करविणाऱ्या प्रवृत्तीचीं दिसतात. इंडियांतील लोकमत सरकारास ह्या बाबतींत दोष देतें इतकेंच नाहीं तर लंडन टाइम्स सारख्या वजनदार पत्रकर्त्यांस देखील स्टेट सेक्रेटरीची असली झाटिंगशाही आवडत नाहीं. इंग्लंडच्या राज्यवैभवाला इंडियानें मोठीच मदत केली आहे तेव्हां कृतज्ञतेनें किंवा इंडियांतील उदार राजनीतीच्या आठवणीनें तरी इजिप्तकडे धाडलेल्या फौजेचा खर्च इंडियांवर लादूं नये आणि जर सर्व विचारांवर पाणी सोडलें व हा खर्च बळजबरीनें इंडियाच्या खजिन्यांतून करण्यांत आला तर सर्व देशभर अशांतता व अराजनिष्ठा उत्पन्न होतील आणि ब्रिटिश राज्याच्या ऱ्हासास प्रारंभ होईल असें पक्कें मनीं समजावें. आफ्रिका खडांत इंग्लिश वसाहत स्थापणास इंडियांतून लष्करी व औद्योगिक कूमक मिळेते. फौजफांटा वाटेल तितका रवाना करण्यास मिळतो आणि कामकरी लोकांच्या पलटणीही धाडण्यास मिळतात. एवढी मोठी सामुग्री इंग्लंडचें वैभव आक्रमित वाढविण्यास मिळतें तेव्हां तिचा खर्च इंग्लंडनेंच पुरवावा हा खरा राजधर्म होय. आणि त्याशिवाय इंडियाची स्थिती पैशा संबंधानें फार शोचनीय आहे. इंडियावर इजिप्तच्या मोहिमेची तोहमत एक पैनें देखील पडणार नाहीं अशी इंग्लंडनें

खबरदारी घेतलीच पाहिजे. असें खरें कर्तव्य असून लार्ड हामिल्टन ह्मणतात कीं, मोहिमेवरील फौजेचा साधारण खर्च इंडियावर लादावा. तर मग इंडियांत जे इंग्लिश लष्कर धाडतात त्याचा खर्च इंडियांतून कां दिला जावा हें आह्मास समजत नाहीं. इंडिया साठीं विलायतेस जी फौज तयार ठरवितात तिचा देखील खर्च इंडिपासून घेतला जातो, आणि इजिप्तच्या मोहिमेचा खर्च इंडियानेंच सोसावा असें ठरविणें अन्यायाचें, अदूर दृष्टीचें, व विपरीत परिणामांचे होणार आहे. इंग्लिश राज्याची भलाई न्यायी पणावर, उदार राजनीतीवर व प्रजेच्या समाधानीवर आहे पण ती भलाई हळू हळू अगोदरच नष्ट होत चालली आहे आणि ती या खर्चाच्या प्रकरणाचा अनिष्ट निकाल झाला तर खचित लयास पोंहचेल अशी चलवत्तर भिती आहे. ईश्वर करो, आणि आमचें राज्य कर्ते डोळसपणानें चांगला मार्ग धरोत!

## The Berar Samachar

MONDAY JUNE 15 1896

The Government meteorological reporter has drawn up a forecast of the probable character of the south—west monsoon rains. So far as the forecast goes, it promises a favourable rainy season to the whole of India in general. Human knowledge is however most imperfect and limited in its compass. Man has got little control over the movements of the atmospheric elements that determine the nature of weather. Owing to our deep ignorance in this sphere we credit a number of phenomena to divine agency and we shall have succeeded well enough if we can interpret those phenomena so as to assign properly the various causes that produce such effects. With the Indian monsoon the meteorological observers have worked for nearly twenty years and have laid down certain tentative rules for their guidance. The record of the snowfall in winter, the peculiar or abnormal features of the weather antecedent to the monsoon and the local peculiarities in the Bay of Bengal and Arabian sea are generally the determining circumstances in the calculation of the monsoon—prospect. Mr. John Elliot the Government Reporter however lays stress on the point that such a forecast is a guess of mere probabilities and not of certainties and should therefore be used with due caution. The following para will give the general feature of the monsoon that has just set in:—

"The general conclusion is that the rainfall may be deficient to an extent depending chiefly upon the strength of the monsoon, in Sind, Cutch, the South West and Central Punjab and West Rajputana, that it will very probably be at least normal in amount in the northern half of the Peninsula, Central India the greater part of the North-Western Provinces, Bihar, Chota Nagpur, and perhaps Bengal, and may be in moderate excess in the Gangetic Plain, West Bengal, the Central Provinces and Central India. It will probably be normal or in slight defect in Burma, Assam and perhaps in East and North Bengal.

"Conditions are favourable in Berar, the Central Provinces, the Bombay Deccan, and Hyderabad. It is hence probable that they will receive at least normal rainfall. The conditions are most favourable in the eastern and northern districts of the Central Provinces, and there is hence a moderate probability they may receive rainfall in moderate excess of the normal."

---

We recommend as an experimental beginning to Technical education that the Slojd System should be introduced in the course of our Middle-schools. The system is very useful and valuable and we hope something will be done in this direction. The system we describe below in the words of Sir A. Croft:—

"The Slojd System—The introduction of this system, which is rapidly growing in popularity, into European schools, especially those for the poor, would be in full accordance with the principles that we have advocated above. It would indeed form a fitting introduction to the technical classes which we hope to see established. Slojd, or Sloyd, it may not be out of place to mention, is the name given to a system of educational handiwork in wood, metal, cardboard, leather, etc. suitable for boys and girls of the age of ten and eleven or upwards. Each child is required to produce a series of useful articles called 'models,' in which rounded work and the square work of the carpenter are duly alternated; and each model introduces, with careful regard to the graduation of difficulties, some new tool or fresh exercise. The chief tools used are the saw, the plane, and the chisel, with the knife as the initial tool. It is claimed on behalf of this system that it should be placed, as a subject of school instruction, on the same footing as arithmetic, reading or writing; and should. therefore, be taught in every school, since its educational value is very high. It specially aims at teaching thoroughness and educating children to put their very best work into whatever they do. At the same time the manual training which a Sloyd pupil undergoes is of great practical value to him in after life; if he becomes an artisan, he has nothing to unlearn. "Sloyd trains hand and eye, gives general dexterity, developes the body, . . . begets a spirit of independence and self-reliance, developes patience, strengthens the will." In a word, it is to be used as a means of developing physical powers and of forming character and habit, rather than of attaining utilitarian ends."

---

In the course of an able and instructive lecture on Technical education Mr. A. Chatterton gives an abridged history of the progress which India has made in the branch of this education. He observes:—

"The cultivation of the soil is the occupation of the greater part of the people of India, and surplus produce of the land forms the bulk of the export trade. Manufactures are in a nascent state, and as yet give employment to but a small percentage of the population, whilst the direction and management of such enterprises is almost entirely in the hands of persons of foreign birth and training. Private enterprise is very nearly dormant, and the surplus wealth or capital is hoarded in the form of bullion or jewels, and is therefore entirely unproductive. It is evident that under these circumstances there can be no great demand for Technical education of the kind I have been talking of but such as does exist is not inadequately met by the institutions which have been developed during the last ten years. It is no use taking an uneducated person and attempting to give him a Technical training. In time, you may convert him in the scientific principles underlying his trade, as he would be unable to grasp them. A sound general education must come first, and hitherto in this Presidency, as I have already pointed out there has been no lack of employment for persons possessed of such a qualification. In the future it is probable that circumstances will be different, and that there will be a surplus of educated men who will turn to Technical education in the hope that it will prove to them a passport into "other walks of life" in which they may earn a respectable livelihood. The spread of the study of Western science is making steady progress among the students of the University, and it may be naturally expected that they will be among the first to turn from the beaten tracks and carve out for themselves careers in the new fields which are opening out to them through the growing material and industrial prosperity of the country. At first no doubt the various Government services in which a preliminary Technical training is required, will receive greater attention than hitherto, and a superior class of students, than formerly did so, will flock to such institutions as the College of Engineering, and to them I should have no hesitation in saying that they will find there facilities for acquiring Technical knowledge of the kind required for the work which is carried on in the P. W. D. and under the Local Fund Boards, which will clearly prove that the Government of this Presidency fully and completely recognizes its responsibility in this matter. The demand for good subordinate engineers, surveyors and draughtsmen is very large, and has been very clearly expressed, and to supply the want no expence, that was really necessary, has been spared to make their courses of instruction as efficient as possible."

---

## वऱ्हाड

हवामान— पाऊस थोडा पडला; पण आकाश जसें ढगांनीं गच्च भरून येतें त्याप्रमाणें पर्जन्य पडत नाहीं आणि मनस्वी उकाडा होतो. आसपास कित्येक स्थळीं पाऊस चांगला होऊन पेरण्याही सुरू झाल्या. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं

उद्यां पासून सेशन कचेरी अकोल्यास सकाळीं भरणार आहे. या खेपेला सध्यां ३।४ च सेशन मोकद्दमे आहे.त

मि० सिम्पसन साहेब यांनीं येथील डेपुटी कमिशनरचे कामाचा चार्ज गेल्या सोमवारीं घेतला.

उमरावती जवळील बडनेर येथील एका सोनारानें पैजेच्या भरांत दोन तीन तांबे आंब्याचा रस प्राशन केला आणि त्या अतिरिक्त पानानें त्या मनुष्यास यमपुरीचा रस्ता धरावा लागला. या उदाहरणावरून लोकांनीं अतिसेवनाचा घातुक नाद सोडण्यास शिकावें.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए हे आपल्या डायेरक्टरच्या कामावर आज दाखल होतील.

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर ए. असि० कमिशनर हे रजेवरून परत येऊन आज स्माल काज कोडताचा चार्ज घेतील.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. ए. असि० कमिशनर हे उद्या बुलढाण्यास येथून रवाना होतील. लायब्ररीच्या व मित्रमंडळीच्या कार्यात हे मोठ्या उत्सुकतेनें व काळजीनें झटत होते. सरकारी कामांत स्वतंत्र, टीपबाज, व नियमित असून हे लेखणीचे जोरदार व न्याय कामांत व मुलकी कामांत पूर्ण वाकबगार आहेत. लवकरच हे कायमचे ए० असि० कमिशनर होतील असें आह्मी भाकीत करितों.

रा रा. विनायक गणेश हेड क्लार्क, पोलिस जिल्हा-कचेरी, अकोला, यांची बढती इनस्पेक्टरचे जागीं तीन महिन्यासाठीं करण्यांत आली आहे. खामगांवचे इनस्पेक्टर मि० ब्रिस्टली हे तीन महिन्यांच्या रजेवर जाणार असून त्या रजेंत राजश्री विनुबाबा खामगांवास जातील.

---

### नोटीस

राजश्री सदू बल्लद महादू मुंडें राहणार मौजे वसाडी बुजरूक तालुका मलकापूर जिल्हा बुलडाणा. यांस खालीं सही करणार-इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची विवाहीत स्त्री असून मी अज्ञान (लहान) होतें तों पर्यंत तुह्मी माझी नेआण वरींच वर्षें केली परंतु मला ऋतु प्राप्त झाल्या पासून आज च्यार ४ वर्षें झाली तुह्मी मला आपले घरीं नेत नाहीं. माझे बापानें तुह्मास मला घेऊन जाण्या विषयीं वेरेंच वेळा वसाडींतील सर्व लोकां देखत सांगितलें असतां तुह्मी अद्याप मला नेलें नाहीं. व शंभर रुपये मागून फारकती देण्यास राजी होता याचे कारण तुमचें तुह्मास ठाऊक १०० रुपये कोणी देवाल नाहीं. तरी ही नोटीस पावल्या पासून आठ ८ दिवसांचे आंत माझे खाण्याचा खर्च चार ४ वर्षांचा दरमाहा चार ४ रुपये प्रमाणें एकंदर मुद्दल १९२ एकशें ब्याण्णव शिवाय सावकारी व्याज असें देऊन मला फारकती देऊन मुक्त करावें असें मुदतीत न झाल्यास हीच फारकती समजून मी पुनर्विवाह करीन पुढें तुमचा व माझा कांहीं संबंध राहणार नाहीं. तसेंच रुपयाची आदाई मुदतीचें आंत न केल्यास सरकार तर्फे घेतलें जातील. व शिवाय नोटिशीचा खर्चही सर्व घेतला जाईल हें आपण आपले मनांत पक्के समजावें कळावें. तारीख १४ माहे जून सन १८९६ इ०

[ सही ]

सहीची निशाणी बांगडी तुळसी मर्द सदू मुंडें हल्लीं मुक्काम लाहूड ता० मलकापूर जिल्हा बुलढाणा.

---

## वर्तमानसार.

सेंटलुई शहरांत तुफान झाल्या कारणानें ३०० माणसें मृत्यु पावलीं.

भावनगरचे तख्तेश्वराचे देऊळ जळून ६००००० रुपयांचें नुकसान झालें.

लार्ड एल्जिन यांच्या पाठीमागें लार्ड अन्सलो ह्यांची हिंदुस्थानचे व्हाईसरायचे जागीं नेमणूक होणार. म. मि.

तुमची हाडांची गिरणी ही लोकांच्या आरोग्यास अपायकारक असल्यामुळें ती ज्या जागीं आहे तेथून ती कां काढून टाकूं नये याचें कारण दाखविण्याकरतां हजर होण्याविषयीं अलीपूरच्या माजिस्त्रेटानें तेथें असलेल्या हाडांच्या गिरणीचा मालक मि. परेरा यास नोटिस केली. परेरा हजर झाला. व ही गिरणी १० वर्षांपेक्षां जास्त मुदत येथें असून आरोग्यास अपायकारक मानलेगेली नाहीं. ह्मणून ती काढूं नये, अशी तकरार केली. शेंवटी ती हाडांची गिरणी आठ दिवसांत तेथून काढून टाकावी असा माजिस्त्रेटानें ठराव केला. हा प्रकार मागच्या आठवड्यांत झालेला आहे व तो म्युनिसिपालटीनें आणि इतर सर्व लोकांनीं ध्यानांत ठेवण्या सारखा आहे.

क्रीकचा दंगा चालूच आहे. मारझोड करण्याचा व आग लाऊन देण्याचा टर्केलोकांचा उद्योग चालूच आहे. या संबंधानें त्रिआन्स येथें फार चळवळ झाली आहे. या बेटांतला हा दंगा शांत करण्याकरतां टर्कीस समजून सांगण्याचा इंग्लंडचा उद्योग चालूच आहे.

ज. किचनर याणें आकाशेच्या उत्तरेस ओमके येथें आपली छावणी केली आहे.

आकाशे येथील फौजेने स्वारी करून फरकेट येथें दरवेशी फौजेचा अगदीं पराभव केला.

मेनलीक राजाची इजिप्तच्या शत्रूस मदत आहे असें सांगतात.

इजिप्तफौज पुढें सरकत आहे व तिनें लोर्डा ठिकाण घेऊन दरवेशांची छावणीही घेतली व त्यांत दरवेशांचे पुष्कळ लोक ठार झाले. डोर्डा येथें इजिप्त फौजेस मोठा खजिनाही मिळाला.

मादागास्कर फ्रेंचांच्या मालकीचा आहे असें अमेरिकेचें ह्मणणें आहे.

चिफू येथें बंदरावर एका इंग्रज व्यापारी कंपनीनें आपली एक वखार घातली. ही जागा चीनच्या मालकीची आहे कीं नाहीं चवकशी न करतां तेथील अधिकाऱ्यांनीं त्या इंग्रज कंपनीस ती वखार घालण्यास परवानगी दिली होती. पुढें तेथें रशियाचे वर्चस्व होतांच त्या इंग्रज व्यापाऱ्याच्या ताब्यांतली जागा एका रशियन व्यापाऱ्यास देण्यांत आली असा प्रकार तेथें चालू आहे.

जेद्दा येथें असणाऱ्या परकीय राजांच्या वकिलांचे जें नुकसान झालें त्या बद्दलच्या रकमा टर्की सरकारानें इंग्लंड, फ्रान्स व रशिया सरकारास देवून टाकल्या.

प्रशियन सरकार आपल्या लष्करी खात्याची नवी व्यवस्था करीत असून त्याकरतां ४० लाख रुपये जास्त खर्च लागणार

टेकसेस प्रांतांत शरमन शहरांत वादळानें १२० माणसें ठार झालीं व शंभर जखमीं झालीं आणि शहरचा कांहीं भाग अगदीं जमीनदोस्त झाला.

गेल्या रविवारीं बार्सिलोना येथें एक प्रेत स्मशानांत नेण्याचा विधी चालला असतां त्या स्वारींत काडतुस फेकलें व त्यामुळें सात माणसें मेलीं व ५० घायाळ झालीं.

बार्सिलोना येथें दंगा सुरू झाला आहे. अरुणोदय.

खरा प्रकार बाहेर पडला—सौडनवर जी स्वारी ग्रेटब्रिटनोंन पाठविला आहे ती केवळ इटाली देशाच्या हितासाठीं आहे असें लोकांचें जें अनुमान आहे तें इटालीस रकारानें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून खरें ठरलें. लार्ड क्रोमर हेही ही स्वारी पाठवूं नये असें ह्मणत असतां ग्रेटब्रिटनानें ती दुराग्रहानें पाठविली असेंही दिसत नाहीं. कारण ग्रेटब्रिटन आणि लार्ड क्रोमर ह्यांच्या मधला पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्याचें ग्रेटब्रिटनानें नाकबूल केलें आहे. आणि मित्र जोडण्याकारितां केलेल्या स्वारी बद्दल खर्च हिंदुस्थानावर! तेव्हां ह्या न्यायास सवई बादशाही न्याय किंवा अपूर्व जुलूम ह्मणोंवे दुसरें काय ?

महत्वाचा शोध–गव्हावर तांब्रा ह्मणून एक रोग पडत असतो. त्याचें कारण अमुक असतें व त्यावर अमूक उपाय करावा असा शोध कलकत्याच्या वनस्पती बागें वरील मुख्य डाक्टर ह्यांनीं लाविला आहे.

ग्रेटब्रिटनास दुःखदायक निकाल–मिसर देशच्या गंगाजळींतून पैसा काढून ग्रेटब्रिटनानें सौडनवर स्वारी केली. परंतु केरो येथें जें मिश्र न्याय कोर्ट आहे त्यानें तो पैसा सौडनच्या स्वारीकडे खर्च करणें गैर कायदा आहे असें ठरवून ग्रेटब्रिटनास दोष दिला, व तो पैसा दरसाल दरशेकडा ५ टक्के व्याजानें ताबडतोब गंगाजळींत भरावा, आणि त्या गंगाजळींतून यापुढें पैसा काढूं नये असा निकाल त्या मिश्र न्यायकोर्टानें केला आहे. हा निकाल ग्रेटब्रिटनास झटका लावणारा आहे ह्यांत संशय नाहीं.

तेजःपुंज हिरा—मुंबईचे प्रसिद्ध जवाहिरे मेसर्स मार्क्स आणि को ह्यांच्या दुकानीं विलायतेहून एक अत्यंत तेजःपुंज हिरा आला आहे त्यास उत्कृष्ट पैलू पाडून तो तयार केला आहे. तो उजेडांत धरिला असतां डोळे दिपून जातात. त्याचें वजन हल्लीं ५० क्यारेट आहे. ह्यावरून तयार नसलेल्या स्थितींत त्याचें वजन २०० क्यारेट असावें असें ह्मणतात. हा शुद्ध ब्राह्मण आहे, ह्मणजे धवधवीत पांढरा असून त्याची किंमत २०००० पौंडापेक्षां जास्त आहे.

वायव्य प्रांतांतील दुष्काळ–वायव्यप्रांत इलाख्यांत सरकारानें सुरू केलेल्या दुष्काळ कामावर ३ लक्षांपेक्षां जास्त मजूर आहेत. सरकारानें जो अजमास केला होता त्यापेक्षां दुष्काळ कामावर जास्त मजूर आल्यामुळें सरकार मजुरांस घालवून देत आहे ह्यावरून रयेतचा पैसा रयतेस दुःखातून काढण्यासाठीं सरकारच्यानें खर्च करवत नाहीं हें सरकारचें केवढें औदार्य !

सोन्याच्या नव्या खाणी–निजाम सरकारच्या राज्यांत वडाला येथें ३०० चौरस मैल प्रदेशांत सोन्याच्या खाणी सांपडल्या आहेत. कित्येक खड्यांतून काढलेल्या मातींत दरटना मागें २० औस प्रमाणें सोनें सांपडलें आहे पूर्वकाळीं ह्या खाणींतलें सोने लोकांनीं काढिलें असावें असें पुष्कळ गोष्टीवरून अनुमान होत आहे ह्या खाणी खणण्यासाठीं युरोपियन कंपनी स्थापन झाली असून त्यांच्या कामासाठीं विलायतेहून यंत्र जंत्रेंही रवाना झालीं आहेत.

**वडा नांगर–कालिफोर्नियां ( अमेरिका ) तील एका शेतकऱ्या पाशीं एक नांगर आहे** तेवढा मोठा नांगर सगळ्या पृथ्वींत नाहीं असें ह्मणतात. हा नांगर ओढावयास ५० घोड, आणि ७० बैल आणि नांगर धरावयास चार गडी लागतात. असल्या अवजड नांगरानें गरीब गुरीब शेतकऱ्यांचें दिवाळेंच निघावयाचें, पण कालिफोर्नियांत घोडे सस्ते मिळतात त्यामुळें त्या शेतकऱ्यांस थोडा तरी नफा होतो.

प्रचंड दुर्बीण—पारिस येथें सन १९०० सालीं प्रदर्शन होणार आहे, त्यांत ठेवण्याकरितां फ्रान्समध्यें मोठी प्रचंड दुर्बीण तयार होत आहे. तिच्या नळीची लांबी २०० फूट आणि आबजेक्टिव ग्लासाचा व्यास ५ फूट आहे. या दुर्बिणीच्या योगानें चंद्राचें प्रतिबिंब घेतां येईल, ज्या भिंगावर प्रतिबिंब पडेल तें १५ इंच जाड आणि त्याचा व्यास ६ फूट आहे. या दुर्बिणीनें चंद्रावरचे मोठमोठाले सर्व पदार्थ ढळढळीत दिसतील असा अजमास आहे. शु. सू.

पंजाबचे लेफ्टेनंट गव्हरनर फिट्झ पट्रिक यांचे जागीं हैद्राबाद येथील रेसिडेंट मि. प्लाउडन यांचीच नेमणूक होणार असल्याचें समजतें.

गोव्याच्या हल्लींच्या गव्हरनरनीं बंडांत सामिल झालल्या सर्व लोकांस माफी देऊन त्यांस आपआपल्या नोकरीवर पुन्हा दाखल केल्यामुळें बंड मोडल्यासारखें होऊन जिकडे तिकडे पूर्ण स्वस्थता झाली आहे.

राशियन सरकार अफगाण सरहद्दीकडे नवीन आगगाडीचे रस्ते वाढवीत आहे. ह्यामुळें हिंदुस्थान सरकारही आपल्या वायव्य सरहद्दीकडे आगगाडी व गाडीरस्ते वाढवील असा बऱ्याचअंशीं रंग दिसत आहे.

सुडानवर लढाई करण्याकरितां येत्या आगस्ट महिन्यांत हिंदुस्थानांतून इजिप्तकडे आणखी ८००० लष्कर पाठविण्यांत येणार आहे. मोंबासाकडे पाठविण्यांत आलेली २४ वी बलुची रेजिमेंट चालू महिन्याच्या अखेरपर्यंत तेथेंच ठेवणार आहेत. श्रीस. वि.

जगांत जी तार आहे, ती जर एक सारखी एकापुढें एक लाविली तर तिची लांबी **एक लक्ष एक्यांशी हजार मैल भरेल व तीला जर पृथ्वी सभोंवती गुडाळली तर तिचे ३८॥ फेरे होतील, असा एकानें शोध काढला** आहे.

प्रो. एच. लिटलडेल यांची नेमणूक बडोद्याच्या कालेजच्या प्रिन्सिपालचे जाग्यावर झाली.

नेपाळच्या महाराजांनीं आपल्या सैन्यांत स्वदेशी कापडाशिवाय इतर कापड वापरण्याचें नाहीं असा निश्चय केला आहे.

काश्गर येथें अन्न चीं फारच टंचाई झाली आहे.

उत्तम अमेरिकेतील स्वतंत्र संस्थानांत ' न्यूयार्क वर्ल्ड ' नांवाचें एक दररोज निघणारें वर्तमानपत्र आहे. त्याच्या इतकें लोकप्रिय वर्तमानपत्र जगांत कोठेंही नाहीं. त्याच्या मालकास गेल्या सालीं २४ लक्ष रुपये निवळ नफा झाला

आपल्या राणी सरकारांनीं इराणच्या माजी शहाचे प्रेतास घालण्या करितां एक पुष्पमाला सर मार्टिम ड्यूरंड यांचे मार्फत तेहरानास पाठविली आहे.

दार्जिलिंग येथें इन्फ्लुएंझा नांवाचा ताप सुरू आहे. इं प्र.

यदां पुण्याचे मुसलमान रे मार्किटाजवळ आपला एक ३५ फूट उंचीचा सार्वजनिक ताबूत करीत आहेत, असें समजतें

नुकताच दक्षिण हैद्राबाद येथें मुंडल स्वामी या नांवाच्या मनुष्याला भारी ताप आला होता. तेव्हां त्यानें त्या तलखींत जवळच्या एका विहिरीजवळ धांवत जाऊन संध्याकाळीं तींत उडी टाकिली. दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत तो कडा धरून पाण्यावर होता. तेव्हां त्याला लोकांनीं बाहेर काढिलें आणि पहातात तो त्याचा ताप साफ निघून गेला असून तो अशक्त मात्र झालेला आहे असें दिसून आलें.

सर्व पृथ्वीमध्यें कागद तयार करण्याचे ४५००० कारखाने आहेत.

लोकरीच्या कापडाच्या निरनिराळ्या ३२००० तऱ्हा तयार होतात.

लंडन शहरांत १००० वर पोस्ट आफिसें आहेत.

मुझफरपूर येथील दिवाणी कोर्टांत एक मोठा कज्जा आला असून त्यामध्यें एकंदर ६०० असामी साक्षीदार आहेत.

क्यूबाशीं स्पेननें जी लढाइ चालविली आहे तींत क्यूबन लोकांच्या गोळ्या ५०० यार्ड अंतरावरूनही नेमक्या लागून स्पॅनिश शिपाई जखमी होत आहेत. अशा रीतीनें आपला नाश होता ह्मणून ही लढाईची पद्धति राष्ट्रांमधील कायद्याला अनुसरून नाहीं अशी ओरड स्पेनच्या लोकांनीं चालविली आहे ! पण त्या लोकांची क्रूरपणें कत्तल करणें हें तरी राष्ट्राला मान्य असणाऱ्या कायद्याप्रमाणें आहे कीं नाहीं तेंच स्पॅनिश लोकांनीं प्रथम पाहिलें पाहिजे. सु. प्र.

## जाहिरात


सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोले म्युनिसिपाल कमेटीचे हद्दींतील बारा फतराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलांव सन १८९६।९७ सालाबद्दल तारीख २ माहे जुलई सन १८९६ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे त्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौनहालांत हजर रहावें कळावें ता. ४।६।९६.

Md. Husain
Secretary
A. M. C.



हे पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव [illegible] प्रसिद्ध केलें.

... ,,१ ०८
किरकोळ ... स ... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०१०६
दुसरे खेपेस .... .... ०।

Six monthly ... ... ... 3 ,, 8 a
Single copy ... ... ... ... ... 4 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine 3 a

VOL XXX — AKOLA MONDAY 29 JUNE 1896 — NO 25

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख २९ माहे जून सन १८९६ इ० — अंक २५


## घड्याळ

किंमत ६ रुपये हमी ३ चीं

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटो प्रमाणें वांच घ्या. ८०० वर खपली. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्वित्झरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे फिरविण्यास ठेच असून सेकंडकाटा आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस जुवेल [ ह्मणजे चकांचे खालीं वर हिरे ] बसविले आहेत. ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरी घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. ने० घड्याळ पाठवूं.

टीपः– " गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पाळ.
९२–२४ वाचमेकर आणि रिपेरर नासिक.



## जाहिरात

( उपयुक्त कंपनी )

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं, वाशिमाहून आकोल्यास व इंगोलीहून आकोल्यास जाणें असल्यास लोकांस फार गैरसोय आहे व वक्तशीर जाणें येणें होत नाहीं. याजकरितां ही अडचण दूर व्हावी ह्मणून आह्मी कंपनी मातली व खात्री लायक व्यवस्था केली आहे. कंपनीचें भांडवल एकंदर १०००० रुपये करून एकंदर २०० शेर काढले आहेत व ही कंपनी पुढें रजिष्टरही केली जाईल. याजकरितां या कंपनीचे शेर घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांणीं तारीख ८ सप्तेंबर १८९६ चे आंत लागतील तितके शेर घ्यावेत. निमे शेर भरले गेले आहेत तेव्हां त्वरा करावी. प्रत्येक शेर ५० रुपयांचा काढला असून एकंदर घेतलेले शेरचे रुपये तारीख ८ अक्टोम्बर सन १८९६ चे आंत कंपनीचे डायरेक्टर यांचे कडेस पाठवावेत.

शेर घेणारास या शिवाय ज्यास्त कांहीं माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं डायरेक्टर यांस विचारल्यास दिली जाईल. जबावा करितां अर्धा आण्याचें तिकीट न पाठविल्यास जबाब नाटपेड पत्रानें दिला जाईल कळावें.

सह्या.

यशवंतराव वामन दिवे वकील
राहणार वाशीम. } डायरेक्टर
शेषराव रघुनाथ वकील.

मेंबरस.

राजे काशीराव शंकरराव देशमुख
त्रिंबकराव विठ्ठलराव देशमुख प्रगणें वाशीम.
बालकिसन निघलाल ज्यागीरदार.
बाळकृष्ण रामजी
सेक्रेटरी.
गुलाम हुसेन सुलतानअल्ली.


## नोटीस

निंबू वल्लद लठू भारंबे राहणार सेनाळे तालुके जळगांव जिल्हा अकोलें याजला खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची मोहतीराची बायको असून आज सुमोर दोन सवादोन वर्षें झाले मजला तुह्मी टाकून दिले व मजला खाण्यास ही देत नाहीं व मजला आईबाप नसून मी स्वतः माझे जीवावर लोकांचे कर्ज काढून आज पावेतो निर्वाह केला. आतां मजला कोणी कर्ज सुद्धां देत नाहीं व मजला आज पावेतो जे खाण्यामुळें कर्ज झाले त्याचा रोखा मजपासून बापु वलद झांगोजी वाघ सेनाळे कर यांणी मागील सर्व हिशेब करून तारीख १२।६।९६ इसवी रोजीं रुपये ७६ चा एक महिन्याचे कराराचा करून घेतला आहे तर आतां ह्या नोटीशीनें आपणास कळविण्यांत येते कीं आठ दिवसाचे आंत त्याचे रोख्याचे रुपये देऊन मजला घेऊन जावें. असे जर न केले तर सदर्हू तुह्मास दिलेली नोटीस हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन झालेले कर्ज द्या. मग तुमचा मजवर कोणतेच प्रकारचा हक्क संबंध राहणार नाहीं तारीख १९ माहे जून सन १८९६ इसवी.

सही
मंजी मर्द निंबू भारंबे राहणार सेनाळ
तालुके जळगांव निशाणी खुद्द
हातची बांगडी.

## गप्पाष्टक.

### आचार्य परिषद्

एलिचपूर.
२४।६।९६

ठराव– १० मनुष्याच्या बुद्धीच्या, सामर्थ्याच्या, गुणाच्या व आवडीच्या रूपानें परमेश्वर प्रत्येक घटांत न्यूनाधिक प्रमाणानें वसत आहे. तेव्हां विचारांअंतीं स्वतःला जें योग्य वाटेल तदनुसार प्रत्येकानें वर्तन ठेविलें ह्मणजे त्यानें जवळच्या व खऱ्या देवाची सेवा केली आणि आपल्यास जबाबदारींतून तो मोकळा झाला. ज्यांस जितकें सामर्थ्य दिलें असेल तेवढ्याचा, त्यांस जितकी बुद्धि दिली असेल तिच्या मानानें, प्रत्येकानें पूर्ण उपयोग करावा ह्मणजे तो पूर्णायुषी झाला असें समजावें. डोळ्याला आसवें आणून देवाची प्रशंसा करून देव प्रसन्न व्हावयाचा नाहीं. असल्या पोकळ आर्जवानें प्रसन्न होण्या इतका तो भोळा असेल असें मानणे माणसाचें वेडेपण होय. देवप्रसन्न व्हावा असें जर तुह्मला वाटत असेल तर तुह्मी स्वतःला प्रसन्न करून घ्या आणि तुह्माला स्वतःला जर प्रसन्न करून घेणें असेल तर तुमच्या समजूती प्रमाणें, गुरूच्या उपदेशांत, शोधकांच्या ग्रथांत आणि तुमच्या अनुभवांत योग्य असें जें तुह्माला आढळून येईल त्याचा संतोषानें अंगिकार करा व अंगीकृत कल्पनें प्रमाणें निभर्यपणें वागणूक ठेवून आपल्या सामर्थ्याचा सव्द्यय करा. समजत नाहीं त्यावर भोळेपणानें विश्वास ठेवूं नका. ज्याचा प्रत्यय येत नाहीं तें वेडेपणानें समजलें असें समजूं नका व ज्यांवर विश्वास नाहीं त्या प्रमाणें दांभिकपणें आचरण करून जगाला फसवून स्वतःची फसवणूक करून घेऊं नका. तुह्माला मिळालेल्या शारीरिक आणि मानसिक देणग्या उपयोग करण्यासाठीं दिलेल्या आहेत, त्यांना वायां दवडूं नका. अथवा दाबून जागच्या जागीं जिरवून टाकूं नका ह्या देणग्यांचा तुह्मी यथाशक्ति पूर्ण उपयोग केला ह्मणजे तुह्मी आपल्या कर्तव्यऋणांतून मोकळे झाला देणगीच्या लक्षणावरून तुह्मी काय केलें पाहिजे हें ओळखावें. आणि सामर्थ्यांवरून तें किती केलें पाहिजे हें ओळखावें.

ठराव ११. कर्मेंद्रियांनीं करण्यासारखें जेवढें असेल तेवढें सर्व केल्या नंतर आणि ज्ञानेंद्रियांनीं जाणण्यासारखें जेवढें असेल तेवढें जाणल्या नंतर अतींद्रिय ब्रह्मतत्वाविषयीं विचार करण्याचा अधिकार येतो. मी ब्रह्म आहे असें नुसतें चिंतन केल्यानें जर ब्रह्म कळालें व मिळालें असतें तर आज भरतभूमि ओसाड सांपडली असती. आणि स्वर्गांत रहावयाला जागा मिळाली नसती. तेव्हां अगोदर सर्व कर्में करा, सर्व प्रकारचा शोध करा, सर्व सृष्टी चाळून शास्त्रांचा उत्कर्ष करा. पदार्थ सृष्टीचा अंत लावून तिला अंकित करा व सुखाचीं सर्व साधनें अनुकूल करून घेऊन सर्व वासना पुरवून घ्या ह्मणजे क्रमाक्रमानें आपोआप तुमचे सामर्थ्य आणि योग्यता वाढतील आणि ब्रह्मज्ञान व मोक्षमार्ग तुह्माला सहज उमजूं लागतील. अवलोकन, संशोधन, मनन, आचरण इत्यादिकांनीं अंतःकरणाचें सामर्थ्य वाढतें आणि अंतःकरण्याच्या वाढत्या सामर्थ्याच्या मानानें वरील क्रिया चांगल्या व अधिक होऊं लागतात. या क्रिया हेंच कर्म हेंच सजीव कर्मकांड व हेंच फलप्रद [illegible] ईल. ज्याचा अर्थ समजत नाहीं, [illegible] उपयुक्तता दिसत नाहीं, जें कांहीं देत न[illegible] व कांहीं नेतही नाहीं तें जड अचेतन नव्हे.

ठराव १२. ऐहिक संपत्तीचा संग्रह [illegible] सोनें, नाणें, रत्नें यांचें भांडार भरा. सु[illegible] आणि ऐश्वर्याचीं सर्व साधनें उपभोगा[illegible] हस्तगत करा. कला कौशल्यें शिका. कारख[ाने] उभारा आणि तुमच्या गरजा भागविण्याला [illegible] णारे सर्व पदार्थ सत्तेचे तयार करा. तुमच्या देशाच्या जमीनींत कांहीं पिकत नाहीं असें नाहीं, तसेंच तुमच्या सामर्थ्यानें आणि कुशलतेनें तयार होणार नाहीं असें ही कांहीं नाहीं. महारोग्याच्या हात यांच्या वस्तु प्रमाणें सर्व विदेशीय वस्तू मानून त्याचा तिरस्कार करा व त्यांस शिवूं नका तेणेंकरून तुमचा उद्योग वाढेल, बोज राहील व लक्ष्मी अंकित वसेल.

ठराव १३. आपल्या स्त्रियांना बरोबरी[illegible]चा मान द्या. त्यांस मित्र समजा. व्यव[हा]रांत मोकळेपणानें वापरूं द्या व स्वतःचें कर्तव्य बजावून गुणानुरूप योग्य स्थान त्यांस मिळवूं द्या. त्या तुमच्या दासी नव्हेत [illegible] केवळ तुमच्या सुखाचीं त्या साधनें न[illegible] उभयताचे हक्क समान आहेत, उभयतांची योग्यता सारखी आहे, उभयतांची उप[यु]क्तताही समान आहे. त्यांस अज्ञानांत ठेविल्यानें व सर्व प्रसंगांत त्यांस समागमें न घेतल्यानें तुमचा नाश होईल. स्त्री ही [illegible] साराचें तुह्मा इतकेंच प्रधान अंग हे[illegible] तेव्हां तुह्माला जर सुरेख संसार चालवावयाचा आहे तर दोन्हीही अंगें सारखीं समंजस व आपआपल्या कर्तव्यांत सारखीं निष्णात पाहिजेत. प्रत्येकांस मिळवितां येईल तितकें ज्ञान मिळणें जरूर आहे; त्यांत प्रतिबंध करण्याचा अथवा मर्यादा घालण्याचा कोणास अधिकार नाहीं. ह्मणून स्त्रियांस तुमच्या बरोबरीनें सज्ञान होऊं द्या. विवाह पद्धतींत फेरफार करा. अत्यंत मित्रभावानें व प्रेमभावानें स्त्रीपुरुषांनीं आपणाला विवाहबंधनांत गांठून घ्यावें. लग्नें स्वयंवर पद्धतीनें प्रौढ वयांत होऊं द्यावीं. तोंपर्यंत स्त्रीपुरुषांनीं संतोषानें ब्रह्मचर्य व्रताचें पालन करावें आणि

नंतर आपण चालविलेल्या प्रापंचिक, सामाजिक व राजकीय कामीं आपणाला साह्य करण्या करितां व आपण तीं जेथें सोडिलीं तेथून तीं पुढें तशींच किंबहुना अधिक नेटानें चालविण्या करितां संतति निर्माण करावी. शास्त्राचें, प्रगतीचें, राज्याचें आणि कर्माचें प्रत्येक व्यक्तीवर मोठें ऋण आहे तें फेडण्याकरितां संतानरूपानें प्रत्येकानें पुनः पुनः जन्म घेणें भाग आहे.

ठराव १४— वयातीत मुलांपेक्षां अल्प वयस्क मुलांची अधिक काळजी घ्या. त्यांच्या शिक्षणा करितां येईल तितकें अगोदर करा. विलायतेंतील तीन ‘ र ’ कारांचे शिक्षण ह्मणजे तीन सुरांनीं रडणें होय. पहिल्यानें बालकांचा स्वभाव हातीं घ्या व त्या बरोबरच त्यांचे शरीर व त्यांची बुद्धि वळवा आणि वाढीस लावा. लिहितां वाचतां सहज येईल व सहजांतत्र तें शिकवा. पहिल्यापासून नीट अवलोकन करावयास त्या शिकवा. त्यांची कल्पकता वाढवा आ स्वतंत्र आणि व्यवस्थित रीतीनें त्यांस विचार करावयास शिकवा. कर्तव्याचें महत्व पहिल्यापासून त्यांचे लक्षांत आणून द्या आणि सतत उद्योगाची संवय लावा. व्यवहारांत गुरु, मित्र, पिता, पुत्र, पति, पालक, विद्यार्थी, शेजारी, नागरीक इत्यादि अनेक नात्यानें त्याला जीं अनेक कर्तव्यें करावयाचीं आहेत तीं यथास्थित बजावण्या व स्वःतांचें आणि स्वकीयांचें रक्षण करण्यास जे गुण व जी तयारी पाहिजे आहे ती सर्व करून घ्या. खरें शिक्षण तें. नुसतें लिहिणें, वांचणें घेऊन स्वतंत्र विचाराला आणि व्यवसाला फारकत देऊन केवळ ताबेदारीला योग्य करणारें शिक्षण फुकट मिळालें तरी घेऊं नका. मुला मुलींना खरें शिक्षण भरपूर द्या व उभयतांचे स्वभाव सुधरून त्यांस पराक्रम व शहाणपण प्राप्त होईल- मोठ्या आनंदानें कर्तव्यदक्ष राहून संसारयात्रा करितां येईल व शेवटी आपली सर्व कमाई आपल्या वारसांस देऊन शांतपणानें व संतोषानें पर लोकाची वाट धरितां येईल असें करा. ज्या शिक्षणानें मनोवृत्ती सुसंस्कृत होतील, हित अनहित कळेल, प्रसंग ओळखितां येईल, बुद्धीचें सामर्थ्य वाढून स्वतंत्र विचार करितां येईल, आपल्या अनेकविध कर्तव्याचा उमज पडेल व तें निर्भयपणें अंमलांत आणण्याचें धैर्य येईल तेंच खरें शिक्षण होय. बाकी दुसऱ्याच्या पोथ्यांतून सनवार आणलेली माहिती फारशी उपयोगी पडणार नाहीं. कदाचित उसने आणण्याची संवय लागल्यास उत्पन्न करितां यावयाचें नाहीं. ज्या शिक्षणानें राखतां येईल, ज्या शिक्षणानें उत्पन्न करितां येईल व ज्या शिक्षणानें पुढें सरतां येईल त्याचेंच नांव शिक्षण. मागल्या पिढीचा सारा अनुभव पुढील पिढीस मिळाला पाहिजे. नाहीं तर राष्ट्राच्या शक्तीचा अपव्यय झाल्या सारखें होईल. पुढील पिढीस पुष्कळ गोष्टींत नव्यानें आरंभ करावयास नको व मागल्या पिढींत झालेलें स्वानुभवानें पुनः मिळवावयास नको. इतकें शिक्षण मुलांनां देऊन त्यांना वाटेस लावण्याचें काम मागल्या पिढीनें न केल्यास तिनें आपलें कर्तव्य बजाविलें नाहीं.

( पु० चा० ) त्रैमूर्ति.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ४ शके १८१८

राष्ट्रीय सभेची १८९६ साल- अखेरची बैठक कलकत्यास घ्हावयाची असा पुण्याच्या राष्ट्रीय सभेंत ठराव झाला तेव्हां पासून बंगाल इलाख्यांत राष्ट्रीय सभेविषयीं चळवळ मोठ्या कडाक्यानें चालू आहे. राष्ट्रीय सभा तिकडे सर्वत्र मशहूर आहे, आणि या सभेला, शहरोशहरीं, गांवोगांवीं, व खेडोपाडीं देखील लोक यथाशक्ती वर्गणी देत आहेत. वर्गणी किती ही स्वल्प असली तरी हरकत नाहीं. पण ती जमविण्यांत तत्व हें धरलें आहे कीं वर्गणीची फेरी घरोघर व दारोदार होत असल्यामुळें सर्वत्र लोकांस राष्ट्रीय सभेविषयीं माहिती व्हावी आणि लोकांनीं या सभेचें महत्व लक्ष्यांत घेऊन नंतर तिला मदत करावी. बंगाल्यांत सभा ठिकठिकाणीं भरूं लागल्या आहेत आणि राष्ट्रीय सभेविषयीं लोकांच्या मनांत आस्था व कळकळ उत्पन्न होत चालली आहे राष्ट्रीय सभेनें आज मित्ती पर्यंत जें काम केलें आहे तें मुख्यत्वें करून सभेच्या ठरावा संबंधानें सरकारची प्रसन्नता संपादण्याचें व राजकीय उन्नती विषयीं लोकमत जागृत करण्याचें आहे. हें काम चांगलें सफल झालें असून त्याचीं फळें निरनिराळ्या मार्गांनीं लोकदृष्टीस पडत आहेत. राष्ट्रीय सभेचा उद्योग असाच सतत कांहीं वर्षें चालला तर या सभेला खरोखर पार्लमेंटचें स्वरूप येईल आणि सरकारी भालेराई बंद होत जाऊन सर्व सत्ता या लोकसभेच्या सल्यानें अंमलांत येईल. सध्यां आंग्लो-इंडियन राष्ट्रीय सभेला पार्लमेंटची उपमा देऊन नेटिवांचा उपहास करितात पण कालमहिमा मोठा विचित्र आहे आणि आह्मांस उमेद आहे कीं बंगालची बाबू मंडळी यंदाच्या बैठकींतच आमच्या भाकितांचें पूर्व स्वरूप खरें करून दाखवितील.

---

गेल्या सालीं सामाजिक परिषदेविषयीं तुमूल महायुद्ध झालें आणि राष्ट्रीय सभेला विघ्न येऊं नये ह्मणून एक निराळाच मार्ग संशोधण्यांत आला. यंदा तें अनिष्ट दारुण युद्ध व तो निराळा मंडप हीं पुनरावृत्तींत कलकत्यास येणार नाहींत असा बहुत लोकांचा समज आहे. मतवैचित्यामुळें दुफळ्या होऊन पुण्यांत कलह माजला व सभेच्या कामा साठी निराळा मांडवही घातला तथापि सर्वांस सामाजिक व राजकीय उन्नती या सारख्याच प्रमाणानें पाहिजे आहेत. या गोष्टी साधण्याच्या मार्गा संबंधानें मतभेद गुदस्ता झाला तसा यंदा होणार नाहीं अशी आमची समजूत आहे. अद्याप या वृथा वादाला आरंभ झाला नाहीं हें सुचिन्हच होय.

---

[ आमच्या एका मित्राकडून ]

या मानवी देहाला अनेक प्रकारच्या व्याधी आहेत. शारीरिक, नैतिक, धार्मिक. यो व्याधी पासून सुटण्यास सुज्ञ लोकांनीं व्याधींच्या महत्वाच्या मानानें उपाय करून ठेविले आहेत.

शारीरिक व्याधी पासून मुक्त होण्यास चरक, सुश्रुत, वाग्भटादी धन्वंतरींनीं अतीशय उपाय सांगितलेले आहेत. नैतिक व धार्मिक व्याधी पासून या मनुष्य देहाची सुटका व्हावी यासाठीं मनु, याज्ञवल्क्यं, पाराशरादी मुनिवर्यांनीं अनेक स्मृतीच्या द्वारें उपाय सुचविलेले आहेत.

रोगांचीं कारणें हळुहळू कळत चाललीं आहेत परंतु धार्मिक रोगांचीं ह्म० पापाची कारणें, त्याची उत्पत्तिस्थानें अजून युरोपीय व भारतीय तत्ववेत्यास कळलीं नाहींत प्रत्येक सुज्ञास या दुर्धर व दुःसाध्य रोगाचें कारण शोधण्याची जिज्ञासा उत्पन्न होते. या मनुष्य स्वभावास अनुसरून श्रीकृष्ण समीप असता भारती युद्धाचे वेळीं अर्जुनास जिज्ञासा उत्पन्न होऊन तो श्रीकृष्णास विचारतो.

॥ अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः ॥
॥ अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः॥

टीका ॥ मनुष्याच्या इच्छे विरुद्ध जणू काय त्याजवर जुलूम करून त्याचे हातून पाप कोण करवितो? सकृत् दर्शनी हा प्रश्न जरा चमत्कारिक दिसतो कारण इच्छा नसतां आपले हातून कोणतेंही कर्म होत नाहीं. जर आपले हातून बळजबरीनें कोणी कांहीं कृत्य करविलें तर त्याचा दोष करविणारा कडे, शस्त्रधाऱ्याचा हात धरून त्याजकडून हत्या करविली तर त्याचा दोष शस्त्राकडे नाहीं, त्याप्रमाणें आपल्यावर जर कोणी जुलूम करून पाप करविलें तर त्याचा दोष आपल्यावर कसा येणार? मानसिक शास्त्रामध्यें कोणतेंहि कृत्य होण्या पूर्वी त्याची इच्छा आधी होते नंतर तदनुरूप आचरण अशी माला आहे.

तेव्हां आपले इच्छे विरुद्ध ह्मणजे सुविचारा विरुद्ध कर्म असें घेतलेंच पाहिजे. शांतपणानें आपण विचार केला तर जे विचाराच्या विरुद्ध वाटेल ते आपल्या विरुद्ध वाटेल.

अनिच्छन् या पदाचा दुसऱ्या रितीनें विचार करता येईल. कांहीं लोक कारणाची इच्छा करितात व कार्याची करीत नाहींत तरी कारणापासून होणाऱ्या सर्व अवश्यक कर्मा बद्दल त्यांना जबाबदार धरतात एखाद्यानें स्वखुषिनें मद्यपान केलें आणि जर एखाद्याची हत्या केली तर त्याला खुनी ह्मणून शिक्षा दिली जाईल. ह्मणजे कोणतीही गोष्ट आपल्या ताब्या बाहेर जाऊ दिल्यानें जे कांहीं अनिष्ट परिणाम होतात ते होऊ नयेत अशी जरी आपली इच्छा असली तरी त्या बद्दल आपल्याला जबाबदार धरतील. रथाचे घोडे उच्छृंखल सोडल्यानें जर एखादा मनुष्य मरेल तर तो गाडीवाल्यानें मारला असें होईल व त्याचें पाप गाडीवाल्याचे माथी बसेल. तेव्हां या विचार सरणीस अनुसरून अर्जुन विचारतो कीं कोणत्या कारणानें आपल्या मनोवृत्तीची चलबिचल होऊन आपले विचारा विरुद्ध आपले हातून क्रिया होते? या मनः समरात विचाराचा पराभव होऊन कोणत्या योगानें मनोवृत्तीस जय मिळतो! ज्ञानेश्वर

आपण तरि छंपती॥ सर्वस्वे पापे चुकविती॥
॥ परी बलात्कारें सुइज ॥ तयानिमाजी ॥

टीका ॥ पापाचा डाग लागू नये ह्मणून अलिप्त राहतात परंतु पापांत आपण होऊन उडी घालतात, अशा तऱ्हेचा बलात्कार या या ठिकाणीं होतो तेव्हां तो कोणाकडून होत आहे या प्रमाणें प्रश्न आहे. व तो बरोबर विचारला आहे, हें अनिच्छन् पदाच्या विवरणावरून दिसून येतें.

आतां पापाच्या प्रवृत्ती विषयीं विचार करण्या पूर्वी पाप ह्मणजे काय याचा विचार झाला पाहिजे. कारण अस्तित्वाचा विचार झाल्याशिवाय प्रवृत्तीचा विचार होणार नाहीं. पाप ह्मणजे आपल्या आर्य धर्मा प्रमाणें श्रुति-स्मृति-बाह्य कर्म. स्मृतिचा उगम श्रुती पासून व श्रुती परमेश्वरा पासून. अर्थात पाप ह्मणजे ईश्वराज्ञेचें उल्लंघन. ही व्याख्या बौध धर्मांत लागणारी नाहीं कारण त्यांत ईश्वर नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. तर मग पाप ह्मणजे विहित कर्म न करणें. आतां पापाच्या उत्पत्ती विषयीं निरनिराळ्या धर्मांचे सिद्धांत काय आहेत हें पाहूं.

जे पांच धर्म आज आपल्यास पाहावयाचे आहेत त्यांचे दोन भाग करूं. आर्य व अनार्य. आर्य धर्मांत वैदिक, पारसिक व बौध्य येतील. अनार्यांत ख्रिस्ति व महंमदी येतील. आतां प्रथम वैदिक धर्म घेऊ. ऋषींच्या कालीं पापाची उत्पत्ती कशी झाली या विषयीं कांहीं विशेष बोध होत नाहीं. परंतु सैताना सारखा पापप्रवर्तक पुरुष वेदांत आढळतो. त्याला निर्ऋती ह्मणतात. कोठें पाप्मा ह्मणतात हा पाप्मा आपल्या हातात पाश घेऊन होत्याला मारतो आहे असें वर्णन ऐतिर्य ब्राह्मणांत आहे. उपनिषदामध्यें ही हेंच सांगितलें आहे. सांख्य पद्धतींत पापा पासून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला आहे. न्याय व वैशेषिका मध्यें पापाला उपाधी ह्मटलें आहे. बादरायणांनीं पाप ह्मणजे अविद्या ह्मटलें आहे. पौराणिक कालामध्यें देवदानव यांच्या लढाया चालत, असूर हे पापाचे आवतार असें ह्मणता येणार नाहीं. कारण रावण वगैरे शिवपूजा करीत असत, राक्षस हे सैताना सारखे आहेत असें ह्मणता येणार आहे एथपर्यंत पाप या शब्दाचा इतिहास झाला.

( पुढें चालेल )

---

# The Berar Samachar

MONDAY JUNE 29 1896

The year's experience will remind our Local Boards of an urgent necessity in point of sanitation. A good water supply should be the first and foremost item of expenditure in the budget of our Boards. We hope that a preliminary procedure of utilizing, purifying and filtering the available resources of water—supply will be adopted without delay and a regular scheme will be proposed to remove the grievances due to a want of a proper supply of good drinking water. No doubt the Boards will be as helpless as the Bengal Government i[illegible]int of funds. But we hold that [illegible] should make

a prompt and adequate demand for larger revenue upon the Imperial treasury. No other work of public utility commands our earnest attention.

Lord Macaulay was one of those few who had the signal honor to inaugurate the present educational scheme in India. For more than a generation the scheme worked very well. In certain matters however it has been found defective. Recently an attempt has been made to make up some short-comings in the system and it is hoped that the new scheme with the proposed alterations will introduce a sound and salutary principle of imparting instruction in vernaculars on a large scale. One's own mother—tongue is the best vehicle to convey thought and the course of education that avails most of vernaculars as the best medium facilitates a general culture and readily equips the masses with the ordinarily general education. We give below in the words of a weighty and influential writer the main features of the newly proposed scheme.

"The scheme which has come back to India, and now only requires to become law the sanction of the Viceroy in Council, inaugurates a new departure in Indian education. The idea which pervades the scheme is that of substituting vernacular education for Anglo-Vernacular in the primary sections of Government schools, and this change has been accepted by more than half the number of aided schools in these Provinces. The effect will be that the vernacular instruction of the Anglo—Vernacular schools has been raised to the primary standard of the Hal-ka-bundi schools. Geography and History are now to be included in lower class instruction, the object being to give a sound vernacular education before commencing English. All experienced in Indian education know the way in which the young student succeeds in misunderstanding the instruction in unfamiliar subjects in an almost unknown language.

Another reason, why the new scheme promises well is that it will give a better vernacular education to those who only desire primary instruction. The bettering and cheapening of primary instruction in the villages of India is the chief aim and desire of all who wish to see this country civilised and prosperous. Popular education will do more to benefit India than the making of another and equally powerful caste—system of graduates, M. A. and B. A. and F. A. and—the rest of the people. It is to the general enlightenment of the mass of the people that the English power in India must look for a peaceful and industrious and prosperous community.

The new education scheme may be welcomed as another step, if only a short one, towards the spread of general elementary instruction among those who require it most, and to whom it would be a blessing."

The Jail report of this year gives the following financial details:—

"The total gross expenditure in the Hyderabad Assigned Districts under all heads amounted to Rs. 72,327, and the total net expenditure to Rs. 58,017, which works out to a net cost of Rs. 44 per head of average strength compared with Rs. 45 in 1894 and Rs. 48—3—0 in 1893. For Secunderabad the net cost fell from Rs. 92 9 Rs. to 66-4. The dieting charges average Rs. 21—4—8 per head (Secunderabad Rs. 21-11 11), and compare favourably with the same charges in Bombay, Madras, and the Central Provinces for 1894; the figures for 1895 are not yet available. The dieting charges for the several districts show notable variations, and leaving the smaller jails out of the question, some explanation should have been afforded of the circumstances which cause diet at Akola to cost Rs. 3—8—7 per head more than at Amraoti.

To make it succeed, the plan of purchasing grain in bulk requires personal supervision by the Superintendent of each jail. He should satisfy himself that proper provision exist for storage, and ordinarily he should purchase grain immediately after the harvest in quantity sufficient to last for the nine dry months. The Resident notices with satisfaction that, except at Akola, the produce of the jail gardent nearly sufficed for the requirements of the prisoners. In Akola also the outturn shows improvement. The Inspector—General should give his attention to the question of the best method of drying and preserving onions.

The financial results of factory operations are not satisfactory, for the cash earnings show a very considerable falling off, due principally to a failure in Amraoti to keep the lithographic department adequately employed. The Superintendent knows what quantity of work the presses at Amraoti are capable of turning out in a year if fully worked, and it is his business to ascertain by enquiring in the proper quarters how far local demands for forms and so forth are likely to suffice to keep the jail establishment in work. It is largely a matter of administration. The Resident regrets to see that stone—breaking is still the commonest form of hard labour in the smaller jails. He would like to know why oil—pressing cannot be substituted."

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत पाऊस नाहीं. आकाशांत ढग वारंवार येतात त्यावरून पाऊस चांगला लवकर होईल असा रंग दिसतो. हवेंत ह्मणण्या सारखा थंडपणा नाहीं. रोगराई विशेष नाहीं. पेरणीचीं कामें झपाट्यानें चालू आहेत.

मि० मोहिद्दीन व मि० करी या नांवाचे दोन गृहस्थांस वऱ्हाडांत असि० कमिशनर नेमल्या विषयीं कळतें. हें खरें असल्यास वऱ्हाडांतील अब्याची लोकांचे हक्काकडे सर्वथैव दुर्लक्ष्य झालें हें अगदीं गैरशिस्त व अन्यायाचें होय.

आकोला मुनसिपालिटीच्या वार्ड नंबर १ साठीं एक सभासदाची जागा खाली होती. गेल्या शनिवारीं निवडणूक झाली. उमेदवार दोन होते. मि. थामसन डेपुटी कमिशनरचे हेड क्लार्क हे एक असून दुसरे गृहस्थ मि. जीवबा सोनार हे होतें. मि. थामसन यांची लोकामध्यें चहा होती असें निवडणूकीच्या निकालावरून कळलें तर तें अगदीं यथार्थ व स्वाभाविकच होय. अद्याप लोकांस स्थानिक स्वराज्याची ओळख असावी तितकी चांगलीशी नाहीं आणि त्यामुळें सार्वजनिक कार्यां निमित्त जितके योग्य उमेदवार निवडीसाठीं लोकांच्या समोर यावयास पाहिजेत तितके अद्याप पर्यंत येत नाहींत ही अकोल्यांतल्या सरकारच्या सुशिक्षित लोकांमध्यें मोठि उणीव आहे.

वऱ्हाडांत व इतरत्र हा मोहरमाचा सण दंग्या धोप्याशिवाय शांततेनें व गुण्यागोविंदानें पार पडला हें उत्तम होय.

मि० फ्रान्सीस लांड रेकार्डचे डायरेक्टर हे पुढील महिन्यांत मोठ्या मुदतीच्या फर्लो रजेवर जाणार असल्यामुळें त्यांचे जागीं लेफटेनंट हेग यांची नेमणूक होईल असें दिसतें आणि क्याप्टन ग्यारेट असिस्टंट डायरेक्टर हे रजेवरून परत आल्यानंतर इन्स्पेक्टर जनरल होतील असें कळतें.

### नोटीस

श्री कृपासागर रा० रा० शंकर वल्लद नारबा धनोजे उपनांव वईद राहणार शेणगांव परगणा तालुका व जिल्हा चंद्रपूर (चांदा) यांसः—

खाली सही करणार कळवितें कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज मला ऋतु प्राप्त होऊन ५ पांच वर्षें झाली या वेळेंपर्यंत आपण मला नेण्यास मुळींच आले नाहीं. त्या वेळेपासून मी आपल्या बापाच्या पदरचा खर्च खाऊन त्याचे घरीं राहत असतें. आपण त्यावेळी संलग्न नसल्यामुळें मला तुमच्या बापानें माझ्या बापाच्या घरीं आणून घातलें. आतां शेवटीं इतकीच विनंती आहे कीं ही नोटीस पावल्यापासून जर १५ दिवसांच्या आंत आपण आजपर्यंत माझ्या बापास लागलेला कर्जद्वारें खर्च रुपये १५० दीडशें न द्याल व आपण मला घेऊन न जाल तर मी दुसरा नवरा करीन. पुढें तुमची तक्रार बिलकूल चालणार नाहीं. आणि तसें न झाल्यास हाच राजीनामा समजावा. तारीख १५ जून सन १८९६ इ.

सही.

बजी मर्द शंकर धनोजे उपनांव वईद राहणार कोठें तालुके यवतमाळ जिल्हा वणी पोष्ट कळंब हातची बांगडी असे

### नोटीस.

किसन्या वल्लद चाहादु महार नागोली तालुका मोरतीजापूर जिल्हा उमरावती यांस नोटीस देणार मिरी मर्द किसन्या माहारीण राहणार डोणज तालुके व जिल्हे अकोले इजकडून नोटीसीनें असें कळविलें जातें कीं, तु माझा लग्नाचा नवरा असून अजमासे दहा वर्षें झाली तूं मजला नांदवींत नाहीस व माझ्या पोटाची व लुगड्याची वगैरे कांहीं तजवीज करीत नाहीस. मी तुजपाशी येऊन राहावयास सर्व प्रकारानें तयार आहे, मी व माझे बापानें तुजला दहा वीस वेळा मजला घेऊन जावे व नांदवावे माराहाण करूं नये अशा बद्दल सांगितलें व जातभाई पंचाकडून ही सांगविले परंतु ते सर्व व्यर्थ जाऊन मजला तूं नेहमी माराहाण करावीस, आती त्रास द्यावास, उपासी वनवासी ठेवावीस अशा प्रकारचे हाल करू लागलास व ते माझ्या हातून सोसवेनात व तुझी मजला अशी भिती पडली कीं, कोणच्यावेळी तु माझे जीवाचे नुकसान करीशील नेम नाहीं. ह्या भितीनें अन्नवस्त्र नाहीं. व तूं कोणचीच तजवीज करीत नाहीस या सर्व कारणामुळें मी आपले बापाचे घरी येऊन आज दहा वर्षे झाली राहिली आहे. दाहा वर्षांत मोलमजुरी करुन जें कांहीं कमी पडत असे तेवढे कर्ज तुझे नावावर काढून मी कसा तरी निरवाह केल आतां मजोरी होत नाहीं. कर्ज मिळत नाहीं ह्मणून तुजला असे कळविते कीं, मा पोटगीचा बंदोबस्त करून व माझे जीवा कांहीं इजा तुजपासून होणार नाहीं अश बद्दल चार भाई पंचाची खात्री करून द्या वीस व आजपावेतों पोटगीचे रुपये १८ देऊन मला घेऊन जावें. मी तुजपाशी नां दण्यास तयार आहे. तर नोटीस पावल्य पासून आठ दिवसांत सदरील क विश्याप्रमाणें करावें. असे झाले नाहीं त मी तुजवर दररोच्या पोटगीबद्दल सरकारां फिर्याद अगोदर करीन पोटगी नेहमी मि ळाल्यास ठीक. नाहीं मिळाल्यास इतके वसाचे पोटगी रुपये ( १८० ) बद्दल र्याद निराळी करून व तुजला माझी नाहीं हे पक्के समजून व हीच तुझी सोड चि समजून मी दुसरा घरठाव जातभाईंच्या पंचा मार्फत तूं मजला पोटास देत नाहीस सरकारांत फिरयाद करून घरठाव हे तुजला अगोदर कळविले आहे. दिल्ही नोटीस. सही ता. २६ माहे जून १८९६ इसवी.

सही.

सहीची निशाणी बांगडीं मिरी किसन्या माहारीण हातची आ

### नोटीस.

संवदरा मर्द विठु कसाब वस्ती हैसपूर हीस विठु वल्लद अनोबा कसाब राहणार पाठखेड नोटीस देतों. तु माझी लग्नाची बायको असून तुझा भाऊ यशवंता याचे मतानें तू माझे मुलीसहित माझे घरीं येत नाहींस यास्तव नोटीस देतों आजपासून १५ दिवसांत तू तुझे पोटी मजपासून झालेले मुलगी घेऊन माझे घरीं यावें. न आलीस तर तु वर व तुझ्या भावावर फिर्याद करून ताब्यांत घेतली जाईल. तारीख २८ जून स १८९६ इ.

सही

विठु वल्लद अनोबा कसाब नि

### नोटीस

यशवंता वल्लद तळेकर रहाणार यांस जनी मर्द यशवंता वस्ती पाटखे नोटीस देते कीं मी तुझी लग्नाची बायको असून तूं दुसरी बायको केलीस आणि मी घरी आले तर मला काढून लावितोस ला वागवीत नाहींस. गेल्या तीन वर्षांत १४४ रुपये मला तुझ्या नांवावर कर्ज कढावें लागलें आहे. कर्ज फेडावें सबब नोटीस देतें. मला खाण्यास व कपड्या करितां महा रुमये ४ प्रमाणें द्यावे अथवा मला सोड चिट्टी द्यावी. असें न केल्यास मला कोर्टी लग्न संबंध तोडणेंचा दावा करणें त्याचे व या नोटिशीचे खर्चा सहीत देणें पडेल. कळावें ता० २८ जून १८९६ इ०

सही

जनी मर्द यशवंत नि०

वर्तमान

तापी व्हॅली रेल्वे–ह्या रेल्वेच्या करारावर सह्या होऊन कंपनी उभारली. ही रेल्वे ५॥ फूट रुंदीची असून ती सुरतपासून सोनगड, नंदुरबार व अंमळनेरपर्यंत जावयाची असून तिला फांटे फोडण्याचा व लाईन वाढविण्याचा अधिकार कंपनीस आहे. कंपनीचें भांडवल १३० लक्षांचें असून त्यांपैकीं ३४ लक्षांचें शेअर्स श्री. गायकवाड सरकारानें घेतले असून रेल्वे करितां ३४ मैलपर्यंत जमीनही मोफत दिली आहे. कंपनीच्या प्रत्येक शेअरची किंमत ५०० रुपये असून त्यापैकीं बहुतेक अहमदाबाद व सुरत येथील गृहस्थांनींच खरेदी केले आहेत.

देशी कापड व मलमल लखनौ जवळच्या लहान शहरांत मलमल फारच चांगली होऊं लागली आहे. व अजमगड जिल्ह्यापैकीं डोयेथें असून्येदार येथेंही फार चांगली मलमल होते. ह्या खप नेपाळांत फार आहे. तसेंच रामपुरी येथे केसांचें उत्तम कापड तयार होतें.

वैद्युतशक्तीचें प्रदर्शन—विद्युत् शक्तीनें काय होतें हें जगांस दाखविण्या साठीं न्यूयॉर्क ( अमेरिका ) येथें थोड्या दिवसां एक प्रदर्शन सुरू झालें आहे. गव्हर्नर साहेब ह्यांनीं मुद्दाम तयार केलेला सोन्याचा बुदामे दावण्याबरोबर न्यूयॉर्क, सानफ्रान्सिसको, आणि न्यू ऑर्लियन्स तीन शहरीं तोफांचे आवाज सुरू झाले. तोफांस बत्ती देण्यासाठीं विजेची शक्ति नायगरानदीच्या धबधब्यापासून आणिली होती. त्याचप्रमाणें नायगरानदीच्या धबधब्याचा आवाज किती प्रचंड आहे हें लोकांस समजाविण्या साठीं तो टेलिफोननें प्रदर्शनच्या जागेंत आणिला होता. असें तिकडून आलेल्या तारेवरून समजतें.

कुत्र्यांशीं खेळतांना सांभाळा–कलकत्यास राहिलेल्या एका युरोपियन बाईचें एक लाडकें कुत्रें होतें. त्या कुत्र्याशीं ती इतकी खेळे आणि त्याचे मुके घेऊन घेऊन त्यास मेनतुट बेजार करी कीं तें कांहीं सांगतां येत नाहीं. ह्याप्रमाणें एके दिवशी ती त्याचे मुके घेत असतां तें कुत्रें तिच्या तोंडास सपाटून रडे त्यामुळें त्या बाईच्या तोंडास इतकी झाली कीं ती बरी होण्यासाठीं विलायतेस गेली. हें चावलेलें बरें झालें तरी त्या बाईच्या चेहऱ्यावर त्या चावण्याची जन्माची निशाणी खचित राहणार. तें कुत्रें पिसाळलेलें नव्हतें ही त्या बाईच्या सुदैवाची गोष्ट

शु. सू

नकली नाणीं— रावलपिंडी येथें बहुत लोक बनावट नाणीं वापरण्याबद्दल पकडण्यांत आले आहेत.

काळ्या रंगाचा कपडा धुऊन स्वच्छ करणें असल्यास धुण्याच्या पाण्यांत मीठ टाकिलें असतां त्या कपड्याचा रंग न जातां तो स्वच्छ निघतो.

थोडे दिवसांपूर्वी दोन खबुतरें उडवून तीं किती लांब उडून जातात त्याचा लंडन येथे अनुभव बघण्यांत आला. ती खबुतरें ६ तासांत ११० मैल लांब गेलीं. ह्मणजे दर तासीं १८ मैल प्रमाणें गेलीं असावीं असा हिशेब निघाला.

ज्ञा० च०

निझामाच्या हैदराबादचा एक बातमीदार सांगतो कीं, तेथें सर सालरजंग मेमोरियल जनाना स्कूल नावाची स्त्रीशिक्षणाची एक शाळा मोठ्या थाटानें सुरू करण्यांत आली. नबाब मुकरंग उदवला यांच्या राजवाड्यांत ही शाळा झाली आहे. पहिले प्रसिद्ध सर सालरजंग यांची कन्या नुरुन निसा बेगम साहेब मुकरन उदवला यांची पत्नी ही या शाळेची उत्पादक आहे.

इजिप्तच्या कामगिरींवर नुकतीच जी पायदळ फौज गेली त्या फौजेस परत आणण्याकरितां क्लाइव नांवाच्या आगबोटींस ताबडतोब मोम्बासा येथें जाण्याचा हुकूम झाला असें सिमल्याची तार सांगत्ये. हा काय प्रकार आहे समजत नाहीं. अक्टोबरांत आणखी १०,००० फौज हिंदुस्थानांतून तिकडे पाठविण्याचें ठरलें आहे असें नुकतेंच प्रसिद्ध झालें असून आतां ही गेलेली फौज परत आणण्याचे ठरलें तेव्हां यांतलें इंगित कांहींच समजत नाहीं.

कलकत्यास कित्येक युरोपियन जिन्नस जें विकण्याकरतां येतात तेच आतां जपानांतूनही येऊं लागले असून जपानी स्वस्त पडत असल्यामुळें युरोपियन जिनसांस गिऱ्हाईक नाहीं असें होत चाललें आहे असें सांगतात.

केप कालनीच्या कान्सरवेटरचा भाऊ मि० हचिन्स सांगतो कीं, दक्षिण आफ्रिकेंत हल्लीं जीं चिन्हे होत आहेत त्यावरून येदां हिंदुस्थानांत चांगला पाऊस पडण्याचा रंग दिसत नसून १८७६ सालच्यासारखा प्रकार ( दुष्काळ ) होण्याचा संभव आहे.

पावसाची कमताई पंजाबांत फार जाचत आहे. लाहोर, शापूर, रोटक व गुजरानवाला या जिल्ह्यांतल्या गुरांची स्थिती फारच भयंकर झाली असून हिजार प्रांतांतलीं गुरें तर चारा पाण्यावाचून मरत आहेत. शारकपूर तालुक्यांत दुष्काळांचीं कामें सुरू केलीं व ७,४६० माणसें हीं जमलीं.

नार्थवेस्ट प्रांतातल्या दुष्काळकामावर हल्लीं १,९०,००० माणसें आहेत. मागच्या आठवड्यांत २,७७,००० होतीं. जूनचा आरंभ होऊन वरसांत सुरू होतांच एकदम इतकी माणसें कशी कमी झालीं समजत नाहीं. कदाचित शेतकरी शेतकीच्या मार्गें लागण्यास गेले असतील असें ह्मणण्यास जागा आहे. पण दुष्काळकामावर पटकीचा वाखा सुरू झाल्यानें जर लोकांची पळापळ झाली असेल तर त्या गेलेल्या लोकांची विपत्ती फारच वाईट होईल.

फाशींची शिक्षा झालेल्या कैदीनें इलाख्याच्या सरकारच्या ठरावाविरुद्ध त्यांच्या वरिष्ठांकडे अपील केल्यास तें पुढें पाठविलें पाहिजे असें ठरलें आहे.

येत्या हिंवाळ्यांत अमेरिकेंत देशोदेशीच्या पोष्ट खात्यांतल्या शहाण्या व माहितगार निवडक लोकांची एक सभा भरावयाची असून त्याकरतां हिंदुस्थानच्या पोष्ट खात्यांतला एक कामदार जावयाचा आहे.

जपानच्या गोदींत नवीं लढाऊ गलबतें तयार करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें आहे असें सांगतात!

रशियन लोकांची एक कंपनी कुश्क येथें दाखल झाली आहे.

इजिप्तच्या नांवाखाली जी निल स्वारी निघाली आहे तिचा उद्देश डोंगोला पुरताच आहे. डोंगोला घेतल्यावर हीं स्वारी पुढें जाईल किंवा नाहीं हें तूर्त सांगतां येत नाहीं, पण खारटूमवर झेंडा लागल्यावांचून इजिप्त देश सुरक्षित आहे असें ह्मणतां येणार नाहीं व ही स्वारी करून जाणाऱ्या इजिप्त फौजेच्या सरदारास डोंगोलाच्या पुढें जाऊं नये असें सांगण्यांतही आलें आहे असें इंग्रज प्रधान सांगतात.

क्रीट बेटांतला बंडावा चालूच असून कांहीं सामनेही झाले.

केप मेल आगबोट लंडन येथें जात असतां ता. १७ रात्रीं उशंट खडकास लागून फुटली. तिजवर २७७ माणसें होतीं पैकीं ३ बचावलीं व बाकी ठार झालीं.

जपानच्या उत्तर भागांत एक भयंकर धरणीकंप झाला. त्यांत कामाशी नांवाचें एक शहर अगदीं नाहींसें झालें व दुसऱ्या पुष्कळ शहरांचाही नाश झाला. १०,००० माणसें ठार झालीं.

इंग्रज व वेनिझुला यांच्यांत हातघाई सुरू झाली.

टा० अ०

चालणारा डोंगर:— फ्रान्सच्या गार्ड परगण्यांतील गरडन नदीच्या डाव्या कांठावर गुफरे नांवाचा एक ६९० फुट उंचीचा पहाड आहे. तो फेब्रुवारीच्या १९ व्या तारखेस मुळची जागा सोडून नदीकडे चालूं लागला तो ता. २३ पर्यंत सारखा चालून एका कोळशाच्या खाणीचा अर्धभाग व आलाई रेलवेचा सुमारे एक मैल रस्ता अडवून बसला आहे. या पहाडाच्या सरकण्यानें नदीस ६॥ फुटाचा बांक घ्यावा लागला असून ग्यांडकोंबे येथील ६९० लोकांस घरें सोडून जावें लागलें. ता. २९ फेब्रवारीस पहाड स्थीर झाला आहे. पण इंजिनियर लोक ह्मणतात तो तेथें न राहतां नदीपलीकडील दुसऱ्या पहाडास जाऊन मिळेल व गर्डन नदीकरितां वेगळा मार्ग करून द्यावा लागेल. पहाड हालण्याचें कारण इंजेनीयर लोकांनीं असें शोधून काढलें आहे कीं, त्याच्या खालीं असलेली रती, चिकणमाती वगैरे नदीच्या प्रवाहानें वाहून गेल्यामुळें त्याचें चलन झालें होतें.

वाहाटुळानें उडून मेला— गेल्या बुधवारीं दोन प्रहरीं नाशिक येथें फारच जोराचा वारा सुटला होता. त्या वाऱ्याचे सपाट्यांत तेथें गांवाच्या बाहेर पोलिस लायनीचे जवळ मोठे वाहाटुळाचे चक्रांत तेथील गुडदाणी विकणारा रामलाल भुसारी गुडदाणी विकण्यास गेला होता, तो वाऱ्यानें उडून जवळच विहीर होती तींत पडून बुडून मेला.

दी. बं.

चामडी कमावण्याचा कारखाना सरकारास फायदेशीर होईल, अशा मोठ्या प्रमाणावर चालविण्याचा विचार हिंदुस्थान सरकारनें केला आहे.

कत्तल—इजिप्तांतील सौदन प्रांतांत फ्रेंच लोकांची एक शास्त्रीय मंडळी आली होती; तिची टोळीतील लोकांनीं कत्तल उडविली.

सागर जिल्ह्यांत पडलेल्या दुष्काळानें लोकांचे जे हाल होत आहेत ते ऐकले तर काळीज अगदीं चरारून जातें.

स शो,

अझमगडच्या म्युनिसिपालिटीनें रांडावर कर बसविण्याचा ठराव केला आहे. उत्तम.

चिनची तयारी–चिनी फौजेस कवाइत शिकवून तयार करण्य करितां युरोपीयन हपिसरांची योजना अलीकडे करण्यांत आलेली आहे. प्रथम त्यांचें तालमेंत २००० पायदळ, घोडेस्वार ४००, व तोफखान्याकडील लोक ४०० इतके लोक दिले असून हे तयार झाले ह्मणजे दुसरे द्यावयाचे, असा क्रम सर्व चिनी फौज तयार होई पर्यंत चालविण्याचा निश्चय झाला आहे.

---

नोटीस.

क्लास नंबर ७ किरकोळ मुा नंबर ३

१८९६

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं तान्हु वल्लद हिरामन बारी राहणार जामोद तालुके जळगांव जिल्हा आकोला यानीं सि० प्रो० कडे कलम ३४४ प्रमाणें नादारींत अर्ज केला आहे त्याची चौकशीची तारीख ८।७।९६ इसवीची नेमली आहे. ज्या कोणाची तकरार असल्यास त्यांनीं आमचे कोर्टांत सदर्हू तारखेस सकाळीं १० वाजतां हजर व्हावें, हजर न झाल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें तारीख २३।६।९६ इसवी.

V. N. Dandekar
Judge
Insolvency Court
Akola.

धनकोचे नांव

| | |
|---|---|
| १ हिरामण पुरणलाल मारवाडी राहणार जामोद रु० | ९९ |
| १ धनालाल तुकडाजी मारवाडी दुकान जामोद रु० | ५०० |
| १ रामप्रताप हरिचंद मारवाडी दुकान जामोद रु० | २०० |
| | ७९९ |

येणें प्रमाणें सावकार लोकांचे देणें असे ता. २३।६।१८९६ इसवी.

V. N. Dandekar
Judge
Insolvency Court,
Akola

---

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोले म्युनिसिपाल कमिटीचे हद्दीतील बारा फत्तराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलांव सन १८९६।९७ सालाबद्दल तारीख २ माहे जुलई सन १८९६ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौन हालांत हजर व्हाव कळावें, तारीख ४।६।९६.

Md. Husain
Secretary
A. M. C.

---

हे पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,,१ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

Six monthly ... ... ... 3 ,, 8
Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine 3 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR


VOL XXX AKOLA MONDAY JULY 6 1896 NO 26

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख ६ माहे जुलै सन १८९६ इ० अंक २६

## घड्याळ

किंमत ६ रुपये हमी ३

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटो प्रमाणें वॉच घ्या. ८०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे फिरविण्यास ठेच असून सेकंडकाटा आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस जुंवल [ ह्मणजे चक्राचे खालीं वर हिरे ] बसविले आहेत. ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरी घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।१२ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. ने० घड्याळ पाठवूं.

टीपः- " गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पाळ.
६२-२४ वाचमेकर आणि रिपेरर नासिक.

## जाहिरात

( उपयुक्त कंपनी )

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं, वाशिमाहून आकोल्यास व इंगोलीहून आकोल्यास जाणें असल्यास लोकांस फार गैरसोय आहे व वक्तशीर जाणें येणें होत नाहीं. याजकरितां ही अडचण दूर व्हावी ह्मणून आह्मी कंपनी मार्फत चांगली व खात्री लायक व्यवस्था करणार आहो. कंपनीचें भांडवल एकंदर १०००० रुपये करून एकंदर २०० शेर काढले आहेत व ही कंपनी पुढें रजिष्टरही केली जाईल. याजकरितां या कंपनीचे शेर घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्याणीं तारीख ८ सप्तेंबर १८९६ चे आंत लागतील तितके शेर घ्यावेत. निमे शेर भरले गेले आहेत तेव्हां त्वरा करावी. प्रत्येक शेर ५० रुपयांचा काढला असून एकंदर घेतलेले शेरचे रुपये तारीख ८ अक्टोम्बर सन १८९६ चे आंत कंपनीचे डायरेक्टर यांचे कडेस पाठवावेत.

शेर घेणारास या शिवाय ज्यास्त कांहीं माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं डायरेक्टर यांस विचारल्यास दिली जाईल. जबाबा करितां अर्धा आण्याचें तिकीट न पाठविल्यास जबाब नाटपेड पत्रानें दिला जाईल कळावें.

सह्या.

यशवंतराव वामन दिघे वकील राहणार वाशीम. } डायरेक्टर
शेषराव रघुनाथ वकील. }

मेंबरसं.

राजे काशीराव शंकरराव देशमुख
त्रिंबकराव विठ्ठलराव देशमुख प्रगणें वासीम.
बालकिसन जियालाल ज्यागीरदार.
बाळकृष्ण रामजी

सेक्रेटरी.

हबिबुल्ला गुलामहुसेन

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९चा अक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मु. नंबर ६ वर्ग १९.

१८९६

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर याचे कोर्टांत.

नांव—रुखमाई

जवजे –खुशाल कुणबी तर्फे मु० खुशाल वल्लद धुंदाजी

राहणार—देवगांव तालुके दर्यापूर

जिल्हा–एलिचपूर यांस मयत

राजाई जवजे नरसाजी कुणबी राहणार सुरवाडा तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २२ माहे जुलई सन १८९६ इसवी रोजीं सहरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १९ माहे जून सन १८९६.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur
ज्यडज्य.

---

नोटीस

बुनाबाई मर्द खुशाल रावणकार शिराळें तालुके चिखली जिल्हा बुलडाणे इजप्रती नोटीस गुनाबाई मर्द सखाराम रावणकार राहणार हल्लीं खापगांव तालुके खामगांव जिल्हा अकोला मजकडून नोटीस देण्यांत येते कीं बुनाबाई मर्द खुशाल रावणकार हल्लीं शिराळें ही माझी सापत्न सासू आहे इजला मी खाण्यापिण्या बद्दल ठराव केला असून त्या ठरावामध्यें जे इसम होते ते येणेंप्रमाणें कृष्णाजी व. सदाशिव पाटील उंद्री; कृष्णाजी उपासा पिंपरीको, सोनाजी लोखंडकर वस्ती लोसंड, सदाशिव शिवराम आळलें व. पाळे लोखंडे सदरील इसमांनीं तिजला देण्यास कबूल केलें तें धान्य वगैरेचे ठराव झाला त्यास सरासरी तीन महीने झाले तो येणेंप्रमाणें जवारी ।॥. मण, दोन मण ८२ गहूं शिवाय रुपये १९ अक्षरी पंधरा सदरीलें ठरावामध्यें राजी होते परंतु तिनें हा ठराव कबूल केला नाहीं. व ती खाण्यापिण्य बद्दल धान्य व रुपये लोका पासून काढून खात आहे व मी तिला दर दिवशीं खाण्यापिण्यास देण्यास राजी असतां ती माझ्याविरुद्ध वर्तन करून हल्लीं लोकांचें कर्ज काढत आहे त्याबद्दल मी जबाबदार नाहीं तिनें खुषीनें मजला खाण्यापिण्यास मागावें व मीही देण्यास राजी आहें या नोटीशीचें उत्तर यावें तारीख ३०-६-९६ इ०

( सही )

गुनाबाई मर्द सखाराम रावणकार
खामगांव निशाणी हातची
बांगडी. दस्तुर सदाशिव
गुमास्ता.

---

## पाप मीमांसा.

[ आमच्या एका मित्राकडून ]

( मागील अंकावरून पुढें. )

परंतु पाप आलें कोठून याचा आद्याप निकाल सांगितला नाहीं. याचा उत्पन्न कर्ता ईश्वर आहे कीं काय किंवा पाप ही दुसरी एक व्यक्ती ईश्वरापासून आहे कीं काय याचा विचार करूं. पौराणिक पद्धती प्रमाणें कृत, त्रेत, द्वापार व कली अशी निरनिराळी युगें मानलीं आहेत. पहिल्या युगांत पाप नव्हतें. पुढें हळु हळु पाप येत चाललें असें वर्णन आहे परंतु तें कसें आलें या विषयीं दुसऱ्या धर्मांत ज्या कथा आहेत त्या सारखी एखादी आपले ऐकिवात नाहीं. कोणी असें सांगतात कीं हा सगळा मायेचा [illegible] आहे माया अनादी आहे, इतकें ह्मटल्यावर मग मूळ कसें शोधावें. शंकराचार्यांच्या मता प्रमाणें ईश्वर सुद्धा मानणें हें अज्ञान. मूलतत्व जें ब्रह्म त्या ब्रह्मा पासून सर्व आहे. असो. आतां या पापाचा किंवा पाप शक्तीचा कर्ता ईश्वर असे शकेल कीं नाहीं हें पाहण्याला आपणास ईश्वराचा स्वभाव कसा आहे हें कळलें पाहिजे. ईश्वराची व्याख्या निरनिराळ्या रीतीनें केली आहे त्यातून प्रत्येक खरी किंवा खोटी या विषयीं सध्या खात्री करून घेता येणार नाहीं. कोणी ह्मणतात तो मंगलमय आहे. कोणी ह्मणतात तो सर्ग–स्थिति–लय कर्ता आहे. प्रथम असें सांगितलें पाहिजे कीं ईश्वराची व्याख्या करिता येणार नाहीं. कारण तो अद्वितीय आहे, तेव्हां सृष्टीतील सर्व नियम त्याला लागतात असें ह्मणता येणार नाहीं. महतो महीयान्. आणोरणीयान ह्मणजे मोठ्या पेक्षां मोठा व अणू पेक्षां अणू असे दोनी परस्पर विरोधी गूण त्याच्या ठिकाणीं संभवतात. तसेंच तो दयाशील व न्यायी आहे. न्याय व दया यांचा कोठें विरोध पडतो तरी हे दोन्ही गूण त्याच्या मध्यें आहेत. राम अवतार म्हणजे सत्य वचन, सत्य वर्तन याचा केवळ ठेवा मानलेला आहे आणि पापाचा प्रवर्तक जर कली अवतार तर हे अवतार कोणाचे ? हे एकाच व्यक्तीचे जर असतील तर पाप पुण्याचें कर्तृत्व एकच ठिकाणीं संभवण्यास हरकत कोणती ? आतां ही गोष्ट जरी तर्क शास्त्र विरुद्ध दिसली तरी त्यास उपाय नाहीं. परंतु ज्या प्रांतांत तर्कशास्त्राचा रिघाव नाहीं तर्कशास्त्र जर सर्व दृश्य वस्तूंच्या अनुभवावरून या अपूर्ण जगांत ज्या वस्तू [illegible] त्यावरून रचलेलें तर तर्क शास्त्र संपूर्ण विचार रहीत ठेवू. आता पापाची [illegible] ती जरी ईश्वरानें केली तरी पापा विषयीं प्रवृत्ती करणें न करणें मनुष्यावर आवलंबून आहे. त्यानें हें पाप का उत्पन्न केलें याचें आपणास ज्ञान [illegible] कठीण आहे. कारण या अपार विश्वमंडळांत कोणत्या वस्तूचें प्रयोजन काय आहे हें आपल्या कोत्या बुद्धीस कळत नाहीं. कदाचित मानवी सृष्टीस ही आवश्यक गोष्ट असेल; त्या वाचून होत नसेल. या थोर मानवी देहाला मलमूत्र द्वारें नसतीं तर याही पेक्षां कदाचित् त्याची योग्यता वाढली असती. मोठमोठीं मंदिरें जशी शौच कूपा शिवाय व्यर्थ आपणास वाटतात तसेंच या सृष्टीस पापाची जरूरी असेल.

आतां पारसीक धर्म घेऊं:— हा धर्म इराणांतील लोकांचा. हा धर्म झोरोष्टर किंवा गरतोस्त यानें इ० स० १२०० च्या पूर्वी प्रचलित केला. यांत पापाची एक व

ऱ्याची एक अशा दोन देवता मानल्या आ त. पापाचें नांव आहूरमन व पुण्यवर्धक वतेचें नांव हुरमुस्द. या दोघांचें नेहमी यु- चालणार व यांत पुण्य देवतेचा नेहमी य होणार. या दोघांचें सामर्थ्यसारखें आहे तु या आहुरमनाला उत्पन्न कोणी केला विषयीं कांहीं माहिती नाहीं. डा० किंग वर टीका करितात कीं, ही पुण्य देवता अती शक्तिमान आहे तर तिच्या उलट ती निर्जिव असली पाहिजे आणि असल्यावर दोघांच्या युद्धांचें तरी कार काय? आणि पुण्य शक्ती जी हुरमुस्द या नेहमी जय होणार हें कशावरून?

आतां बौध्य धर्माकडे वळूः— बौध्य ध . पाप प्रवृत्तक पुरुषाचें नांव मार आहे. बुध्द आपल्या राज वाड्यांतून बाहेर ऱ्याचे दिवशी रात्रीं त्याला एक दृष्टांत . त्यानें आकाशांत मार नावाचा पा- पाहिला. रानांत एकांत वास करून व दुःख या पासून तरण्याचा उपाय याचा विचार करण्याचा त्याचा झाला होता. हें माराला ठाऊक झालें तेव्हां आपलें प्राधान्य मग राहणार असें वाटून मारानें गौतमाला पुष्कळ त्याकडे वळविण्या विषयीं प्रयत्न तूं जर माझें ऐकशील तर दिवसांत चारी खंडाचा तीं राजा करीन, गौतमानें त्याचें कां- चालू दिलें नाहीं तेव्हां मार आपल्याशी णाला कीं केव्हां तरी याचे मनांत वाईट विचार येईल, तेव्हां मी त्याला वश करीन. त्या दिवसा पासून तो बुद्धाचे पाठीस लाग- . पुढें एके दिवशीं अरण्यांत माराची व गौतमाची लढाई झाली त्यांत समुद्र खवळला, रे पडले, सूर्याला ग्रहण लागलें असा वृतां- घडला. मार बुद्धाचा छळ करतो तोच पापप्रवर्तक आहे असें मानतात. ला उत्पन्न कोणी केला याचा वृत्तांत कोठें हीं. जग झालें कसें, पाप कसें आलें याचा मुळींच विचार करीत नाहींत. व- स्थिती आहे तशी मानून त्या पा- सुटण्याचा त्यांचा विचार चालतो.

सें ं ख्रिस्ती धर्माकडे वळूं. यांत पाप- ईच्या पुरुषाचें नांव सैतान. याच्या उत्पत्ती नशा एक गोष्ट आहे. परमेश्वरानें प्रथम लेले उत्तम बाग उत्पन्न केली, त्यांत सर्व द्धी करून ठेविली, त्यांत स्त्री पुरुषाचे डें आणून ठेविलें, त्यांचें नांव ऍडाम लोक इव्ह, यास जगांतील सर्व पदार्थांचा भोग घेण्यास परवानगी दिली, फक्त एका स मात्र न शिवण्याबद्दल आज्ञा केली. words of the world besides असें ह्मटलें आहे. एके दिवशीं ईश्वराचा द्रोही जो सैतान तो सर्प रुपानें येऊन त्यानें इव्हचें मन झाडाचें फळ खाण्यास वळविलें, तें फळ खाण्या बरोबर झाली ईश्वराज्ञा उल्लंघन. सैतान कोण याची थोडी माहिती सां- गितली पाहिजे. ईश्वराचे राज्यांत एक मोठा देवदूत होता, त्याला ईश्वराचें वर्चस्व सहन होईना. त्याची व ईश्वराची लढाई होऊन त्यास नरकांत दिला फेकून, तेव्हां पासून तो ईश्वराच्या कृतीचा नाश कर- ण्याचा संकल्प करूं लागला. ह्मणजे ख्रिस्ती शास्त्रांत पापाचा उत्पादक सैतान. परंतु त्यास उत्पन्न को- णी केलें, त्याच्या मनांत ईश्वराच्या राज्या विषयीं मत्सर का उत्पन्न झाला याविषयीं कांहींच सांगितलें नाहीं.

अतां महमदी धर्म पाहूं:—हा धर्म म- हमदानें स्थापन केला. देव दूत गेब्रीएल याच्या सांगण्या वरून केला. यांत पापाचा उत्पादक कोण याचा थोडा संशय येतो. परंतु कुराणांत असें ह्मटलें आहे कीं ईश्वर सर्वांचें मूल आहे. ज्याचे प्रारब्धानें पुण्य व्हावयाचें असेल तो पुण्यवान होतो व न- सेल तो पापी होईल. या वरून दोहींचे कर्तृत्व ईश्वराकडे आहे. परंतु बायबल महंम- दाला मान्य होतें या वरून पापवर्धक सै- तान असावा. यांच्या मध्यें २२४००० पैगंबर नूसा, मुसा वगैरे होऊन गेले परंतु सैताना- च्या उत्पत्ती विषयीं त्यांनीं शोध केले नाहींत. कसुसूल आंबीया नांवाचें ग्रंथांत बाय- बल प्रमाणेंच सैताना बद्दल गोष्ट आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ११ शके १८१८

मुंबई युनिव्हरसिटीच्या परीक्षा संबंधानें एक नामी सुधारणा झाली आहे. या सुधारणेचें मुख्य श्रेय नामदार न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांस आहे. विद्यार्थी मंडळीच्या अडचणी काय काय असतात हें या विद्वन्मणीच्या पूर्तेपणीं लक्ष्यांत आलें आहे. युनिव्हरसिटी- च्या अभ्यास क्रमांतल्या दोषामुळें विद्या- र्थ्यांच्या मनावर कसकसे परिणाम होतात. विद्यार्जनाचे कोण कोणते मार्ग खुले असा- वेत, शिकलेली मंडळीं अल्पायुषी कां हो- तात इत्यादि प्रश्नांचा विचार न्यायमूर्ती रा- नडे यांनीं चांगला केला आणि त्यांच्या मनाची पक्की खात्री होऊन चुकल्या नंतर त्यांनीं युनिव्हरसिटीच्या परीक्षेचा पंथच सुधारण्याचें मनावर घेतलें. त्यांच्या प्रय- त्नाला वारंवार प्रत्यवाद येत असत तथापि क्रमशः त्यांचे विचार लोकांच्या मनावर चांगले ठसून त्यांची कृती यशप्राप्तीनें मं- डित झाली हें पाहून मोठा आनंद वाटतो.

नामदार रानडे यांची जी सूचना हल्लीं पसार झाली आहे ती गेल्या सप्टें- बरापासून विचारांत होती. सूचनेचें मु- ख्य तत्व असें कीं युनिव्हरसिटीच्या परी- क्षेंत जर एखाद्या विषयांत विद्यार्थ्यानें प्रा- विण्य दाखविलें आणि इतर विषयांत तो उतरला नाहीं तर जो विषय चांगला तयार झाला आहे त्या विषयांत पुन्हां परीक्षेस बसण्याची गरज नसावी. युनिव्हरसिटीच्या परीक्षा पुष्कळ बिकट असतात. अभ्यास- क्रमाच्या ठराविक मुदतींत या परीक्षा एक- दम न उतरल्या मुळें पुष्कळ विद्यार्थ्यास अनेकें वार्षिकी वाऱ्या करूनही वरिष्ठ शि- क्षणाचा मार्ग पूर्णपणें क्रमता येत नाहीं. वारंवार विद्यार्थ्यांची कुचंबणी होते, विषयबाहुल्यामुळें कच्चा विषय दरसाल कच्चाच रहातो, आणि एका विषयां त नापास झाल्यामुळें सर्व विषयांत नापास झाल्या सारखाच परिणाम घडतो. दरसाल नवी विटी व नवा दांडू असा प्रकार घडत असल्यामुळें कित्येक विद्यार्थी नाउमेदीनें, खट्टू मनानें व अपयशाच्या लाजेनें सर्व व्या संग सोडून देतात आणि खरोखर जे उत्तम विद्वान ह्मणून नाणवले असते ते त्यांच्या एखाद्या विषयांतल्या पंगूपणामुळें लौकिक दृष्ट्या अगदीं बाजूस पडून त्यांच्या मनानें ते कुचकामाचे ठरलेले आहेत. एखादी परी क्षा उतरली नाहीं तर तिला पुन्हां सर्व विष- यांत बसावें लागत होतें त्यामुळें, अभ्यासा- चा बोजा भारी पडत असे आणि कधीं क- धीं तो भार बरोबर समतोल न झेंपल्यामुळें निराळ्याच विषयांत कमतरता होऊन ना- पासाचा डाग लागण्यास उशीर लागत नसे.

विषयवारीनें परीक्षा दिली असता चाले- ल अशा मतलबाचा नवीन ठराव गेल्या सोम वारीं सिनेटमध्यें पसार झाला यामुळें पुष्क- ळ विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होतील. ज्यांस संपूर्ण परीक्षा झेंपणार नाहीं त्यांनीं यथाशक्ती एक एक दोन दोन किंवा बहुत विषय तयार करावेत आणि परीक्षेत गोळा- बेरजेनें पास व्हावें अशी नवीन योजना झा- ली आहे. नामदार रानडे यांची सूचना अशी होती कीं युनिव्हरसिटीच्या परीक्षेत ज्या वि षयांत जो विद्यार्थी शेंकडा ४५ गूण मिळ- वील त्या विषयांत त्याला पुन्हा परीक्षेस ब सण्याची जरूर नसावी. मात्र अशी भागा भागानें ज्यांची परीक्षा उतरेल त्यांस पास वर्गांत गणिलें जावें आणि त्यांची गणना ब हुमानसूचक वर्ग १ किंवा वर्ग २ मध्यें होऊं नये. या सूचनेवर उपसूचना मि० ना- यगामवाला यांनीं आणिली होती कीं परी- क्षा उतरण्याला जितके गुणांची बेरीज ला गते त्या पेक्षां शेंकडा १० प्रमाणानें अधिक गूण मिळाले पण एकाच विषयांत विद्यार्थी उतरला नाहीं किंवा वैद्यक व इंजिनिअरींग शाखेस एखाद्या विषयांत त्यास शून्य गूण मिळाला तरी त्यास पासाच्या वर्गांत काढावें. फक्त या नियम स्कूल फायनल, एम. ए. व एम. डी या परीक्षांस लागू करूं नये. प्रोफे- सर हार्थानेवेट यांनीं या सूचनेचें जोरदार रितीनें पुष्टीकरण केलें होतें. पण या उपसूच नेचें तत्व मूळ सूचनेच्या अगदीं उलट होतें. नामदार रानडे यांच्या सूचनेचा अर्थ असा कीं जो विषय कच्चा असेल तेवढाच पक्का चांगला तयार करून विद्यार्थ्यांनीं त्या- च परीक्षेस पुन्हा यावें आणि मि. नायगाम- वाल्यांच्या सूचनेचा भावार्थ असा कीं ए- खादा विषय कच्चा असला पण इतर विषयां- त चांगली पारंगतता दिसून आली तर त्या कच्च्या विषया बद्दल माफी देऊन विद्या- र्थ्यास पास करून घ्यावें ह्मणजे जो विषय चांगला नाहीं तो तसाच राहिला तरी हर- कत नाहीं. अर्थात ही उपसूचना रद्द झाली. नामदार सेटलवाड यांनीं नामदार रानडे यांच्या सूचनेच्या तत्वावरच निरनिराळ्या परीक्षांतील फरक लक्ष्यांत आणून एक उ- पसूचना केली. ती अशी कीं, आर्ट शाखे- कडील परीक्षेमध्यें ज्या विषयांत शेंकडा ४५, गूण कायद्याच्या परीक्षेमध्यें ज्या वि- षयात शेकडा ५० आणि मेडिकल कडील तीन विषया पैकीं ज्या दोन विषयांत शेंक- डा ५० किंवा तिन्ही पैकीं ज्या एकाच वि- षयांत शेकडा ६० गूण मिळतील त्या वि- षयांत पुन्हा परीक्षेला बसण्याची गरज नाहीं ही उपसूचना पसार झाली. आणि त्यानंतर प्रोफेसर मुल्लर साहेबांच्या उपसूच- नेवरून असें ठरलें कीं वरील नियम स्कूल फायनल, म्याट्रिक्युलेशन व एम. ए. या परीक्षांस लागू करूं नये. या दोन उपसू- चनाच्या अनुरोधानें नामदार रानडे यांची मुख्य सूचना बहुमतानें पसार झाली. ६५ मतें अनुकूळ ३ मतें प्रतिकूळ होतीं. एकं- दरीनें फार उत्तम सुधारणा झाली आणि तिचें फळ थोड्याच वर्षांत चांगले नजरेस पडेल यांत शंका नाहीं.

———

वृथा खपपट झाली असें हल्लीं बसलेल्या रायल कमिशनच्या रंगरूपा वरून दिसतें. मुंबईच्या प्रेसिडेन्सी आसोशिएशन सभेनें डाक्टर बहादूरजी यांस त्या कमिशना समोर साक्षी साठीं विलायतेस धाडलें आहे. ही साक्ष घेण्यापूर्वी डाक्टर मजकूरांनीं लेखी हकीकत दाखल करावी ह्मणजे मग साक्ष घेतां येईल किंवा याचा विचार केला जाईल असा जबाब कमिशन कडून मिळाला आहे. डाक्टर बहादूरजी यांची साक्ष लष्करी वैद्यक खात्यांतील आवश्यक सुधारणे संबंधानें व्हा- वयाची आहे पण अशी गोष्ट नमूद करणें कमिशनच्या कार्यमालेंत येतें किंवा नाहीं अशाच मुद्याचा प्रथम प्रश्न निघाला आहे. मि० कालिन क्यांपबेल यांनीं नामदार मेथा यांस लिहिलें आहे कीं रायल कमिशनचें काम फक्त खर्चाच्या संबंधानें चौकशी कर- ण्याचें आहे. सिव्हील आणि मिलिटरी खर्च स्टेट सेक्रेटरी व इंडिया सरकार यांच्या हु- कमा अन्वयें होत असतो तो यथायोग्य व पद्धतशीर होतो किंवा कसें या विषयीं राय- यल कमिशनला चौकशी करावयाची आहे.

रायल कमिशनच्या कार्याची व्याप्ती फार संकुचित आहे. त्यांचा अधिकार राज- नितिच्या धोरणाकडे लक्ष्य देण्या इतक्या लांबवर पोचत नाहीं. राज्यकारभाराची तलें खर्चाच्या बाबी कमी किंवा ज्यास्त करितात. लार्ड रोझबरी सारख्या मुत्सद्यांनीं असें ह्मटलें आहे कीं राजकीय धोरणें आणि खर्चाचीं तोंडें या उभयतांचा परस्पर संबंध अगदीं निकट आहे. राजनीती खर्चाच्या रकमा पसंत करिते आणि खर्च करण्याच्या शक्ती- च्या मानानें राजनीतीही बदलत असते. रा- यल कमिशनला जर हिंदुस्थानच्या राज्यका- रभाराच्या खर्चाबद्दल विचार कर्तव्य आहे आणि त्याच्या आवश्यकते विषयीं किंवा अनावश्यकते विषयीं अभिप्राय सांगावयाचा आहे त्या अर्थी ही कामगिरी उत्तम बजाव- ण्यासाठीं कमिशनच्या सभासदांस हिंदुस्था- नच्या राजनीतीचें योग्य स्वरूप लक्ष्यांत घेतलें पाहिजे. राजनीती व खर्च या गोष्टी पर स्परांस नियामक आहेत. राजनीतीच्या प्रश्ना-

चा विचार कमिशनला करिता आला नाहीं तर रायल कमिशनचें काम विनाकारण खर्चीचें व निरुपयोगी होणार आहे हें उघड दिसेल. उदाहरणार्थ, हल्लींच्या राजनीतिचें मूळतत्व तर राज्यविस्तारप्रवर्तक आहे, आणि राज्यतृष्णेमुळें सरहद्दीचीं प्रकरणें उपस्थित होतात, ब्रह्मदेशांत लढाया होतात व प्रांतावर प्रांत काबीज केले जातात तर या गोष्टीसाठीं लष्करी खर्च वाढविला पाहिजे हें उघड आहे. लष्करी खर्चाच्या पायीं ह्मणजे राजनीतीच्या मूळतत्वासाठीं प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टी सरकार विसरलें, शाळा खात्याकडील खर्च कमी करून प्रजेला अज्ञानी व मूढ राहूं दिलें तर तें राजनीतीच्या दृष्टीनें बरोबरच आहे. खजिन्यांत तूट असली तरी चालेल, दुष्काळ फंड गिळंकृत केला तरी चालेल, प्रजेची अस्वस्थता व हाऊ अपेष्टा झालेली पुरेल पण राजनीतीच्या धोरणा प्रमाणें गोऱ्या अधिकाऱ्यांस काम्पेनसेशन पगारा शिवाय दिलेच पाहिजे, व्हालंटिअर पलटणीचे नानाविध नवे खर्च सोसलेच पाहिजेत आणि सार्वजनिक उपयुक्त, व आवश्यक कामें न करितां वरील खर्च भागविण्याची सोय केलीच पाहिजे. सारांश, बुडत्याचा पाय खोलांत असें ह्मणतात त्याप्रमाणें रायल कमिशन आह्मास पीडाकारक होईल असा रंग दिसतो.

---

# The Berar Samachar

**MONDAY JULY 6 1896**

Great and momentous issues hang on the final decision in regard to the cost of the Indian contingent for Suakin. The question is whether India should be charged for the expenses of the troops sent from Bombay to give a firmer footing to the English Government of Egypt and to quell the insurrections of the Devishes-Lord Hamilton wishes to burden the Indian treasury with the ordinary pay and allowance of the troops that have been sent to the Egyptian Government. The chances are that, in spite of an overwhelming opposition, the interests of India will be sacrificed for the spread of the British Empire over that fertile land of the Nile. The whole nation has expressed its firm, loyal and solid opinion in a direct and straightforward manner. If no weight be attached to such an influential sentiment of the people there are sure and certain signs of a growing discontent amongst the masses at large. The great writer of 'Indian affairs' in the London Times has ably argued the question in favour of India. Sir W. Hunter has left no stone unturned to satisfy the British people that the loan of the Indian troops for the purpose of promoting the foreign policy in Egypt tends in no way to secure the interest of India and that the cost of such an expedition should fall on proper shoulders viz either the Egyptian Government or the British Government. Sir A. C. Lyall has joined issue with Sir W. Hunter. The blow came from a quarter whence it was not expected. However his appeal fails to the ground when his theory of hiring out regiments to any employer is proved to be untenable If India be charged for the service of her troops in Egypt she might as well be charged for a loan of a Postal staff sent to work in Zanzibar or Uganda. The idea that India is hiring her regiments for foreign service vitiates the right view of the question. England sends out from year to year regiments to India and charges India even for the cost of their drilling, equipping and voyages to India. We hope that England does not accept the ignoble position of a mercenary nation. Here in the reconquest of an Egyptian province the large interests of the British empire are at stake. India forms but a portion of the Sovereign empire which utilizes her troops for the better Government of another component of the whole. The right sheep to be fleeced for the cost of such an expedition is either Egypt or the British nation. Besides the despatch of the Indian troops to Suakin required the sanction of the Parliament. This sanction not having been obtained, it is to be seen whether the Parliament will ratify the acts of the Secretary of State. The wonder is that even the public opinion in England goes against what the State Secretary has done or said in this connection. Mr. John Morley hits a home thrust to the Prime-minister when he reminds him to act up to what the has said in 1869 in such eloquent terms as the following:—"I do not like India to be worked upon as an English barrack in the oriental seas from which we may draw any number of troops without paying for them." Let us hope that better counsels will prevail and India will win victory for the grand principle involved in this question.

---

Mr. Bullock notes with pleasure the satisfactory state of the finances of the charitable dispensaries in Berar. He is rather more sarcastic upon this district and we would draw the attention of our readers to the following para:—

"The satisfactory feature of the repor is the financial statement and the large and increasing invested fund, which shows a rise of Rs. 5,000 this year. I think a little more might be expected from municipalities in Berar in aid of medical relief. Khamgaon apparently supports the dispensary of that town entirely, and it is a very good and well found dispensary, but otherwise little help is received from other Municipal Boards. The increase of interest on investments is most satisfactory, but the falling off in subscriptions in every district, except Wun, is a deplorable feature.

The Akola district, perhaps the richest district in Berar, shows very badly in not having subscribed a single rupee. It is not creditable to it that it should be the district in which medical relief is most accessible and attendance quite the largest, and yet that it should be conspicuous as the only district in Berar which has not subscribed voluntarily to the dispensary funds.

On the other hand, the Amraoti district is conspicuous for its liberality in this as in previous years, and the gentlemen who have subscribed liberally are rightly mentioned in the report."

With regard to private subscriptions Dr. Little notices a fall off and has rightly assigned its proper cause in the remarks we give below:—

"The falling off is ascribed by al Civil Surgeons to the introduction of the rules for the levy of fees for treatment and medicines. I do not, however, see why the introduction of the aforementioned rules should have any such marked effect on the benevolent. The payment of fees, it must be remembered, is for equivalent received by those who, if they do not, ought to be chary of being the recipients of charity, and I am disposed to think that if this view of the action of Government were brought to the knowledge of the wealthy, and that if the orders issued in Resident's Book Circular No. VI, Volume I, Chapter VIII-General, of the Code of Non—Judicial Book Circulars were also more widely made known to them by district officers, subscriptions would come in as hitherto."

---

## वऱ्हाड

हवामान— पाऊस अद्याप पुरेसा न पडल्यामुळें जनावरांस चाऱ्याची टंचाई आहे. पेरे झालेले व्यर्थ होतात कीं काय अशी ती वाटते. चालू पेरे बंद झाले आहेत. उष्मा विशेष होतो. पाऊस लवकर पडेल असा सुमार दिसत आहे.

कर्नल मेकेंझी साहेब निजाम सरकारचें चीफ सेक्रेटरी होणार असल्याविषयीं लोकवदंता आहे.

हल्लीं रुपयांस पाव आण्याच्या बट्यानें खुर्दा मिळतो. हा भाव फार जबर आहे तर सरकारांतून खुर्दा बरोबर सोळा आणे मिळेल अशी लवकर व्यवस्था होईल तर बरें. नाहीं तर रयतेचें मोठें नुकसान होईल.

मि० सिम्पसन साहेब डेपुटी कमिशनर हे एक वर्षाच्या आजारीपणाच्या फर्लो रजेवर लवकरच जाणार आहेत.

---

नोटीस.

फत्तेमहमद वल्लद हासीनमहमद आणि महमद रसूल वल्लद महमद शर्मा राहाणार हातरूण तालुके बाळापूर यांस. नोटीस देणार लालबी मर्द महमदशर्मी हल्लीं मुक्काम अकोला इजकडून देण्यांत येते कीं माझा नवरा मयत होण्यास अंदाज १४।१५ वर्षे जाहाली मयताची स्थावर जंगम जीनगी एकत्रपणातील आणि वडिलोपार्जीत तुह्मा उभयताच्या ताब्यांत असून महिन्यापूर्वीं पर्यंत मीही तुमच्यांतच राहिली होतीं. अलीकडे तुमचे माझे बनत नसल्यानें मी अकोले येथें राहाणेस आली. तेव्हांपासून तुह्मी माझे खाणे पिण्याची कांहीं खबर ठेविली नाहीं व माझे मेहेराबद्दलचा पैसा आणि जिनगीतील हिस्सा मागितला असतां देण्यास ना कबूल केले करितां कळविले जातें कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत मेहराची रकम आणि माझे हिशाची जिनगी देऊन माझी पावती घ्यावी. तसें न केल्यास रितीप्रमाणें तजवीज होईल कळावे तारीख ५ माहे जुलै सन १८९६ इसवी.

सही.
लालबी मर्द महमदशर्मी हल्लीं आकोले निशाणी खुद्द हातची बांगडी.

---

नोटीस

कमळजा मर्द विठूजी वाढी राहणार शहर एलिचपूर येथें नामदार गंजांत आत्माराम वाढी याचे घरीं आहे इस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझे व माझें लग्न होण्यास बहुत दिवस झालें लग्न झाल्यावर पांच सहा महिन्यापूर्वी माझे घरीं नांदत होतीस पुढें तूं माहेरीं जाते असें मजला सांगितल्यावरून तुजला माहेरीं रवाना केलें रवाना करते वेळीं तुझे अंगावर दागीने कड्या चांदीच्या दोन पायांतील वजन तोळे ३० किंमत ३० दंडवाळ्या चांदीच्या वजन तोळे २० किंमत रुपये २० सरी चांदीची वजन तोळे १० किंमत १० नथ सोन्याची वजन तोळा एक किंमत रुपये २९ येणेंप्रमाणें किंमत रुपये ८९चा माल तुझे अंगावर आहे मी दोन तीन वेळ तुजला नेण्याकरितां आलो परंतु तूं विनाकारण येत नाहींस. अन्नवस्त्रा करितां तूं लोकांचें कर्ज काढल्यास त्याचा जबाबदार मी होणार नाहीं कारण तूं आली असतां मी वागविण्यास तयार आहे जो माल तुझे अंगावर आहे तो, तुला येणें नसल्यास नोटीस पावल्य पासून पंधरा दिवसांचे आंत मजकडेस पाठवून द्यावा व माझा मुलगा तुजपाशीं आहे त्यासही पाठवून द्यावें. कळावें. तारीख ३ माहे जून सन १८९६ इसवी.

( सही ) विठुजी वल्लद पुंजाजी वाढी
राहणार सासन बु० प्रगणे
तालुके दर्यापूर याची वरील अक्षरें असत.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.
दि. क्रा. १९ मिसल नंबर ९

१८९६

विद्यमान सिवील ज्यडज साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव—जानाबाई
मर्द—रामजी उगले
राहणार—गाडेगांव तालुके अकोट
जिल्हा—अकोला यांस मयत

उदेभान बापाचे नांव हरी राहणार गाडेगांव तालुके अकोट जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां विसदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येते आहे कीं, त्यांनीं तारीख १७ माहे जुलई सन १८९६ इसवी रोजीं सहरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ३ माहे जुलै सन १८९६.

Sk. Ismail
सिव्हिल जड्ज्य.

---

## वर्तमानसार.

विलायतच्या महाराणीस राज्यारूढ झाल्यास येत्या वर्षी साठ वर्षें होत असल्यामुळें त्याबद्दल विलायतेस एक मोठा समारंभ व्हावयाचा असून त्याकरितां निझाम, गायकवाड, शिंदे, होळकर, पतियाळा, कपुरथळा, कुचबिहार वगैरे हिंदुस्थानांतल्या सर्व राजांस पाचारण करून विलायतेस नेणार आहेत असें सिमल्याची तार सांगत्ये.

हारन प्रांतांतील सिरियाच्या लोकांनीं केलेला दंगा वळावत चालला आहे आणि त्यांणीं टर्कीच्या कांहीं फौजेस वेढा घातला आहे.

ही पुढील गोष्ट एका जपानी पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. चिनाकेन येथील एका इसमानें जपानी आठ रुपये एका पासून कर्ज घेऊन त्यास आपली बायको गहाण ठेवून दिली. त्यानंतर नुकतीच यामागाटा केन येथील किकनो नांवाच्या माणसानें आपल्या बायकोस गाहाण टाकून एका पासून कर्ज काढलें. कर्ज परत देण्याची वेळ आली तेव्हां रिणकोच्या हातांत ऐवज नाहींसा झाला. अर्थात धनकोनें रिणकोच्या बायकोस आपल्या कबजांत घेऊन आपल्या घरीं चालविलें. रिणकोस फार दुःख झालें तेव्हां वाटेंत एका गृहस्थानें सावकाराची तोड करून निमे सूट घेऊन निमे रकम दिली व रिणकोची बायको रिणकोच्या स्वाधीन केली.

इजिप्तवर जाणाऱ्या हिंदुस्थानच्या फौजेच्या खर्चाचा यत्किंचित खर्चही हिंदुस्थानावर पडूं नये अशाबद्दल मुंबईच्या प्रेसिडेन्सी सभेनें जी स्टेट सेक्रेटरी यांस तार पाठविली होती ती पोंचल्याचें उत्तर आलें, पण तुमच्या ह्मणण्याचा विचार करूं असेंही त्या उत्तरांत नाहीं!

मुंबई हायकोर्टाचे जज्ज मि. बद्रुदीन तय्यबजी यांचे दुसरे चिरंजीव मि० हुसेन हे विलायतच्या केंब्रीज युनिवर्सिटींत नुकतेच बी. ए. व एल. एल. बी या परिक्षेंत सन्मानदायक पास झाले. मुसलमानांत तिकडे अशा रीतीनें पास झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

रसियांत कांहीं दांडगाई सुरू झाली आहे.

व्हेनिझुलाच्या लोकांनीं एका इंग्रज कामदारास कैद करून नेलें.

ट्युनीस प्रांत आज १४ वर्षें फ्रेंचाच्या ताब्यांत आहे तरी तेथें त्यांचा चांगलासा जम बसल्याचें दिसत नाहीं असें सांगतात.

मयत स्त्रीच्या बहिणीशीं लग्न करणें कायदेशीर आहे, असा इंग्रजांनीं एक कायदा करून त्याचें दुसरें वाचन झालें.

मशोनालांड येथील दंगा वाढत असून लढायाही चालू झाल्या.

जपानानें अमेरिकेंतल्या एका कारखानदाराम १०,००० टण रेलवेचे रूळ पाठवून देण्यास लिहिलें असून दुसऱ्या एका कारखानदारा पासून तारायंत्राची तार १,००,००० पौंड मागितली आहे. मोठ्या लढाईची तयारी दिसते.

इंग्लंडापेक्षां ऐर्लंडावर कराचा बोजा फार जास्त आहे असें नेमलेल्या कमिशनचें ह्मणणें आहे. उत्पन्न व कर यांची तुलना केल्यास हिंदुस्थानावर तर फारच भारी कर आहे असें होतें.

कलकत्ता येथील रेल्वे स्टेशनांतील रेलवेची ६,००० टिकिटें चोरीस गेली व ती चालवून पैसे घेण्याबद्दल एका मुसलमानास एका वर्षाची कैद झाली.

वायव्य प्रांतांतले लोक आतां शेतकीच्या मागें लागले त्यामुळें दुष्काळ कामावरचीं माणसें निमे कमी झालीं, तरी अजून १,४४,००० आहेतच.

काशिप बाजारची प्रसिद्ध महाराणी सरणोमाई इणें बऱ्हाणपूर येथें पाणी बांधून आणण्याच्या कामाकरतां ८',००० रुपये दिले व आणखी लागल्यास देण्याचें कबूल केलें आहे.

टर्कीच्या ताब्यांत डुसेस ह्मणून एक ठिकाण आहे. तेथील प्रजेनें बंडावा करून टर्की सरकारच्या फौजेशीं सामना केला व चार कंपन्याचा मोड करून कांहीं तोफाही आपल्या ताब्यांत घेतल्या— त्यावरून टर्की-सरकारानें सालेनिका येथील आपल्या फौजेस त्या ठिकाणीं धाडलें आहे.

मशोनालांड येथील प्रजेचा दंगा वाढत आहे. व तेथें असणाऱ्या गोऱ्या लोकांची कत्तल करीत आहेत या करितां वेगळाल्या ठिकाणची इंग्रजी फौज त्या कामावर जात आहे.

मादागास्कर प्रांत खालसा करण्याच फ्रेंच पार्लमेंटचा ठराव झाला.

आमच्यावर हत्यारें उचलणाऱ्या दुसऱ्या अमुक अमुक लोकांवर खटले करा असें बोयर सरकारच्या अधिकाऱ्यांनें विलायत सरकारास लिहिलें आहे. अ.

आसामकडे अद्याप मुळींच पाऊस नसून गरमी विशेष पडत असल्यानें लोकांचे फार हाल होत आहेत. पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळें तेथील चहाच्या व बागाईकाच्या उत्पन्नास नुकसान पोंचत चाललें आहे.

कलकत्ता व बासीरहट यांचे दरम्यान ट्राम्वे बांधण्याकरितां २४ परगण्यांच्या जिल्हा बोर्डानें मंजुरी दिली असून, नकाशा वगैरे तयार झाला आहे.

दिल्ली, अंबाला, कालका रेलवे कंपनीच्या डायरेक्टरांनीं गेल्या दिसेंबर अखेर अर्ध्या वर्षाबद्दल भागीदारास शेंकडा १ पौंड तेरा शिलिंग वाटण्याचा ठराव केला. या सहा माहींत या कंपनीस गेल्या सहामाही पेक्षां ४२,३४४चें जास्त उत्पन्न झालें होतें. स. वि.

इंग्लंडांत दररोज सुमारें १९३८२७० तारेच्या बातम्या वर्तमानपत्रां करितां पाठविल्या जातात.

चिनांत लष्करी कालेज—चीनचे मुख्य प्रधान ली हंग चंग हे जर्मनींत गेले आहेत तेथें जर्मन बादशहाकडून त्यांचा यथायोग्य मानसन्मान राखिला गेला. बादशहांचीं आणि त्यांचीं कित्येक खलबतें झालीं. जर्मनीच्या नमुन्यावर चिनांत लष्करी कालेज स्थापण्यासाठीं ली हंग चंग ह्यानीं दोन लष्करी कामगार मागून घेतले आहेत.

भूकंपानें मनुष्य संहार—गेल्या आठवड्यांत जपान देशाच्या इशान्य भागीं मोठा धरणीकंप होऊन समुद्र खवळला आणि तो जमिनीवर आल्यामुळें ११००० मनुष्यांचे बळी पडले आणि कित्येक शहरें समुद्रार्पण झाला असें तारेवरून समजतें.

आजपर्यंत मुंबईच्या बंदरांत युरोपांतील देशांत जाण्याकरितां युरोपियन आगबोटीच असत आणि त्यांचीं भाडीं फार पडत असत पण आतां जपान देशच्या आगबोटी इकडील लोकांस नेण्या आणण्या करितां फिरूं लागल्या आहेत, व त्यांचें भाडेंही फार कमी असतें. असें सांगतात कीं विलायतेस जाण्यास पी. आणि ओ. कंपनीच्या आगबोटीवर फर्स्ट क्लासचें भाडें ८०० रुपये पडतें, आणि जपानी आगबोटीवर तेंच भाडें ३१० रुपयांच्या आंत पडतें. सेकंड क्लासचें भाडें तर या पक्षांही निमे दरानें कमी पडेल. सारांश जपानी लोक सर्व कामांत युरोपियन लोकांशीं अगदीं बरोबरी करूं लागले आहेत.

यंदा अमेरिकेंतील कापसाचें पीक शेंकडा ९७ या प्रमाणांत आहे. गेल्या १९ वर्षांत असें पीक तिकडे कधींही आलें नव्हतें असें ह्मणतात. शु. सू.

उद्योगाची आतां कमाल झाली. इकडे शेळ्या मेंढ्यांचीं कातडीं खरेदी करणारे लोक आले असून दरमहा १०००० पर्यंत तीं कातडीं मद्रासकडे नेतात. तेथें तीं कमाऊन पुढें विलायतेकडे रवाना होतात तेथें रसायन चांभार त्या कातड्यास कमाऊन रेशमाच्या योग्यतेस आणून त्याचे हातमोजे वगैरे निरनिराळे ६०० प्रकार होतात व तो माल अनेक देशांत रवाना करून हजारो रुपयाचा फायदा करून घेतात. हिंदुस्थान ही एक इंग्लंडांस कामधेनू मिळाली खरी, इकडे युनिव्हर्सिटीमध्यें हाजारो डिग्रीवाले रसायन शास्त्रज्ञ परीक्षेंत पास झाले असून नोकरीकरितां प्राण देत बसतात. पण संपन्न कां होत नाहींत. यावरून आमच्या वाट्यास येणारी विद्या केवळ दर्शनी असून ती नुस्ती विजार पाटलून घालून इंग्लिश तऱ्हेची ऐट करण्या पुर्ती आहे असें ह्मणण्यांत चूक होणार नाहीं.

यंदा कलकत्यांत भरणाऱ्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष स्थान मिस्तर केन साहेबांस देण्याची सूचना सर्वानुमतें पसंत ठरली.

अफूचा उपयोग बेळगांव, धारवाड, विजापूर व रत्नागिरी या जिल्ह्यांत फारच थोडा होतो ह्मणूनच तेथील लोक उद्योगी व सधन आहेत.

कोरियाचा राजा सर्वोपरी रशियन सरकारच्या ताब्यांत गेला.

इजिप्त कामगिरीवर धाडलेली फौज सध्यां स्वस्थ असून अक्टोबर मध्यें झुंज लागणार ह्मणतात. आणखी १० हजार फौज तिकडे त्या सुमारास जाणार.

काबूलच्या अमिरानें दारू गोळा करण्याचा कारखाना आपल्या हद्दींत उघडला असून आतां काडतुसें व बंदुका उत्तम होऊं लागल्या. केव्हां तरी मुसलमान भाई विजारीचा नाडा सैल करून इंग्रजास अंगठा दाखवितील.

विलायतेकडे विजेच्या शक्तीनें कापड विणण्याचा कारखाना सुरू झाला असून नित्य ३०० मनुष्याचे डगले व विजारीस पुरें इतकें कापड निघूं शकेत. बुद्धिमातेनें सध्यां इंग्लंडाला वर दिला आहे. म. मि.

चंद्र—चंद्रामध्यें पाणी अथवा वायु ह्यापैकीं कांहीं नाहीं, असा शोधकांनीं शोध लावला आहे.

इजिप्त प्रकरणांत रशिया व फ्रान्स हे जोराची खटपट करणार अशी जी बातमी आली आहे ती खरी आहे.

तांबडाबर्फ—आल्प्स व राकी ह्या दोन पर्वतावर तांबडा बर्फ सांपडतो. सदर पर्वतांवर बर्फांत उत्पन्न होणाऱ्या कांहीं वनस्पती आहेत त्या वनस्पतीचा रंग तांबडा असून तो त्या बर्फामध्यें उतरतो व त्यामुळें तो बर्फ तांबडा दिसतो.

ट्रान्सवाल येथील एका सोन्या या खाणींत २४ वानर कामास लावले आहेत

कपडा शिवण्यापूर्वी कापड कापण्याचें यंत्र कोणी तयार केल्याचें " इलिक्ट्रीसिटी, पत्रावरून समजतें. तें यंत्र १४ इंच असून चाकूचा व्यास ४ इंच आहे. तो मोडूं नये ह्मणून त्यावर आच्छादन असून त्याला धार देण्याचेंही साधन त्यांतल्या त्यांतच आहे. यंत्रांचा तळ पितळेचा आहे. २००।२५० कपडे तयार करण्या इतकें कापड एका दिवसांत कापलें जातें. यंत्राचें वजन हलकें असून हात दांड्यानें चालवितां येतें. न्या० सु०

दिवसा मशाल— मेरठ येथील डेपुटी कलेक्टर बाबू दिलाराम यांच्या कचेरामध्यें एक जमीदार दिवसा १० वाजतां मशालीच्या उजेडानें आला. ही गोष्ट दृष्टीस पडतांच त्याला पागल ह्मणून कचेरींतून काढून दिलें.

कडक शिक्षा— मुरादाबाद येथील एका डेपुटी कलेक्टराच्या नौकरानें आपल्या मालकाशीं एका पैशाची दगलबाजी केली होती त्याकरितां त्या डे० कलेक्टरानें त्यावर मोकदमा चालवून त्यास दोन महिन्याच्या सक्त मजुरीची शिक्षा दिली.

पोलिसास शिक्षा— आग्रा येथें एका लग्न समारंभांत दोन पोलीस शिपाई जबर दस्तीनें मिठाई घेऊं इच्छित होते, ही गोष्ट त्यांचे आफिसरांस कळतांच त्या दोघास ही नौकरीवरून बडतर्फ केलें.


## जाहिरात

सर्वत्र लोकांस गुनाबाई मर्द सखाराम रावणकारीण राहणार खामगांव ही असें जाहीर करते कीं बुजाबाई मर्द खुशाल रावणकारीण राहाणार शिराळे तालुके चिखली जिल्हा बुलडाणा. इजला कोणीही आमच्या संमती शिवाय आमची स्थावर जंगम वगैरे इस्टेट घेऊन अगर अंगावर कर्ज देऊं नये. कोणी गाहाण खरीदी वगैरे घेऊं नये. घेतल्यास आह्मी अगर आमची कोणत्याही प्रकारची इस्टेट जबाबदार नाहीं. ज्याचा तो आहे. हे सर्वत्रास जाहीर केलें आहे. ह्मणून जाहिरात दिली. कळावें ता० ३०।६।९६ इ०

सही

सहीची निशाणी बांगडी गुनाबाई मर्द सखाराम रावणकारीण इच्या हातची असें. दस्तुर भाऊराव वा रावजी गुमास्ते खामगांव.


हे पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास .................. ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ०। ०६
दुसरे खेपेस ........ ०।

Annual in arrears 7 „ 1 8
Six monthly ........ 3 ........
Single copy ........ ........

Advertisement
Below 10 lines ... 2
Per line over 10 ... 4
Repetition Per line ... 3

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY JULY 13 1896 — No.

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख १३ माहे जुलै सन १८९६ इ० — अंक

## घड्याळ

किंमत ६ रुपये हमी ३

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटो प्रमाणें वॉच घ्या. ८०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्वित्झरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे फिरविण्यास ठेच असून सेकंडकाटा आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस जुवल [ ह्मणजे चक्र चे खालीं वर हिरे ] बसविले आहेत. ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।१' वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. ने० घड्याळ पाठवूं.

टीप:- "गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल."

गोविंद महादेव पाळ.
९२-२४ वाचमेकर आणि रिपेरर नासिक.

## जाहिरात

( उपयुक्त कंपनी )

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं, वाशिमाहून आकोल्यास व इंगोलीहून आकोल्यास जाणें असल्यास लोकांस फार गैरसोय आहे व वक्तशीर जाणें येणें होत नाहीं. याजकरितां ही अडचण दूर व्हावी ह्मणून आह्मी कंपनी मार्फत चांगली व खात्री लायक व्यवस्था करणार आहो. कंपनीचें भांडवल एकंदर १०००० रुपये करून एकंदर २०० शेर काढले आहेत व ही कंपनी पुढें रजिष्टरही केली जाईल. याजकरितां या कंपनीचे शेर घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांणीं तारीख ८ सप्टेंबर १८९६ चे आंत लागतील तितके शेर घ्यावेत. निमे शेर भरल गेले आहेत तेव्हां त्वरा करावी. प्रत्येक शेर ५० रुपयांचा काढला असून एकंदर घेतलेले शेरचे रुपये तारीख ८ अक्टोम्बर सन १८९६ चे आंत कंपनीचे डायरेक्टर यांचे कडेस पाठवावेत.

शेर घेणारास या शिवाय ज्यास्त कांहीं माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं डायरेक्टर यांस विचारल्यास दिली जाईल. जबाबा करितां अर्धा आण्याचें तिकीट न पाठविल्यास जबाब नाटपेड पत्रानें दिला जाईल कळावें.

सह्या.

यशवंतराव वामन दिवे वकील राहणार वाशीम. } डायरेक्टर
शेषराव रघुनाथ वकील.

मेंबरस.

राजे काशीराव शंकरराव देशमुख
त्रिंबकराव विठ्ठलराव देशमुख प्रगणें वाशीम.
बालकिसन जियालाल ज्यागीरदार.
बाळकृष्ण रामजी

सेक्रेटरी.
हबिबुल्ला गुलामहुसेन

## जाहिरात

दवाखाना स्वदेशी.

!! थोडें लक्ष देऊन वाचा व अनुभव घ्या !!

थोड्या किमतींत हटकून गुण

येथे प्रवाळ, सुवर्ण रौप्य, लोह, ताम्र, अभ्रक, वंग वगैरे सर्व प्रकारचीं शास्त्रोक्त रीतीनें तयार केलेलीं शुद्ध भस्में; सूवर्ण मालिनी वसंत, हेमगर्भ, लक्ष्मीविलास, इत्यादि सर्व मात्रा; गुलवेलीचें सत्व, आसव, हीम, कल्क, लेप, चूर्णे चातुर्थिक तिजारे, दुजोर व दररोज येणाऱ्या हिंवावरील बाटल्या व गोळ्या, तशाच गजकर्णावरील बाटल्या व डब्या; परमा, प्रदर, बाळंत रोग, आणि सर्व प्रकारच्या रोगावरील रामबाण औषधें प्रसूती व सटवीचीं यंत्रें, बदाम पाक व इतर पाक सर्व पाक, सौभाग्य सुंठ इत्यादि सर्व अति स्वस्त दरानें हव्या त्या वेळेस विक्रीस तयार आहेत रोगाची परीक्षा प्रथम करून नंतर औषधें देण्यांत येतील. सर्व रोगांवरील औषधें शुद्ध वनस्पतीचीं केलेलीं आहेत परगांवीं औषधें व्ही. पी. नें पोष्ट माफत रवाना केलीं जातात.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना आकोला. शहरांत वऱ्हाड. १८९१

## आचार्य परिषद्

एलिचपूर ता. १-७-९६

ठराव १५— शिक्षणाचा सगळा भर बुद्धिवर्धनाकडेच असू नये. बुद्धि पंगु आहे बुद्धि शरीर आहे, बुद्धि यंत्र आहे. तिला पाय, तिच्यांत जीव आणि तींत बाफ असल्यावांचून तिच्यानें कार्यें उठावयाचीं नाहींत. ती मार्गदर्शक आहे मार्ग चालून जाणारी मनोवृत्ति आहे. तेव्हां उत्तम निवडक मनोवृत्तींचा पूर्ण विकास केला पाहिजे. स्वाराच्या तंत्रानें, पण स्वाराला बरोबर घेऊन, घोडा जसा भरधांव निघतो त्याप्रमाणें विवेकाच्या तंत्रानें पण विवेकाला बरोबर घेऊन मनोवृत्ति धांवूं लागल्या पाहिजेत. प्रेम, दया, शौर्य, अभिमान, ईर्षा, हौस, सत्य प्रीति, स्वातंत्र्यप्रीति इत्यादि मनोवृत्तींचा भरपूर विकास होऊन मनोभूमींत त्या उचंबळूं लागल्या पाहिजेत. मोठा उल्हास, मोठा आवेश, मोठा वेग, मोठी ईर्षा यांनीं अंतःकरण तुडुंब भरलें पाहिजे. ह्मणजे पहा काय काय चमत्कार होऊं लागतात ते! तुह्मी अगदीं निर्जीव, निरुत्साह, निःसत्व, निस्तेज निर्माल्यवत् बनून गेला आहांत. जगण्याची हौस नाहीं, स्वातंत्र्याचा चाड नाहीं, संसाराची आस्था नाहीं, स्वतः विषयीं आणि स्वराज्याविषयीं अभिमान नाहीं शरीरांत जसें रक्त आणि उष्णता तद्वत अंतःकरणांत वृत्ति होय वृत्तीमुळेंच विवेकाचा जोम आहे. वृत्तीमुळेंच विवेकाचा पराक्रम आहे, वृत्तीमुळेंच विवेकाची कृतार्थताही आहे बुद्धीच्या साह्यानें सत्याचें ज्ञान होणें ही महत्वाची गोष्ट होय. परंतु त्या ज्ञानसत्यालां उत्कंठेनें अनुसरून चालण्याची इच्छा किंबहुना त्याहून ही महत्वाची गोष्ट होय. हल्लींच तुह्मामध्यें केवढा विरोध आहे पहा. तुमचा विवेक तुह्माला जें बोधितो तें आचरणांत आणण्यापूरतें वृत्तिबळ किती थोड्याचे अंगीं दिसून येतें? तुह्माला वेगवान जोरदार मनोवृत्ति पाहिजेत. त्यांच्या साह्यानें अद्यापि तुह्मास पुष्कळ कार्यभाग उरकून घ्यावयाचा आहे. या करितां नानाप्रकारच्या उत्सवांनीं विशेष तऱ्हेच्या शिक्षणानें तुमच्यांतील जीव, उल्हास व हौस वाढली पाहिजे. कामापुरती बुद्धि तुह्मापाशीं आहे; पण चैतन्य-पतीवाचून ती बिचारी विधवा काय करील? तुमच्या सर्व शरीरांत न मावेल इतकें चैतन्य स्फुरण झालें पाहिजे आणि बुद्धीच्या व चैतन्याच्या संयोगापासून तात्काल उपयोगी पडतील अशा कृती निष्पन्न होऊं लागल्या पाहिजेत. तुह्मी पाहिल्या प्रतीचे व्यावहारिक बनलें पाहिजे, जग जसें असेल तसें घेऊन चाललें पाहिजे व उद्यांचे साधण्याच्या आशेनें कल्पनेच्या चक्रव्यानें नादीं लागून आजचे हातून न निसटूं दिलें पाहिजे.

१६—नीति आणि अनीति हा सापेक्ष आहे. स्थितिपरत्वें त्यांत प पाडणें जरूर आहे. अन्यकाळीं अ नीति असेल परंतु युद्धकाळीं हिंसा ह नीति होय सख आणि सत्ता या इष्ट होत. त्या ज्या प्रकारच्या आचरणानें प्रा होतील आणि राहतील ती नीति व ब कीची सारी अनीति. नीतिनियम साध रूप होत. ते माणसाच्या हिताकरितां आहेत; माणूस नीती करितां उत्पन्न झ नाहीं किंवा नीतीसाठीं तो जगतही नु तेव्हां सत्ता आणि सुख प्राप्त होण्याल ज्या काळीं ज्या प्रकारचें वर्तन ठेवणें भाग असेल त्या प्रकारचें त्या काळीं वर्तन कर इष्ट वस्तु नेहमीं साध्य करून घेत जा प्राप्त्यापेक्षां प्रापक नियमांचें महत्व बा विणें ह्मणजे चाकराचे चाकरीस धन्य ठव यासारखें किंवा जीव देऊन शरी ण्यासारखें वेडेपणाचें होय. अविचारी विक माणसांनीं मुख्य गोष्टीकडे दुर्लक्ष के रून नियमांचें महत्व वाढविलें आणि शेवटी फसले. 'दुसऱ्यांनें भलेपणानें आपणाशीं वागावें ह्मणून तुह्मीही त्याशीं भलेपणानेंच वागावें' हें खरें; पण दुसऱ्यानें भलेपणानें वागावें असें तुह्माला वाटलें ह्मणून अद तुह्मी त्याच्याशीं भलेपणानें वागला ह तो तुह्माशीं भलेपणानें वागेल असा नि नाहीं; अशा वेळीं तुमच्या भलेपणाचा दुरुपयोग होऊन कांहीं त्यापासून तुम नुकसानही होईल. तांबड्या इंडियनांनीं कोलंबसाचा देवदूता प्रमाणें सत्कार केला व कोलंबसानें त्यांचा निःपात करून उपकार फेडला! तेव्हां ज्या पासून स्वतःचें नुकसान होइल ती अनीति; सर्व प्रकारचें स्वार्थ ज्यापासून साधेल ती नीति; हें तत्व गाफलपणानें पुन्हा कधीं विसरूं नका.

ठराव १७ मताचें आणि क्रियेचें स्वातंत्र्य प्रत्येकास आहे व दुसऱ्याला न होईल अशा रीतीनें त्याचा प्रत्येकानें स्वहितावर दृष्टी देऊन उपयोग करावा. [illegible] च्या अनुकूल मताबद्दल दुसऱ्यास सं[illegible]ल्यास चालेल; परंतु एकाच्या आपरुद्ध मताबद्दल दुसऱ्यानें व्यर्थ त्रास मानून घेऊं नये. मतांत भेद आला ह्मणून वैरास्तव अथवा तिरस्कारास जागा झाली असें द्रव्या[illegible] ळींच होत नाहीं हें स्वातंत्र्यच तुह्मी निषेदां घ्या व दुसऱ्यांनाही तसेंच घेऊं द्या. जगीद्धि, आणि जगूं द्या. मतवैचित्र्यच इष्ट आहे. मनःबुद्धीच्या सजीवपणाचें चिन्ह आहे व प्रगतीचें चालक तत्व आहे जगाचा फायदा स्वतंत्र विचारानें करून दिला आहे यास डोळे मिटून रुढीला चिकटून राहिल्यापासून जातीची दुर्दशा झाली आहे फेरफार उन्नतीचें बीज आहे आणि उत्क्रांतीचें चैतन्य आहे. तें गेलें ह्मणजे तुमची राहून शोभा नाहीं.

ठराव ८— सर्व कामाला नेहमीं स्वतः पासन आरंभ करा स्वतःशीं इमानानें वागा. आपल्या समजुतीपासून ज्ञानाला आरंभ करावा; आपल्या शक्तीपासून पराक्रमास आरंभ करावा; आपल्या आवडीपासून न्यायत्वाला आरंभ करावा; आपली स्थिति पाहून परोपकाराला आरंभ करावा; आपलें मत पाहून वागणुकीला आरंभ करावा. यनेण्तात्पर्य, आपल्या सर्व उद्योगाचा स्वतःपासून आरंभ करीत जावा. बृहस्पतीनें केलेला बोध तुमच्या समजुतीच्या पलीकडे असल तर तो बाजूस ठेवा; परशुरामाचा पराक्रम तुम्हा या सामर्थ्या बाहेर असेल तर त्याची इच्छा करूं नका; तुह्मी दरिद्री असाल तर दुसऱ्यावर उपकार करून स्वतःला भिकेस लावून घेऊं नका, तुमच्या मनोवृत्तीचें ज्यांत रंजन होत नसेल त्यांत जुलमानें सुख मानून घेऊं नका; स्वार्थ प्रिय वाटतो तोंवर पोकळ परमार्थाच्या भरीं भरूं नका. स्वतः आहात त्यापेक्षां अधिक होऊं नका व कमीही राहूं नका जें समजतें तेवढेंच समजतें असें समजावें व समजुतीच्या मानानें कशालाही न जुमानता निर्भयपणें कृति करीत जावी. दंभ नको, ढोंग नको, कृत्रिम नको जसे असाल तसे दिसा व सतत पुढें सरण्याचा व सुधरण्याचा यत्न असूं द्या. राज्यप्रकरणीं जेथें कपट पाहिजे असल तेथें जसें दिसणें प्रसंगास अनुरूप असेल तशीं सोंगें आणित जावीं वहित स धक कृति करीत जावी. परंतु नेहमीं आपल्या समजुती पेक्षां अधिक शहाणें होऊं नका, आपल्या शक्ती पेक्षां अधिक पराक्रमाचा ढौल घालूं नका व आप या आवडीला ओलांडून सुख शोधूं नका. अनुपाठरण करणें तें स्वतःच्या समजुती प्रमाणें ज्यांवर विश्वास बसत असेल, ज्याची भाषा तुह्मास कळत असेल व ज्याचे विचार तुह्मास उमजत असतील व हितकर वाटत असतील त्याचेंच करावें; दुसरा शहाणपणा विषयीं बृहस्पतीचा दाखला घेऊन जरी तुह्मापुढें येईल तरी, त्याचें सांगणें तुह्मास रुचत नसल्यास व तुमच्या समजुतीच्या आटोक्याबाहेर असल्यास, तुह्मी त्याचा जरूर निषेध करावा जेवढें तुह्मास साध्य असेल तेवढें करा ह्मणजे स्वतःच्या व समाजाच्या ऋणांतून मोकळे झालांत. दिलेल्या गुणापेक्षां अधिक गुण व दिलेल्या सामर्थ्यापेक्षां अधिक सामर्थ्य तुह्मी दाखविलें नाहीं ह्मणून परमेश्वर तुह्मावर रागावणार नाहीं; परंत दिलेल्या गुणांचा आणि सामर्थ्याचा नीट आणि पूर्ण उपयोग तुह्मी केला नाहीं तर मात्र, तुह्मी आपले नाणे फुकट दवडल्या बद्दल तुमचा धनी तुह्मावर रुसेल.

त्रैमूर्ति.

[ पुढें चालूं. ]

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ३ शके १८१८

# सत्कार्याला लोकाश्रय

'डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी' नांवाचा एक नोंदलेली मंडळी मराठी भाषेची सेवा करण्या करितां स्थापन होऊन आज दोन वर्षें होत आलीं. या सभेचा दुसरा वार्षिक रिपोर्ट आम्हाकडे आला आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. महाराष्ट्र भाषेस हरतऱ्हेनें उत्तेजन द्यावें हा या मंडळीचा उद्देश आहे महाराष्ट्रा मधील निवडक निवडक विद्वद्रत्नें एकत्र केलीं तर तीं या मंडळीच्या मुख्य चालकांच्या नामावळींत आढळतील अशी ही अमोल व अनुपम मंडळी आहे. महाराष्ट्र भाषेची अभिवृद्धी अशा मंडळीच्या हातून कितपत होईल किंवा कशी होईल या विषयीं शंका या मंडळीच्या पुरस्कर्त्यांच्या नाममहिम्या वरूनच दूर होईल हें निर्विवाद होय.

एखाद्या प्रच्छाय व फलपुष्पधारी वृक्षाचें कलम नव्यानें लावावें त्याप्रमाणें या संस्थेनें महाराष्ट्र भाषावृक्षाचें नवीन कलम लाविलें आहे; अथवा एखाद्या नवीन भव्य व रमणीय. वाड्याचा भक्कम पाया घालावा त्याप्रमाणें या मंडळीनें महाराष्ट्र भाषामंदिराची प्रारंभशिला नव्या रचनेनें बसविली आहे भविष्यकालीन कार्यमालेच्या स्वरूपा वरूनच अशा संस्थेची खरी योग्यता समजून घेतली पाहिजे. गेल्या दोन वर्षांत य मंडळीच्या हातून जीं जीं कामें झालीं आहेत त्यांचें सिंहावलोकन केलें ह्मणजे या मंडळीच्या अंगीं मोठी विलक्षण कार्यशक्ति असें आपोआप लक्ष्यांत येईल. आह्मी आमच्या वाचकांच्या साठीं १८९५।९६ सालच्या रिपोर्टांतील मुख्य मुख्य माहिती खालीं संक्षेपानें देत आहो.

पुण्यास जी प्रसिद्ध दक्षिणा प्राईझ कमिटी होती तिचें काम मुंबईच्या डायरेक्टर साहेबानीं याच सोसायटीकडे दिलें आहे. पूर्वीं पेशव्यांच्या वेळीं वेदाध्ययना निमित्त दक्षिणा वाटली जात असे त्या दक्षिणेच्या फंडा पैकीं कांहीं रक्कम ब्रिटिश सरकारानें अद्यापि विद्याजिनाकडे चालू ठेविली आहे; आणि त्याच रकमे पैकीं कांहीं रक्कम ग्रंथकर्तृत्वाला उत्तेजन मिळावें ह्मणून सरकारनें एक कमिटी नेमून तिच्या हस्तें मराठींतील उत्तम ग्रंथरचनेला बक्षीस देण्याची व्यवस्था चालू केली मुंबई इलाख्याचे डायरेक्टर यांनीं हो ना करितां करितां अखेर वरील दक्षिणा फंडाची वार्षिक रक्कम या मंडळीला देण्याचें कबूल केलें आणि दक्षिणा प्राईझ कमिटीचें काम याच मंडळीकडे सोंपविलें. ही गोष्ट गुदस्ता याच सुमाराला घडली. या नवीन व्यवस्थेमुळें १०१ पुस्तकें परीक्षणासाठीं या मंडळीकडे आलीं. एक परीक्षकांची कमिटी नेमण्यांत आल्यावर त्या कमिटीनें २६ पुस्तकें बक्षीसाला योग्य अशीं ठरविलीं, आणि ज्या ज्या त्या त्या चांगुलपणा प्रमाणें प्रत्येकी २० रुपया पासून २०० रुपया पर्यंत बक्षीसें देण्याचें ठरविलें ही बक्षिसाची रक्कम १००० रुपये झाली. अद्याप ४२ पुस्तकांचा निकाल लागावयाचा आहे. बक्षीसाला लायक ठरलेल्या पुस्तकांची नांवें येणें प्रमाणें आहेतः—कृतांत कैतव, सुरतरंगिणी, शोकावर्त, हिंदुस्थानांतील सर्प भाग, संगीत देवयानीपाणिग्रहण नाटक, शिवछत्रपतीचें चरित्र, जयाजीराव नाटक, श्री शिवकाव्य, संगीत भाग १, सदर भाग २, सदर भाग ३, गर्भिणी स्त्रियांचे आरोग्यरक्षण, वृत्तमणिमाला, बाजीपरभू, सद्यस्थियादर्श नाटक, शोच्य मृत्युलोकवास, तुफान, स्वदेशस्थिति, आथेन्स येथील टायमन नांवाचा उमराव, बेंजामिन फ्रांकलिनचें चरित्र, महाराष्ट्रांतील किल्ले, सुभेदार थोरले मल्हारराव होळकर यांचें चरित्र, नशीब आणि उद्योग, देवमामलदार, संसारसुख, नीतिमीमांसा.

एकंदरीनें दक्षिणा प्राईझ कमिटीचें काम या मंडळीकडे आल्यामुळें पूर्वीची शिथीलता, आळस व मंदपणा नाहींसा होऊन ग्रंथपरिक्षणाचें काम उत्तम प्रकारें सुयंत्र, सुरळीत व सत्वर होत जाईल अशी आशा उत्पन्न झाली आहे

या संस्थेनें कांहीं आश्रय द्यावा ह्मणून १०० पुस्तकें ग्रंथकर्त्यांकडून धाडण्यांत आलीं होतीं पण त्यापैकीं दोन पुस्तकास आश्रय मिळाला. मंडळी जवळ पैसा बेताबाताचा आहे ह्मणून ग्रंथरचनेस मोठ्या कसोशीनें व काटकसरीनें बक्षीसें देण्याचा या मंडळीनें विचार केला आहे. निरनिराळ्या बहुविध उद्योगधंद्याचीं थोर माणसें पुस्तकांच्या परीक्षकांत आहेत तथापि त्यांच्या फुरसतीच्या व तत्परतेच्या मानानें पुस्तक परीक्षण चालूं आहे. हल्लीं ज्या क्रमानें पुस्तकें तपासण्याचें काम चालूं आहे त्या मानानें शिलकी पुस्तकांचा निकाल लागण्यास आणखी दोन वर्षें लागतील असा सभेचे चिटणीस रा. ब. विष्णु बाळकृष्ण सोहनी यांनीं अदमास केला आहे. सध्यां पुस्तकें तपासणारी मंडळी नेमण्यांत आली आहे तिच्यामध्यें बहुत करून सर्वच पुण्या मुंबईचे लोक घातले आहेत. आमच्यामतें बाह्य प्रांतीय विद्वान गृहस्थांची भरती या परीक्षक मंडळींत केली तर हल्लीच्या पेक्षां पुस्तक परीक्षणाचें काम चांगलें झपाट्यानें चालेल इतकेंच नाहीं तर बाह्य प्रांतांतील गृहस्थांचा जो इतका न कळत अनादर होत आहे तो दूर होईल. उदाहरणार्थ, आमच्या वऱ्हाड प्रांतांतील विद्वन्मणी रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. हे या मंडळीमध्यें अवश्य असलेच पाहिजेत. निरनिराळ्या प्रांतांचें लक्ष्य या संस्थेच्या कार्याकडे लागण्यास ही हा एक सोपा उपाय आहे असें आह्मास वाटतें. नागपूराकडील कांहीं निवडक गृहस्थ पुस्तक परीक्षणकमिटीमध्यें समाविष्ट नाहींत ही आह्मी कमिटीच्या रचनेंत मोठी उणीव समजतों ही गोष्ट इतर मराठी भाषा बोलणाऱ्या प्रांतासही सारखीच लागू आहे.

'डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी' या नांवावरून मंडळीच्या कार्यव्यापतेचा जितका बोध होतो त्यापेक्षां या मंडळीनें पुष्कळ नवीन कामें आपल्या हातीं घेतलीं आहेत. भाषांतराच्या रूपानें जितके चांगले ग्रंथ निमाण होतील तितके या मंडळीस पाहिजेच आहेत पण या शिवाय स्वतंत्र रितीनें ग्रंथ तयार करण्याकडे ही या मंडळीनें लक्ष्य पुरविण्याचा संकेत केला आहे. स्कोटोवेकृत पार्लमेंटचा संक्षिप्त इतिहास हल्लीं एका विद्वान गृहस्था कडून लिहविण्यांत येत आहे. तसेंच मेनकृत पाप्युलर गव्हरनमेंट आणि म्यालेसनकृत अकबर त्या दोन ग्रंथांचीं भाषांतरें मोठ्या चढाओढीनें अनुक्रमें ११ व १६ विद्वानांच्या हांतून चालूं आहेत ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. या भाषान्तरासाठीं ८५० रुपये खर्च करण्याचा या मंडळीचा विचार आहे.

या संस्थेकडे एक नवें अत्यंत उपयोगीं काम मुंबई सरकारनें सोंपविलें आहे पुणें येथील पेशवे सरकारचें दप्तर संपूर्ण तपासून त्याचें इंग्रजीत भाषांतर करण्याचें महत्कार्य या मंडळीनें स्विकारलें आहे. पूर्वीं नामदार न्यायमूर्ति रानडे व कैलासवासी नामदार तेलंग यांनीं पेशव्यांचें दप्तर पहाण्या विषयीं सरकारांतून परवानगी मिळावी ह्मणून भगीरथ प्रयत्न केला होता पण त्या प्रयत्नाला यश अगदीं सोप्या व अकल्पित मार्गानें आलें ही विशेष आल्हाददायी गोष्ट होय. पेशव्यांचे दप्तरांत सुमारें २०० रुमाल आहेत आणि त्यांत पुष्कळ ऐतिहासिक कागदपत्र आहेत. मराठ्याच्या इतिहासाला हें निराळें उत्तम साहित्य मिळालें हा महाराष्ट्राला मोठा लाभच झाला. श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे व साताराचे राजे यांच्या रोजनाम्यांतील कांहीं उतारे इंग्रजी भाषेत लिहून रा० ब० गणेश चिमणाजी वाड यांनीं सरकारच्या मान्यतेसाठीं धाडून ते प्रसिद्ध करण्याची परवानगी मागितली. मुंबई सरकारानें ऐतिहासिक व सामाजिक माहिती प्रसिद्धीस यावी ह्मणून मोठ्या उदारबुद्धीनें हें दप्तर या मंडळीच्या स्वाधीन केलें आहे. हें काम या मंडळीच्या हातून फार उत्तम रितीनें सिद्धीस जावें अशी प्रत्येक जणाची साहाजिक उत्कट इच्छा होईल आणि अर्थातच या कामाच्या संपूर्णतेकडे सर्वांचे डोळे लागून राहतील.

अशा या उत्तम संस्थेला लोकाश्रय अद्याप असावा तसा मिळत नाहीं हें बरोबर नाहीं. श्रीमंत गायकवाड सरकारांनीं ५००० रुपयांची देणगी दिली आहे आणि इतर कित्येक संस्थानिकांनीं ही चांगला आश्रय दिला आहे. सध्यां या सोसायटी पाशीं १६००० रुपयांचें भांडवल असून त्याचें व्याज ५६० रुपये येतें, सालिना वर्गणीदारांकडून ७५० रुपये वर्गणी जमा होईल, आणि १००० रुपये दक्षिणा फंडांतून सालिना मिळत जातील ह्मणजे २३१० रुपये महाराष्ट्र ग्रंथाभिवृत्यर्थ खर्च करण्याची ऐपत या मंडळीस आली आहे. तथापि लोकाश्रय पुष्कळ पाहिजे आणि त्या शिवाय मंडळीच्या आरब्ध कार्यास चांगलेंसें यश येणार नाहीं किंवा मंडळी नांवारूपासही येणार नाहीं हें उघड आहे. सध्यां ५९ तहांहयात सभासद असून वार्षिक वर्गणीदार १६७ आहेत, तहांहयात सभासदांस अगाऊ ५० रुपये निदान द्यावे लागतात आणि वार्षिक वर्गणी निदान ५ रुपये द्यावी लागते. या मंडळीमध्यें वऱ्हाडांतील गृहस्थ इतर प्रांतांच्या मानानें पुष्कळ आहेत ही गोष्ट आह्मास विशेष समाधानकारक वाटते. ही गोष्ट घडविण्याचें श्रेय पुष्कळ अंशीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांस आहे. त्यांची या कामीं आस्था व कळकळ पाहून चिटणीसांनीं फार आभार मानले आहेत. सुमारें